# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. विशेष महासभा**
**दि. २१/०२/२००९**

आज शनिवार दि. २१/०२/२००९ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. १६ दि. ०६/०२/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | नरेंद्र मेहता | महापौर |
| २) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सभापती, स्थायी समिती |
| ३) | चंद्रकांत सिताराम वैती | विरोधी पक्षनेता |
| ४) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ५) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ६) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ७) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| ८) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| ९) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १०) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| ११) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १२) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १३) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १४) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १५) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १६) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १७) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| १८) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १९) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २०) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २१) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २२) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २३) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २४) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २५) | शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| २६) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| २७) | पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| २८) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| २९) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ३०) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ३१) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३२) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ३३) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ३४) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| ३५) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ३६) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३७) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३८) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३९) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४०) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ४१) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ४२) | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | सदस्य |
| ४३) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ४४) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ४५) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४६) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ४७) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ४८) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४९) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ५०) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ५१) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ५२) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ५३) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ५४) | भाटकर प्रेरणा प्रमोद | सदस्या |
| ५५) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५६) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५७) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ५८) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ५९) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ६०) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६१) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ६२) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६३) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६४) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ६५) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ६६) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ६७) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ६८) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ६९) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ७०) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७१) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ७२) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७३) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |
| ७४) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |
| ७५) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील जयंत महादेव | सभागृह नेता |
| २) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| ३) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| ४) | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | सदस्य |
| ५) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ६) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ७) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ८) | परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज –**

| | | |
|---|---|---|
| १) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | उपमहापौर |

(राष्ट्रीय गीत "वंदे मातरम" ने सभेला सुरूवात करण्यात आली.)

**मा. महापौर :-**

सचिवजी आजच्या सभेच्या कामकाजाला सुरूवात करावी.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९९, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००८-०९ चे सुधारित व २००९-१० चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०३/०२/२००९ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १२०, ठराव क्र. १०९), प्रकरण क्र. १००, मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००८-०९ चे सुधारित व २००९-१० चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०३/०२/२००९ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १२१, ठराव क्र. ११०), प्रकरण क्र. १०१, मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्ष प्राधिकरणाचे सन २००८-०९ चे सुधारित व २००९-१० चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०३/०२/२००९ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १२२, ठराव क्र. १११) प्रथम मा. स्थायी समिती सभापती मॉरस रॉड्रीक्स हे बजेट महापौरांना सादर करित आहेत.

(सभागृहासमोर बजेट मा. महापौरांना सादर करण्यात आले.)

सभापती साहेब, बजेटवर आपले मनोगत व्यक्त करत आहेत.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मा. महापौर, उपमहापौर, सभागृह नेते, विरोधीपक्ष नेते, मा. आयुक्त, उपायुक्त सन्मा. नगरसेवक, नगरसेविका, मनपा अधिकारी व कर्मचारी वगैरे, गॅलेरीतील नागरिक, पत्रकार व माझे बंधू भगिनींनो....

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम (९६) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००८-०९ चे सुधारीत व सन २००९-१० चे मुळ रू. ५.५० लक्षचे शिलकी अंदाजपत्रक आपणांसमोर सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे.

मा. आयुक्त, मा. सभापती परिवहन सेवा व वृक्ष अधिकारी यांनी सादर केलेले अंदाजपत्रकावर मा. स्थायी समिती सदस्यांनी अभ्यासपुर्वक बाबीवर लेखाशिर्ष विचारात घेवून विचार विनिमय करून अनावश्यक खर्चात नियंत्रण आणून कुठल्याही प्रकारची कर वाढ न करता उत्पन्न वाढीबाबत इतर पर्याय विचारात घेवून उत्पन्नात वाढ सुचविण्यात आलेली आहे.

अ ब क वृक्षप्राधिकरण या अंदाजपत्रकासोबत JNNURM मधील रिफॉर्मसाठी "P" बजेट, जनरल बजेट, "OUT COME" बजेट बनविण्यात आलेले आहे. ते स्विकारून त्यामध्ये आवश्यक त्या दुरूस्त्या, मा. सदस्यांच्या सुचना विचारात घेवून मंजुरीसाठी सादर करित आहे. बजेटमधील जे प्रकल्प / योजना हाती घेण्यात येणार आहेत त्या अंमलबजावणीसाठी प्रशासन सदैव तत्पर राहिल, अशी अपेक्षा करतो. सन २००८-०९ चे सुधारीत व सन २००९-१० चे मुळ अंदाजपत्रकास मा. महासभेची मंजुरी मिळावी ही विनंती.

अर्थसंकल्प तयार करतांना मा. आयुक्त/ मा. स्थायी समिती सदस्य/ मा. उपायुक्त/ अधिकारी व कर्मचारी तसेच लेखा शाखेचे मोलाचे सहकार्य लाभले त्या सर्वांचे मी आभार मानतो.

धन्यवाद! सहकार्याबद्दल आभार ।। जय हिंद, जय महाराष्ट्र।।

**मा. महापौर :-**

सन २००९-१० या बजेटवर शांततेने ही मिटींग व्हावी. प्रत्येक पक्षाला फिगर व्यतिरिक्त काय बोलायचे असेल तर पाच पाच मिनिटे आपण त्यांना वेळ देवू या. त्यांचे मनोगत काय असेल किंवा जनरल चर्चा काय असेल तर त्यानंतर आपण पेज वाईज चर्चा करू या म्हणजे शांततेने बजेटची तयारी चालेल. प्रत्येक पक्षाने पाच पाच मिनिटे घ्यावीत व त्यांच्या प्रतिनिधीने बोलावे. फिगरवर आपण पेजवाईज जाणार आहोत. पण त्याच्या व्यतिरिक्त काय असेल तर पाच मिनिटे घ्यावीत.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर साहेब, आजच्या मिटींगपुरता आयुक्त म्हणून घेतलेले उपायुक्त साहेब, सभापती - स्थायी समिती मला आपल्याला काही महत्वाच्या बाबी सांगायच्या आहेत. त्या प्रत्येक विषयावर आपण सांगणारच आहोत. अनेकवर्षे आम्ही बजेट बनवतो. १९८५ ला नगरपालिका स्थापन झाली ७ वर्षे प्रशासन बजेट बनवत होता. त्याच्यानंतर नगरपालिका आली. नगरपालिकेची दोन टर्म झाली. महानगरपालिकेच्या दोन टर्म झाल्या. हे सगळे इतके वर्षे आम्ही जेवढे बजेट सादर केले बजेटला मंजुरी दिल्यानंतर दुसऱ्या महिन्यात जेव्हा आमचे लोकप्रतिनिधी जातात की, आमची काम घ्या. तेव्हा सरळ सरळ उत्तर काय मिळते की, आमच्याकडे कुठली शिल्लक नाही. सरळ सरळ आमच्याकडे बांधकामाला शिल्लक नाही, आरोग्य विभागाला शिल्लक नाही. मग बजेट मागे जरी मधल्या काळामध्ये फुगुन बनवलेली असली तरी मग आमचा ह्याच्यामध्ये नेमका प्रोग्रेस काय आहे? प्रशासनाने एवढ्या वर्षामध्ये ७ वर्षे ती आणि जवळजवळ ही १७ वर्षे, २४ वर्षामध्ये प्रशासनाने असे प्रत्येक विभागावर पाणी पुरवठा विभाग, सार्व. बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, आस्थापना विभाग त्याच्यानंतर ज्या ज्या ठिकाणातुन आम्हाला रिव्हेन्यु इनकम होतो. त्या विभागातुन आम्हाला कशापद्धतीने इनकम वाढेल ह्याच्यावर कधी कुठले एक्झरसाईजच केले नाही का? जेव्हा तुम्ही बजेट करता तेव्हा त्या बजेटच्या मंजुरीच्या अधिनच पुढल्या वर्षी काम घेतली पाहिजे त्याला वगळून आपण पाहिजे तेवढी

काम घेतो आणि मधल्या काळामध्ये जेव्हा एखाद्या हेडमध्ये बजेट संपतो तेव्हा परस्पर मिस ॲप्रोप्रिएशन म्हणणार नाही मी रि-एप्रोप्रिएशन करण्याच्या ऐवजी मिस ॲप्रोप्रिएशन करून टाकतात आणि ती काम करून टाकतात. नंतर दुसरे हेड मार खातात. मला आपल्याला एक विचारायचे आहे की, जर तुम्ही साधारण एक पाणी पुरवठा विभाग घेतला तर आमच्याकडे येणारे पाणी आम्ही ते कीती पैशांनी विकत घेतो. किती लिटर मागे त्याला रेट देतो त्याच्यातनंतर आमही किती पैशांनी ते लाकोंना विकतो तो रेट तुम्ही बघा. ४ रु. लिटरने आम्ही पाणी घेतो आणि ७ रू. लिटरने रेसिडेन्सला देतो २८ रू. लिटरने आम्ही कमर्शिअल पाणी विकतो. तुम्ही जेव्हा बजेट करता तेव्हा एका पाणी पुरवठा विभागाने किंवा एका सार्व. बांधकाम विभागाने किंवा परवाना विभागाने छाती ठोकून सांगितले पाहिजे की, आम्ही हे बजेट केलेले आहे हा मागच्या वर्षीचा आमचा अनुभव आहे. आम्ही सगळ्याच सेवांमध्ये अनुदान द्यायचे का? मग सगळ्या सेवेमध्ये आम्ही जर अनुदान देणार असू तर या शहराची परिस्थिती काय राहिल? कुठली जे.एन.एन.यु.आर.एम. ची काम तुम्ही करणार आहात? कुठे नविन काम विकासाची करणार आहात? मला आमचे बापुजी स्वातंत्र्य सैनिक मारेश्वर नारयण पाटील हे स्वातंत्र्य सैनिकांचे पुढारी नव्हते तर पहिले सरपंच, ग्रुप, ग्रामपंचायतीचे होते. कृषी खात्याचे ते चेअरमन होते. ते नेहमी त्यांच्या भाषणामध्ये बोलायचे बादशाही गेली दरबारी पेशवाई गेली नगारी आणि पालिका जाणार पगारी हे त्यांचे ब्रीद वाक्यच होते. महानगरपालिका, नगरपालिकांच्या कामकाजावर बोलतांना. आता हे बजेट उघडल्यानंतर १४९ कोटीवर आपली पत आलेली आहे. जी पत ३५० कोटींवर होती म्हणजे या ३५० कोटीच्या बजेटला आम्ही मान्यता दिली ते बजेट चुकीचे होते की १५० कोटीचे बजेट चुकीचे म्हणायचे? म्हणजे आज आम्ही जे १५० कोटीवर आलो आहोत ते आम्ही ॲक्युरसीमध्ये आलेलो आहोत. ह्याच्या अगोदरची जी सगळी बजेट होती ती इनफ्रेन्ड करून होती म्हणजे जे इनकम येणार नाही ते इनकम येणार, असे दाखवयाचे. जो खर्च करायला पाहिजे म्हणून प्रोव्हीजन करायचे ते खर्च होत नाही कारण इनकम आले नाही आणि तुम्हाला माहिती आहे महापौर साहेब, एका सभेमध्ये मी असा प्रश्न विचारला होता की, आज आम्ही बजेट बनवले आज बजेटला मंजुरी दिली अख्ख्या वर्षामध्ये हे ऑडीट विभाग काय करते त्याचा काय थांगपत्ता लागत नाही. कुठे खर्च झाला कुठे बाकी आहे. कुठल्या हेडला पैसे बाकी आहे आणि तो लागावा म्हणून त्रैमासिक जमाखर्चाचा अहवाल त्यांनी सादर करावा असे ठरलेले तर नियमाप्रमाणे त्रैमासिक खर्चाचा अहवाल त्यांनी स्थायी समितीला दर तीन महिन्यांनी द्यायला पाहिजे. मला माहिती नाही ते देतात का नाही, स्थायी समितीचे सदस्य इथे आहेत. दर तीन महिन्यांनी तुम्हाला असे जमाखर्चाचा अहवाल ते देतात का? का देत नाही? प्रशासन ह्या गोष्टी का लपवते? त्यांचे त्यांनी उत्तर द्यावे. इव्हन हे सगळे झाल्यानंतर तुम्ही स्वतः चर्चेत असे सांगितले की, त्रैमासिक जमा खर्चाचा अहवाल फक्त स्थायी समितीच्या सदस्यांना देवू नका तर सगळ्या सदस्यांना द्या. सात दिवसामध्ये तुम्ही एक वर्षाचा अभ्यास करायला सांगतात. कमीत कमी २०० दिवस तरी शाळेत जायला लागते तेव्हा वार्षिक परिक्षा देतो हे सात दिवस बजेट पाठवले तर सात दिवसात काय बघणार? त्याच्यात सुद्धा ही बजेटची कॉपी नंतर अजेंड्याची कॉपी अगोदर त्याच्यानंतर तिसरी माहिती येते ती महासभेमध्ये आल्यानंतर दुसरी माहिती आणि आता आम्ही विचारू तेव्हा काय सांगणार की, आता माहिती घेउन बोललो आम्ही आणि त्याच्यात तुमचे जेवढे डिपार्टमेंटचे लोक आहेत ते सगळे डिपार्टमेंटचे लोक येथे आहेत का? तुम्हाला शिक्षण विभागाचेच विचारतो आहे का कोणी शिक्षण विभागाचा? मग बजेटची मिटींग आम्हाला कंम्पलसरी आहे त्यांना नाही का? कारण शिक्षण विभागाच्या बजेटचे ह्यांनी वाटोळे करून टाकलेले आहे, या अधिकाऱ्यांनी, आता येईल आपण प्रत्येक पान व्हाईज जाणार आहात तेव्हा आम्ही त्याची कारण मिमांसा तुम्हाला विचारू. पण इन जनरली मला हे बोलायचे आहे की, आज इतक्या वर्षानंतर आज छाती ठोकपणे प्रशासन हे सांगू शकत नाही की आम्ही इतक्या ॲव्हरेजने आणि इतक्या परसेंटने आम्ही हे इनकम वाढवले, मालमत्ता करात एवढे आम्ही इनकम वाढवले एक साधा प्रश्न विचारतो, आपण एक विषय आणलात, खुल्या जागांना टॅक्स लावण्याचा, आपण एक विषय आणलात की, ज्यांना सी.सी. दिली आहे त्यांनी बांधकाम केले नाही. त्या लोकांना टॅक्स लावण्याचा काय आहे, ह्याच्यावर तुम्ही असे काही वेगळे विवरण दिले आहे का? जेव्हा एखादी गोष्ट किंवा एखादी बाब तुम्ही चालू करता तेव्हा तुम्ही ह्याची काही विवरण दिली आहेत का? म्हणजे बजेटला यायचे म्हणजे काय यायचे? टाळ्या वाजवायला यायचे का, हातपाय आपटायला यायचे की डोक आपटायला यायचे की, वर्षभर डोक आपटत राहायचे. या सगळ्या डिटेल कोणी द्यायच्या? कुठलेही विवरण पत्र नाही आता एस्कॉट कर त्याच्यामध्ये काय झाले आम्हाला घरातुन पैसे द्यायला लावले. एक वर्षभरामध्ये तुम्ही अनुभव घ्यायला तुम्हाला ३६५ दिवस लागले. जेव्हा तुम्ही एस्कॉट कर लागू केलात तेव्हा त्याचा तीन महिने अहवाल तुम्ही महासभेसमोर द्यायला पाहिजे होता की एस्कॉर्ट कोणी भरत नाही. गाड्यावाले आमच्याच प्रशासनाच्या लोकांना मारतात. आता मला असे कळले की, तुम्हाला जेवढी एस्कॉर्ट फि मिळाली नाही त्याच्यापेक्षा जास्त त्या एस्कॉर्टच्या कर्मचाऱ्यांना मारले. त्याच्यावर जास्त खर्च झाला. मग त्याच्यामध्ये निर्णय घेण्यासाठी काय एक वर्ष थांबायचे? आणि पुन्हा निर्णय कुठला न घेता परिस्थितीची चौकशी न करता एस्कॉर्ट आम्ही वसुल करूच शकत नाही. तरी या बजेटमध्ये एस्कॉर्ट आणलाच. म्हणजे हे काय चालवले आहे. हे स्थायी सिमितीच्या सभापतींचे काम नाही. हे प्रशासनाचे काम आहे त्यांनी त्यांच्या डिपार्टमेंटची माहिती ॲक्युरेट दिली पाहिजे. मला तर म्हणायचे आहे की, स्थायी समितीच्या सभापतींनी चांगलच काम केले आहे की, त्यांनी बरोबर

इनटॅक्ट बजेट बनवले आहे. पण ह्या इनटॅक बजेटमध्ये सुद्धा अनेक गोष्टी मला असे वाटतात की, त्या संभावित आहेत का? कारण मागचा असा कुठलाच एक्सरसाईज ह्यांचा सक्सेस झालेला नाही आणि म्हणून आपण अजिबाजबी या बजेटची सभा पाच दिवस जरी चालली तरी चालू दे पण प्रत्येक गोष्टीचे त्यांनी विवरण द्यावे. प्रत्येक फिगरच्या मागे त्यांनी पृष्ठी द्यावी की, आम्ही हे फिगर कुठल्या बेसवर आणलेत? मग मागच्या तीन वर्षाचा त्यांनी ॲव्हरेज द्यावा आणि नवीन वर्षात गेलेल्या बजेटचे इतके आम्ही फिगर का आणले? ऑन व्हॉट बेसीस? प्रॉपर्टी टॅक्स आहे. गेल्यावर्षात किती प्रकरण काढली? या वर्षात किती प्रकरण काढली? तुमच्याकडे आजच्या घडीला जर मी आज विचारले की, गेल्या सहा महिन्यामध्ये टाउन प्लानिंग डिपार्टमेंटने तुमच्याकडे ओ.सी.ची किती प्रकरण दिली? आहे का टाउन प्लानिंगची लोक त्यांनी उत्तर द्या. टाउन प्लानिंग डिपार्टमेंटने आज तरी ती माहिती देण्याची प्रथा चालू केली आहे का? आम्ही इतक्या प्रोजेक्टला सी.सी. दिलेली आहे. ती सी.सी. दिल्यामुळे तुम्ही ह्याला टॅक्स लावा. इतक्या लोकांना आम्ही ओ.सी. दिलेली आहे. त्यांना तुम्ही टॅक्स लावा. वाढीव बांधकाम ज्यांनी केले आहे त्यांना तुम्ही अनधिकृतची व्याख्या केली त्याच्या संदर्भात टाउन प्लानिंग सांगते टॅक्स विभागाला की, तुम्ही जावून सर्व्हे करा. म्हणजे टाउन प्लानिंगने काय नुसते थप्पे मारायचे आणि नोटा घ्यायचे बस्स. त्याच्याशिवाय दुसरे काम काय करायचे नाही का? याचा उतारा आला तर तो उतारा बघायचा नाही दुसऱ्याच्या नावाचा उतारा असला तर त्याला टी.डी.आर. ह्याला द्यायचा, ह्याची डी.आर.सी. त्याला द्यायची. हे सगळ काम करताना टाउन प्लानिंग डिपार्टमेंटला आपल्या डिपार्टमेंटशी काय तर हे लोक आले तर? प्रतिनियुक्तीवर आल्यामुळे टेम्परारी काम भरपुर घाम आणि भरपुर दाम अशी परिस्थिती ह्यांची आहे आणि म्हणून ह्या सगळ्या हेडवर आपण डीटेलमध्ये जा. भले आपल्या कुठल्या मिटींग असतील किंवा काय असतील. आचार संहिता लागायच्या अगोदर बजेट मिटींग चालू राहू दे.

**नगरसचिव :-**

परिवहन समितीचे सभापती आले आहेत व ते महापौरांना बजेट सादर करत आहेत.

(सभागृहासमोर महापौरांकडे बजेट सादर करण्यात आले.)

बजेट बद्दल परिवहन समितीचे सभापती आपले मनोगत व्यक्त करित आहेत.

**रेनॉल्ड बेचरी (सभापती, परिवहन समिती) :-**

सन्मा. महापौर साहेब, सन्मा. उपमहापौर साहेब, आदरणीय आयुक्त साहेब, आदरणीय सभागृह नेतेसाहेब, मा. विरोधी पक्ष नेते साहेब, मा. स्थायी समिती सभापती साहेब, तसेच सर्व सन्मा. नगरसेवक सन्मा. नगरसेविका, मा. नगरसचिव साहेब, सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग तुम्हां सर्वांना माझे आदराचे अभिवादन.

"आशा म्हणजे मानवी जीवनाचा मुख्य आधार होय." ह्याच अनुषंगाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे ९७(क) अन्वये मा. परिवहन व्यवस्थापक यांनी सादर केलेल्या चतुर्थ अंदाजपत्रकात आवश्यक त्या दुरुस्त्या करुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम ९८(३) नुसार आपल्याकडे अर्थात सन्मा. सभागृहाकडे मंजुरीसाठी सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे.

आपल्या परिवहन उपक्रमाची बस सेवा ही सध्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये म्हणजेच इन सीटी चालविण्यांत येत आहे. सद्यस्थितीत परिवहन उपक्रमामध्ये ५० बसेस खाजगीकरणाच्या माध्यमातून कार्यरत आहेत व १७ विविध मार्गावर ह्या बसेस धावत असून लोकांना सेवा देत आहे. सन्मा. महासभेच्या एक गोष्ट निदर्शनास आणू इच्छितो की, या शहरातील अगदी सामान्य नागरीक, की ज्याच्याकडे स्वतःचे वाहन नाही किंवा जास्त किंमत मोजून खाजगी वाहनामध्ये जाण्याची ज्यांची आर्थिक ताकद नाही असाच तळागाळातील गरीब नागरीक आपल्या बससेवेचा लाभ घेताना दिसत आहे. म्हणून परिवहन उपक्रमाला "गरीबांचा रथ" संबोधले तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही. साधारणतः ५० हजार प्रवासी दर दिवशी सदर सेवेचा लाभ घेत आहेत. परिवहन उपक्रम दि. १५/०९/२००५ रोजी सुरु झाला असून, सन २००५-०६ या वर्षामध्ये प्रवाशांची संख्या ३९,४८,१७६ सन २००६-०७ या वर्षामध्ये प्रवाशांची संख्या १,४३,२४,३१५, सन २००७-०८ या वर्षामध्ये प्रवाशांची संख्या १,६७,५१,००० व सन २००८-०९ (जाने. ०९) या चालु वर्षामध्ये प्रवाशांची संख्या सव्वा दोन कोटी इतकी होईल असा पक्का विश्वास आहे. ही आकडेवारी पाहता परिवहन उपक्रमामध्ये प्रवाशांच्या संख्येत सातत्याने वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

भूतकाळासाठी रडण्यापेक्षा वर्तमानकाळाशी लढण्यात आणि भविष्याच्या शिखरावर चढण्याचा खरा पराक्रम आहे. या अनुषंगाने आपल्या सर्वांच्या सहकार्याने प्रशासन व परिवहन समिती आपला उपक्रम "ना नफा ना तोटा" या स्थितीत आणण्याचा कटाकाक्षाने प्रयत्न करीत आहे. तसेच इतर मार्गांनी उत्पन्न कसे मिळवीता येईल यासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत. मा. परिवहन समिती सदस्य, परिवहन व्यवस्थापक व अधिकारी वर्ग यांच्या सहकार्याने काही प्रमाणात असलेली तूट भरुन काढण्याचा प्रयत्न चालू आहे.

परिवहन सेवेस सन २००५-०६ या वर्षामध्ये प्रती कि.मी. मागे रु. ३.३३ पैसे.

सन २००६-०७ या वर्षामध्ये प्रती कि.मी. मागे रु. २.३६ पैसे.

सन २००७-०८ या वर्षामध्ये प्रती कि.मी. मागे रु. २.७७ पैसे याप्रमाणे प्रती कि.मी. करीता तोटा आलेला आहे.

असे सांगतात की, ध्येयाच्या नौकेत बसून प्रयत्नांची वल्ही मारा की यशाचा किनारा दूर राहत नाही. आपल्या समोर एक ध्येय होते की, आपल्या परिवहन उपक्रमाचा विस्तार होवून आपली बससेवा ठाणे, बोरीवली व शिरसाट फाट्यापर्यंत पोहचावी. अनेक बैठका, अनेक पत्रव्यवहार आणि प्रशासन व परिवहन समितीच्या प्रयत्नांनी आपल्याला यश प्राप्त झालेले आहे. शासनाच्या नवीन धोरणाप्रमाणे एम.एम.आर. रिजनमध्ये म्हणजेच ठाणे, बोरीवली व शिरसाट फाटा या मार्गाची परवानगी परिवहन उपक्रमास लवकरच प्राप्त होणार आहे. शासनाच्या धोरणाच्या अनुषंगाने परवानगी प्राप्त झाल्यानंतर ठाणे, बोरीवली व शिरसाट फाटा येथे परिवहन सेवा चालू करण्याला प्राधान्य दिले जाणार आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या खाजगीकरणाजून चालविण्यांत येणाऱ्या परिवहन सेवेचे उत्पन्न व धावमार्गाचे कि.मी. विचारात घेता, ठेकेदारांना द्यावयाच्या रक्कमेचे इतकेच सर्वसाधारण उत्पन्न आहे. परंतु, परिवहन सेवेच्या आस्थापनेवर व इतर ठेक्याच्या माध्यमातून कार्यन्वित करण्यात आलेले वाहक, प्रवर्तक आणि निरीक्षक अशा कर्मचाऱ्यांच्या पगाराकरीता परिवहन सेवेला वर्षाकरीता साधारणपणे अंदाजे रुपये १ कोटी २५ लाख इतका खर्च होतो.

मिरा भाईंदर परिवहन उपक्रमाकडून महानगरपालिका शहरातील प्रवाशांची उत्तम सेवा करीत आहे. महानगरपालिकेकडून वृक्ष प्राधिकरण विभाग, आरोग्य विभाग, पाणी पुरवठा विभाग व बांधकाम विभाग यांना आवश्यकते प्रमाणे अर्थसंकल्पात तरतूद करण्यांत येत असते. परिवहन सेवा ही सुध्दा एक अत्यावश्यक सेवा आहे. अगोदर सांगितल्याप्रमाणे चालू आर्थिक वर्षामध्ये सव्वा दोन कोटी प्रवासी आपल्या परिवहन सेवेतून प्रवास करणार आहेत. सव्वा दोन कोटी प्रवाशांसाठी वार्षिक प्रत्येकी रु. २.०० अनुदान मंजूर करुन परिवहन समितीने केलेली रु. २ कोटी २५ लाखाची तरतूद सन्मा. सभागृहाने मान्य करुन खऱ्या अर्थाने "गरीबांचा रथ" पुढे चालविण्यास सहाकार्य करावे ही विनंती करुन एवढेच सांगेन की, ...

मी ही उधळीन आयुष्याचे । अवघे क्षण-क्षण मोती ।
अश्रू पुसुनी पददलीतांचे । लावीन हर गृही सुख ज्योती ।
**या, चला मिरा भाईंदरच्या जनतेला प्रवास सुखरुप व सुरक्षीत करुया ।।**

**जय हिंद, जय महाराष्ट्र !**

**प्रफुल्ल पाटील :-**

परिवहन सभापतींना धन्यवाद पण द्यायला पाहिजे. "ये हवाओ के झकोरे, कहा आग लेके निकले मेरा गाव बस सके तो मेरा झोपडा जला दो"

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

परिवहन सभापतीने आपल्याला जो तोटा दाखवला २.३०, २.३६, २.७७ म्हणजे चुकतय का काय? ह्यावर्षी तोटा जास्त आहे.

**रेनॉल्ड बेचरी (सभापती, परिवहन समिती) :-**

आत्ताय सगळ्यांची मागणी होती की, भुमिपुत्र आपल्या येथे काम करतात कंन्डक्टर म्हणून प्रर्वतक म्हणून आणि आत्ताच आपण त्यांना पगारवाढ दिलेली आहे. त्यांना कमीत कमी साडे तीन हजार रू. आपण पगारवाढ दिलेली आहे. त्या अनुषंगाने कदाचित ह्यावर्षीचा आकडा थोडा फुगलेला दिसतोय.

**लक्ष्मण जंगम :-**

साडे तीन हजार रू. वाढवले का, मुळ पगार साडे तीन....

**रेनॉल्ड बेचरी (सभापती, परिवहन समिती) :-**

टोटल साडे तीन हजार रू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभापती साहेब, तुम्ही भुमिपुत्रांचा मान केला मी तुम्हाला एक अर्ज केला होता की, इकडचा स्थानिक जो विद्यार्थी आहे त्या विद्यार्थ्यांना मासिक पास देताना रूट वाईज मासिक पास द्या. एखादा नोकरी करून शिकणारा पोरगा अभिनव शाळेतुन जर तिथे जात असेल तर दोनदा गेला तर त्याला दोनदा पैसे भरायला लागते. तर त्याला मासिक पास रूटप्रमाणे द्या. त्याच्यावर तुम्ही कधी विचार केला नाही वाटते. ते भुमिपुत्र नाही का?

**बालाजी खतगांवकर सो. (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपला प्रस्ताव परिवहन समितीमध्ये आहे त्यावर निर्णय घेउन ती मागणी आपण करु. म्हणजे ते रिजेक्ट केलेले नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हे २००६ मध्ये झाले आहे. पण तो विचार तुम्ही भुमिपुत्रांसाठी करता जे शिक्षण घेतात व जे ह्या देशाचे भविष्य आहे. ह्याचा तुम्ही कधी विचार केला नाही असे वाटते.

**रेनॉल्ड बेचरी (सभापती, परिवहन समिती) :-**

साहेब, या देशाच्या भविष्याचा आम्ही नक्कीच विचार कतो तुम्ही सुद्धा करता आहात. आणि तुमच्या पत्राचे सभेमध्ये वाचन झाले आणि त्याच्यावर गांर्भियाने विचार करून लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, आता हे जे नविन बेस्ट आहे. बेस्ट ही मुंबई ते ठाणा वाया भाईंदर, घोडबंदर हायवे चालू झाली आणि शासन नियमप्रमाणे आपल्याला २० की.मी. पर्यंत जाता येते. त्यासाठी ह्या परिवहन समितीने काय प्रयत्न केले आहे का? शासन दरबारी बेस्टकडे किंवा टी.एम.टी. कडे आणि दुसरी गोष्ट तोटा कमी करण्यासाठी ह्यांचे काही प्रयत्न आहे का? जो भुमिपुत्रांचा स्टाफ ठेवलेला आहे ते शासनाच्या नियमाप्रमाणे किंवा ह्यांच्या जाहिरातीप्रमाणे त्यांचे क्वालिफिकेशन आहे का? त्याची ह्यांनी पाहणी करून ठेवली आहे का? काही भुमिपुत्र आहेत म्हणून कामाला ठेवलेले आहेत. बिना क्वालिफिकेशनचे.

**बालाजी खतगांवकर सो. (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

महापालिका परिवहन सेवेचे तुट भरून काढण्यासाठी जे लगत २० कि.मी. च्या अंतरावरचे ठाणे, बोरीवली, शिरसाड फाटा याची जी आपली राज्यशासनाकडे मागणी होती त्या अनुषंगाने मा. सभापती महोदयांनी त्यांच्या प्रस्ताविकामध्ये ते सांगितलेलेच आहे की, आम्ही वेळोवेळी ह्याची मागणी शासनाकडे लावून धरलेली आहे. याचाच भाग म्हणून इतर परिवहन समितीने सुद्धा अशाप्रकारची मागणी शासनाकडे केलेली आहे. आता शासनाने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे की, २० कि.मी. कोणत्याही संस्थांची परवानगी घेण्याची गरज राहणार नाही आणि ती प्रोसिडींग अजुन हातात मिळालेली नाही. या हफ्त्यामध्ये मिळण्याची शक्यता आहे म्हणजे भविष्यात आपल्याला हे तीन रूट चालू करता येणार आहे. दुसरा जो त्यांचा मुद्दा होता की, जे काही कर्मचारी कार्यरत आहेत तर परिवहन समितीने आणि अत्यावश्यक सेवेमधल्या जे क्वालिफिकेशन आहे त्यामधल्या ते क्वालिफिकेशन विचारात घेउनच त्यांची नियुक्ती केलेली आहे.

**मिलन पाटील :-**

अध्यक्ष साहेब, मागच्या वेळेला पण आम्ही तुम्हाला तोंडी तशी एक रिक्वेस्ट केली होती की, तुम्ही जे शालेय विद्यार्थी असतात, फार गरिब असतात. भाईंदर सेकंडरीला सुद्धा त्याचा जास्त लाभ होतो आणि उत्तन मुर्धा लोकांचे सुद्धा आहे. त्या तेथून जे बसमध्ये येणार आहेत मागच्यावेळी तुम्ही २५ दिवसाचे पैसे घेता तर आम्ही सांगितले की १५ दिवसाचे पैसे घेतले विद्यार्थ्यांकडून तर तुम्हाला काय तकलिफ आहे. अर्धे पैसे घ्यायचे आता महिन्यातुन दोन तीन सुट्ट्या तर असतातच तर तुम्ही ते १५ दिवसाचे पैसे घ्या. दुसरी गोष्ट बऱ्याच वेळेला तुम्हाला विनंती केली होती की, समजा अस कुठली असते किंवा काय असेल तर त्याची तुमच्याकडे फोनची व्यवस्था नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

सभापती साहब, विद्यार्थीको तो मोफत पास देना चाहिए। अपने जो सेंकंडरी तक विद्यार्थी है उनको विना शुल्क।

**मा. महापौर :-**

सभी लोग स्कुल के युनिफॉर्म मे जाऐंगे।

**मदन उदितनारायण सिंह :-**

अपने मिरा भाईंदर मे पढनेवाले जितने विद्यार्थी है हायस्कुल तक उन सबको पास दिया जाए। मै ठराव मांडता हु की, विद्यार्थीयोको मोफत पास दिया जाए।

**मा. महापौर :-**

आता तो विषय नाहीच आहे. परिवहन समितीचा विषय आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आमच्या सदस्यांनी एवढ्या चांगल्या सुचना मांडल्या त्यांच्यासाठी एक शेर बोलतो.

**चंद्रकांत वैती :-**

त्याला आमचे समर्थन आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

उन्हे मेहनत की रोटी भी महम्मतसे ही नही होती, जिन्हे बरकत आती है बेईमानी से।

**मिलन पाटील :-**

मी तुम्हाला फोनची कम्प्लेंट दोन तीन वेळा केली होती का कुठे ही तुमच्या स्थानकावर फोन नाही. उत्तनला सुद्धा नाही. लोकांना कुठे जायचे असेल, नविन बाहेरचे लोक येतात त्यांना विचारायचे असते काय, इनकमिंगला १०० रू. पडतात. तुम्ही फक्त इनकमिंग ठेवा. तेवढी विनंती आहे. आपण लवकरात लवकर फोनची व्यवस्था करा.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, तुमच्या परवानगीने बोलते की, आता परिवहनचे सभापती असे बोलले की, भुमिपुत्र कामाला आहेत. भुमिपुत्रांचे हे झाले ते झाले. तर भुमिपुत्र म्हणजे नक्की कोण? भुमिपुत्र म्हणजे आमचे

जे मुळ गाववाले आहेत तेच भुमिपुत्र का? की, मिरा भाईंदर मध्ये जे राहतात ते भुमिपुत्र नाही का? दुसरा, विषय भुमिपुत्र म्हणजे आमच्या गावातला एक ही माणूस त्या परिवहनमध्ये कामाला नाही. मग कसले भुमिपुत्र आम्हाला सांगता?

**मा. महापौर :-**

जे कर्मचारी आहेत ते कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर आहेत.

**नयना म्हात्रे :-**

तुमचे सगळे डोंगरी, उत्तन तिकडचे भरले आहेत आम्ही फक्त भुमिपुत्र का सगळे उल्हासनगर वरून आणले ते भुमिपुत्र?

**मा. महापौर :-**

ते कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर आहेत.

**नयना म्हात्रे :-**

ते कॉन्ट्रॅक्टवर आहेत हे आम्हाला माहित आहे पण ते कसे बोलतात भुमिपुत्र म्हणून तो शब्द गहाळ करा भुमिपुत्र म्हणून भुमिपुत्र बोलूच नका.

**मा. महापौर :-**

मग कॉन्ट्रॅक्ट देताना आपल्याला तसे सांगायला लागेल भुमिपुत्र पाहिजेत.

**नयना म्हात्रे :-**

भुमिपुत्र हा शब्द वापरू नका. कारण आमच्या लोकांना अजुन नोकऱ्या लागलेल्या नाहीत.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. हा शब्द प्रोसिडींगमधून वगळण्यात यावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आयुक्त साहेब, आपण विद्यार्थी पास भाडेमध्ये २० लाखाचे उत्पन्न दाखवले आहे आणि त्यामध्ये बस थांबेवरील जाहिरात उत्पन्न मा. स्थायी समितीने २० लाख रू. दाखवलेले आहे आणि परिवहन व्यवस्थापकाने ५-५ लाख रू. दाखवलेले आहे. म्हणजे शेवटी डिफरन्स किती? ह्याच्यावर स्थायी समितीचे काय म्हणणे आहे? जर हा फिगर वाढला तर विद्यार्थ्यांची मागणी आहे मोफत पासची हा फिगर तुम्ही बघा. किती तफावत आहे? समोर २० लाख रू. तुमचे वर्षाचे विद्यार्थ्यांचे जातात म्हणजे तुम्ही उत्पन्न दाखवायचे आणि जाहिरातमध्ये २० लाख रू. स्थायी समितीने दाखवलेले आहे. मग हा एवढा डिफरन्स आलेला आहे. फक्त वसुली किती आहे वर १ लाख ५० हजार रू. म्हणजे जाहिराती नाही किंवा जाहिरात देत नाही किंवा वसुली होत नाही. जो बस थांबा शेड आहे ते किती शेड आहे?

**बालाजी खतगांवकर सो. (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

महापालिकेच्या मालकीची जी काही शहरामध्ये परिवहन शेड आहे ते बी.ओ.टी च्या माध्यमातुन बनवलेले आहे. जास्तीत जास्त प्रमाणित आणि काही नगरसेवकांच्या निधीतुन बनवलेले आहे. तर यावरील जाहिराती हे तीन वर्षासाठी लावल्याप्रमाणेच त्यावेळेला दिलेला आहे. आणि त्याची मुदत आता संपत आहे निविदा काढण्याची स्थायी समितीची अशी एक मागणी होती, बाहेर इतर शहरामध्ये जे आधुनिक शेड होतात त्यापद्धतीचे शेड आपल्या शहरामध्ये करावेत आणि जुने जे ठेकेदार आहेत त्यांना संपुष्टात आणावे चर्चा करून आणि त्याच्यातुन जास्तीचे उत्पन्न मिळवावे अशी अपेक्षा ठेवून स्थायी समितीने हे २० लाख रू. केलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बी.ओ.टी. बेसीसवर आपले निम्मेपण नाही. तीन वर्षाचे एकूण किती शेड आहेत? मागची थकबाकी अजुन वसुल केलेली नाही. नगरसेवकांनी जाहिरात लावलेली आहे. त्या जाहिरातीचे पैसे अजुनपर्यंत वसुल झालेले नाही, त्या नगरसेवकांकडून.

**बालाजी खतगांवकर सो. (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

महापालिका वैयक्तीक रोडवरून जाहिराती वसुल करत नाही. सर्व ते ठेक्याने दिलेले आहे. वार्षिक फि त्याच्याकडून वसुल केली जाते आणि ती फार नगदच्या रक्कमा आहेत.

**चंद्रकांत वैती :-**

खतगांवकर साहेब, सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आपले प्रश्न परिवहन संदर्भात आहे व मला वाटते पुढे आपली त्यावर चर्चा आहे. तर त्यावेळेला आपल्याला केली तर उत्तम राहिल. मा. महापौर साहेब, आजचे प्रभारी म्हणून आयुक्त म्हणून कामकाज पाहणारे श्री. खतगांवकर साहेब, सर्व सन्मा. सदस्य, सचिव साहेब, गेल्यावर्षी बजेटच्या मुहुर्तावर आपल्याकडे आयुक्त साहेब आले होते आणि ह्या वर्षीच्या बजेटपर्यंत आपल्याकडून कार्यमुक्त झालेले आहे. अगदी एक वर्षाच्या कारकिर्दीमध्ये त्यांनी ह्या महापालिकेतले कामकाज अगदी जवळून पाहिले, अनुभवले आपण त्यांच्याकडून शिकण्याऐवजी आपणच त्यांना शिकवून पाठवले त्यांनी सातत्याने सगळ्यांना कर्मचाऱ्यांना अधिकाऱ्यांना प्रसंगी दटावून सांगितले पण आपण काही ऐकले नाही. आजच्या बजेटच्या माध्यमातुन मी विशेष रूपाने प्रशासनाला काही गोष्टी सांगू इच्छितो शासन आणि प्रशासनाच्या माध्यमातुन स्थानिक स्वराज्य संस्थेचा कारभार चालू असतांना उत्पन्नाच्या ठळक बाबी आणि

खर्चाच्या ठळक बाबींवर चर्चा करत असतो पण अधिकाऱ्यांकडून नगरसेवकांना, लोकप्रतिनिधींना ज्याप्रकारची उत्तर दिली जातात. खरोखर हे झाल्यानंतर एक महिन्यानंतर उत्तर येईल की, बजेटमध्ये तरतुद नाही पुढच्या बजेटमध्ये करू मग आपण याबजेटमध्ये काय करणार आहोत. आपण जेव्हा हेड वाईज जावू तेव्हा आपल्याला मान्यता द्यावी लागेल. उद्या कदाचित आचारसंहिता लागु शकते. आचारसंहिता लागली तरी बजेटला मान्यता घेता येते. परंतु, विरोधाचा कुठचाही भाग नाही. बजेट अत्यंत सुंदर बनवलेले आहे फार मोठे बनवलेले आहे आपल्या ताकदीपेक्षा जास्तीचे बनविलेले आहे. आपण दिडशे किलो वजन उचलू शकतो तरी आपण साडे पाचशे किलो उचलण्याचा प्रयत्न करणार आहोत. भले कर्जाच्या माध्यमातून असू दे, गेल्या वर्षी मी बजेटवरती निवेदन करताना सांगितले होते की, गेल्या वर्षीचे बजेट डेफिशिएट १६९ करोड असे होते आणि पुढच्या वर्षी याच्यामधली तफावत साधारणतः २०० करोडच्या वर जाणार आहे म्हणून सांगितले होते आणि ती २०० करोडच्या वर गेलेली आहे. आकडेवारी मी काही सर्व सांगत नाही. परंतु, गेल्यावर्षीच्या बजेटमध्ये २००७-०८ यामध्ये आपण साधारणपणे जे हेड आपण ठरवले होते की ह्याच्यामध्ये आपण खुप मोठी आघाडी घेउन कर वसूली करु. तशी काही कर वसूली करु शकलो नाही. या वर्षीच्या बजेटमध्ये आपण गेल्यावर्षी ठरवले की आपल्याला म्हणजेच आपला मुळ स्त्रोत्र म्हणजे हाउस टॅक्स आणि पाणी पुरवठ्याच्या माध्यमातून फार मोठ्या रक्कमांची जमवाजमव होईल. ५० करोड रुपये जमा होतील असा आपला अंदाज होता परंतु ही घरपट्टी वसुली व पाणीपट्टीची वसूली याच्यामध्ये मला वाटते आपण पंचवीस ते वीस टक्यापर्यंत आहोत. ४ महिन्यांचा अवधी राहिला आहे या चार महिन्यात तुम्ही काय वसुली करणार? प्रशासनाकडून कामकाज करण्यासाठी नेमकी पद्धती काय आहे? प्रशासन कुठेतरी कमी पडते. आपल्याकडे सध्या कोणाचा पायपोस कोणाच्या पायात आहे ते कळत नाही. सगळेजण फार मोठ्या कामावर आहेत आणि त्याच्यात निवडणूकीची जबाबदारी आल्यानंतर सगळेच कर्मचारी निवडणूकीच्या नावाने किती काम करतात हे माहित नाही. परंतु, निवडणूकीच्या नावाने आपली फार मोठी जबाबदारी पार पाडत आहे. अजुन त्यांची जबाबदारी पार पाडलेली नाही. मग तुम्ही उत्पन्नाची स्त्रोत सांभाळणार कशी, ज्या ऑक्ट्रॉयच्या माध्यमातुन गेल्यावर्षी आपण ९२ करोड रू. अपेक्षित धरून काम केले होते. ते ऑक्ट्रॉयचा ठेका काढताना ८५ करोड २३ लाख रू. हा अंदाज आपण ठरवला. म्हणजे प्रशासनाकडून मुळातुन चुकीला सुरूवात झालेली आहे की, जेव्हा मागच्या बजेटचा अर्थ संकल्पीय अंदाज होता की ९२ करोड रू. आपल्याला अपेक्षित आहे. मग ८५ करोड रू. झालीच कशी? मग सातत्याने प्रत्येक हेडमध्ये अशाप्रकारची तुट येत जाणार आणि ही तुट कधीपर्यंत सहन करणार आहोत. आपण बजेटचे पहिले पान उघडले की, आपल्या सगळ्यांच्या लक्षात येईल की, आपण उत्पन्नाची साधन पकडतोय ते मुळ उत्पन्नाच्या स्त्रोत्रापैकी १४७.५० करोड रू. हे आपलेकडचे येण आहे. मग त्याच्यामध्ये मालमत्ता करातुन ४७.५० पण आपण आज किती वसुल केले आहे? १३ करोड रू. मग ती वसुली अपण करणार कसे ? जकातीच्या माध्यमातुन आपण ९२ करोड रू. अपेक्षित पकडलेले ८५.३२ वर आपण संपलो. पुन्हा ७ करोड रू. ने त्याच्यात मागे आलो. जाहिरात करातुन १६५ त्याच्यामध्ये आपण जवळपास आहोत. बाजार फि मध्ये ५ करोड रू. आपल्याला येतील असे आपण मानतोय. गेल्यावर्षी जो मोठा आकडा झाला तो ३ करोड २० लाख रू. पर्यंत त्याच्यावर आपण जावू शकत नाही. म्हणजे पुन्हा आपण येथे जास्तीचे बजेट केलेले आहे आणि पुढच्यावर्षी हा डेप्रीशिएट ३०० करोड रू. पर्यंत नेण्याचे आपण काम करणार आहोत. अग्निशमन सेवा करातुन १ करोड ७० लाख रू. आपल्याला अपेक्षित आहेत येतील. विशेष शिक्षण कर १.७० येतील. कॅपीटीशन फि ५० लाख रू. हे कसे काय आपण आणणार? मार्गस्थ फि, मार्गस्थ दाखला २.५० लाख रू. आपण सध्या ते एस्कॉर्ट मधून उत्पन्न जेवढे अपेक्षित होते त्याच्यापेक्षा त्यांच्या पगारावर खर्च होत होता. त्यानंतर आपल्या कर्मचाऱ्यांना होणारी दंडेली दादागिरी, दहशत, त्यांना गाडीतुन उचलून नेणे मारणं म्हणजे त्यांच्या जीवावर बेतण्याचे काम आपण करत होतो. हे बजेट फुगविण्यासाठीच आपण २ करोड ५० लाख रू. टाकले ज्या हेडची काही आवश्यकताच नाही आणि जसे तसे आपण १ करोड ४९ लाख रू. पर्यंत बजेटला नेले मग आपण साधारणपणे हे बजेट शेवटच्या स्तरावर नेताना आपल्याला अपेक्षा आहे की, ४५६ करोड रू. पर्यंत आपण जावू. कसे काय जाणार? मग आपण कर्ज किती घेतोय. आज आपल्या सर्व लोकांना आश्चर्य वाटेल माझ्या सर्व सदस्यांना की, आपण नुसते १० करोड रू. स्ट्रीट लाईटवर खर्च करतो. म्हणजे आपल्याला खर्चाला कात्री लावण्याची मानसिकता नाही ही जबाबदारी काय नगरसेवकांची आहे काय? प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी घेउन प्रत्येक काम करायला पाहिजे याबाबी लोकप्रतिनिधींच्या निर्देशनास आणायला पाहिजे होत्या. ११ करोड रू. आपण त्यांच्यावर खर्च करतोय आणि आपण कर्जबाजारी आहोतच अजुन आपल्याला ह्याच्यापुढे व्याज देण्यासाठी, कर्ज फेडण्यासाठी, कर्ज घेउ लागण्याची आपली तयारी आपण केलेली आहे. आपण जवाहरलाल नेहरू अरबन नॅशनल मिशन यासाठी आपल्याला जी रक्कम उभी करायची होती त्या ५० टक्क्यामध्ये आपण सध्या आपला वाटा उचलला आहे फक्त ८ टक्केचा बाकी ४२ टक्के तेही आपण कर्जातुन घेतोय. मग आपण नेमक काय करू शकतोय, काय करू इच्छितोय, प्रशासनाने ह्याबाबतीत आज ही खर्च करताना, खर्चाच्या बाबीमध्ये नवीन हेड त्यांनी दाखल केलेले आहे. नविन हेडबद्दल आपण जेव्हा विस्ताराने जावू, पेज वाईज जावू तेव्हा आपण चर्चा करून घेउ परंतु, प्रशासनाला माझी पुन्हा एकदा विनंती आहे की, आपण एक गोष्टी पर्यंत पाहेचले पाहिजे की, दरवर्षी काय काय तफावत येत गेली, किती तफावत येत गेली? पहिल्या काही वर्षी ते मी

आपले अंदाज सांगतोय की, सुरूवातीला २००३-०४ ला ४ करोड ३५ लाखाचा डेप्रिशिएट होता, सन २००४-०५ या आर्थिक वर्षात २७ करोड रू. चा डेप्रिशिएट होता, सन २००५-०६ या वर्षामध्ये ९८ करोड १२ लाख ९७ हजाराचा डेप्रिशिएट होता, सन २००६-०७ च्या आर्थिक वर्षात १६९ करोड ६१ लाख ५० हजाराचा डेप्रिशिऐट आणि आता ह्यावर्षी साधारणपणे २००७-०८ मध्ये २१५ करोड रू. चा डेप्रिशिएट आलेला आहे. मग हा डेप्रिशिएट ह्या रक्कमा आपल्याला निर्लेखित करायला लागतील. मग निर्लेखित करण्यासाठी ऑडीटर महोदय, आपली भुमिका फार महत्वाची होती. या महत्वाच्या बाबी सगळ्यांच्या निर्देशनात आणणे गरजेचे होते. आपण त्या आणल्या होत्या नाही. त्याच्यामधल्या काय त्रुट्या आहेत या निदान आम्हा सर्व सदस्यांना अपेक्षा आहेत. या कशा निर्लेखित केल्या जातील याबाबत आपले एक निवेदन झाले पाहिजे. सर्व सदस्यांसमोर आपण निवेदन केले तर उत्तम राहिल. साधारणपणे तीन महिन्यामध्ये सगळे खर्चाचे तपशिल आणि ऑडीटची स्थिती ही स्थायी समितीसमोर आपण आणायला पाहिजे. त्याच्यामध्ये लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे. सभापतींनी मागणी केली आहे. हा भाग तुम्ही वगळता हे तुमचे कर्तव्य आहे याच्यामध्ये पारदर्शकता यावी. याच्यातल्या सगळ्या गोष्टी प्रत्यक्षात दिसाव्यात त्याच्या पुढच्या रक्कम निर्लेखित करायचे, वेळोवेळी आपण हे सदस्यांसमोर आणले पाहिजे तर आपण आता मी तर पहिली विनंती करतोय की, ऑडीटर साहेबांनी आपण किती ह्याच्यामध्ये डेप्रिशिएटमध्ये आहोत ही बाब सभागृहाच्या निर्दशनास आणावी.

**प्रफुल्ल पाटील :-**

प्रत्येक पेजवरील एक एक शिर्षक घ्या. एक एक मुद्दा घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, पहिले पाच मिनिटे बोलू द्या नंतर पेजवाईज जा.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, हे जे यावेळेचे बजेट होते खरोखर आमचा अपेक्षा भंग झालेला आहे. आम्हाला वाटले होते की, आमचे महापौर मारवाडी आहेत तर मारवाडी बजेट सादर होईल.

**मा. महापौर :-**

हे स्थायी समितीने सादर केलेले आहे. मी अजुन ते केलेले नाही. आश्वासन देतो, बजेट मंजुरीच्या अगोदर बरेचसे चेन्जेस होईल.

**मिलन पाटील :-**

तर हे खरोखर फुगवलेले बजेट आहे आणि ते फुगवले कशाकरिता तर आपल्याला आर्थिक कर्जाचा बोजा पाहिजे. आपल्या माथी कर्जाचा बोजा पाहिजे म्हणून हे बजेट फुगवलेले आहे. बजेट जर फुगवलेले असेल तर आपल्याला कर्ज जास्त उचलता येणार नाही पण ॲक्च्युअलमध्ये आपला जो बजेट आहे १६०, १७० पर्यंत तुम्ही बघा, तुम्ही मारवाडी महापौर आहात. बघा १७० च्या पुढे जाणार नाही. काटकसर करा १७० मान मान १७५ आणि येथे ४०० करोडचे बजेट केलेले हे काय हिशोबाने केलेले आहे. ह्याचे हेड आहे. आतापर्यंत वैती साहेब जसे बोलले का, ११ करोड रू. आपले या लाईटला जातात. अरे तुम्ही, ज्याच्याकडून आपल्याला १० रू. इनकम नाही त्याच्या दारात तुम्ही स्ट्रीट लाईट लावता. त्या श्री. जानकरला काय त्याची अपेक्षा आहे, काय हेतु आहे, तो डिप्लोमा होल्डर आहे. त्यांना काय गावाची जाण आहे का? त्यांना गावाचे काय पडलेले आहे? त्यांना फक्त त्यांचे वॉकपोल पडले पाहिजे. मग त्यांचे पैसे लागू होतात. ह्या पैशांची त्यांना काय आहे का? ते लावून देतात धडाधड काल परवा ते भाईंदरमध्ये आलेले आहेत आणि ते इंजिनिअर झालेले आहेत. ह्याचा प्रशासनाने सुद्धा, महापौर साहेब तुम्हाला सांगतो की, तुम्ही ह्याच्यापुढे कात्री लावली पाहिजे त्यांचे अधिकार काढून घ्यायला पाहिजेत. तर काय इंजिनिअर आहे का? ११ करोड रू. बोलले ते बरोबर आहे का? ११ करोड रू. आज आमच्या जनतेला भरायला लागतात त्यांचे काय जाते? १० रू. देणारा माणूस आहे त्याच्या दारात तुम्ही पोल लावता काय कशाकरिता त्याला एवढी सुखसुविधा द्यायची? दुसरे, आतापर्यंतचे जे हेड शिल्लक आहेत ते परस्पर दुसऱ्याकडे ती रक्कम वर्ग केली जाते. साहेब, महासभा कशाकरिता आहे? जे महासभेचे अधिकारच आहे आमचे अधिकार हे अधिकारी लोक छिनुन घेतात आणि आपण गप्प बसतो. हे कशाकरिता आपण गप्प बसतो? आपल्याकडे बजेट हे आत्ता देतात. आत्ता दिल्यानंतर जे शिल्लक असते. ते महासभेकडून त्यांनी मान्यता घेउन वर्ग करायला पाहिजे. कुठल्या ह्याच्यामध्ये काय आहे ते स्थायी समितीचा अधिकार वेगळा आहे. महासभेचा अधिकार वेगळा आहे. तर ते आत्तापर्यंत कधी झालेलाच नाही. सहा सात वर्षे झाले तरी महासभेमध्ये ते कधी आले नाही. महासभेच्या पुढे हे वर्ग करण्याकरिता अजुन एक सुद्धा विषय कधी आलेला नाही हे वर्ग झाले ते कोणी केले? साहेब, तुमचा अंश पाहिजे. प्रशासनाचा अधिकाऱ्यांच्या वर अंश पाहिजे हे वर्ग केले जातात ते गैर आहे. ते गैर आहे ते कोण सिद्ध करते. ज्याला इष्टांक दिलेला नाही तो इष्टांक त्याने वसुल करायचा नाही. तुम्ही त्याचे एक एक इनक्रीमेंट कमी करा. काल जसे विजय पाटील ह्यांनी केले तर त्यांना एक इनक्रीमेंट जास्त द्यायचे आहे तसे जे इष्टांक पुर्ण करत नाही ते दिले? कशाकरिता? बजेटचा काय अर्थ आहे. जे करत नाही त्याचे एक एक इनक्रीमेंट कमी करून टाका. त्यांना मी तर सांगतोय डिग्रेट करून टाका. जे ह्या वसुलीकरिता नाही. प्रशासनाला ते स्वतःची खळगी भरण्यासाठी आहेत. काय गरज आहे. अशा अधिकाऱ्यांची आणि त्या अधिकाऱ्यांना ह्याची जाण काय आहे? आज तुम्ही बघा

अग्निशमन दलाला आपण भरपुर आणून देतो. ५९ हजार रू. त्यांनी वसुल केलेले आहेत ते वसुल दुसरे कोण करणार आहेत. आपण त्यांना ६ करोडचा इष्टांक दिलेला आहे आणि आज तो ५० हजार रू. एवढा मोठा अधिकारी, आपण एवढे मोठे त्यांना खर्च करतोय अग्निशमनवर आपल्याकडे काय रोज आगी लागत नाही. तरीसुद्धा आपण खर्च करतो. खर्च करण्याची त्या अधिकाऱ्याची जाण काय आहे? लाल बत्तीमध्ये किंवा पिवळ्या बत्तीमध्ये फिरला तर तो काय मोठा अधिकारी झाला आहे का? आज तुम्ही बघा. त्या अधिकाऱ्यावर खरोखर कार्यवाही करायला पाहिजे. काय वसुली करत नाही. असे अगोदर केल्याचे नंतर तुम्ही पावत्या फाडून देतात. ठिक आहे, इमरजन्सी कधी गेली तर गोष्ट वेगळी आहे. तुम्ही बघा या बजेटमध्ये सुद्धा किती आपण खर्च करतो. त्यांच्यासाठी पण वसुली पण काय पाहिजे का नाही. वसुली काय होत नाही व अधिकाऱ्यांच्या मागे सहा सहा करोड रू. खर्च करायचे आपण जो इष्टांक देतो ह्याच्याबाबतीत एक कडक धोरण आपण केले पाहिजे. जो तुम्हाला जे बजेटमध्ये तरतुदी आहेत. ज्या हेडखाली ते बजेट उरलेले आहे, केलेले आहे ते महासभेसमोरच आले पाहिजे. त्यानंतर तुम्ही वर्ग करायचे आहे. आपला जो नगररचनेचा भाग आहे, आपण ठरवले काय, आपण केले काय? त्याच्याकरिता उलटे आपण त्यांना कमी दिले १३ शे करोड रू. आपण त्यांना दिलेले आहे. परत ह्याच्यामध्ये ८०० दिलेले आहे. कशाकरिता? आपले काय सगेसोयरे आहेत. त्याच्यात ते त्यांनी जी वसुली केलेली आहे. त्यात आपले ठरलेले होते की, ज्या बिल्डरने जी बिल्डींग बांधलेली आहे त्याच्यासमोरचा भाग त्यांनी लाईट, पाणी, गटर वगैरे करून त्यांनी पुर्ण करून हॅन्ड ओव्हर करायला पाहिजे तर त्याला ॲक्युपेशन दाखला द्यायचा असे आपले महासभेमध्ये ठरलेले आहे. दिलात का बघा तुम्ही? किती किती लाख रू. करोड रू. चा येथे नुकसान झालेला आहे मी तर सांगतो की, त्या अधिकाऱ्याकडून भरून घ्या. महासभेचा अर्थ कशाकरिता आहे? आपण महासभेला कशाला येतो? वेळ घालवण्यासाठी का वेळ घालवण्यासाठी आपल्या घरी वेळ जात नाही म्हणून येतो. ज्या गोष्टी येथे ठरल्या जातात त्याचे काही होत नाही. ह्या अधिकाऱ्यांच्या वर तुम्ही कठोर कार्यवाही करायला पाहिजे आज करोड रू. चे नुकसान करणारा अधिकारी कशाला आपल्याकडे पाहिजेत.

**राजेंद्र जैन :-**

जैसे की, अभी पाटील साहब ने बोला यह सब बाते बार बार सदन की निगाह मे लायी गयी है। जो बिल्डर सो पहले गटन बनवाने की बात है यह महासभा मे प्रस्ताव पास हुआ है। उसकेबाद आपके खुद के नजर मे मैने परवाना डिपार्टमेंट की कमी लायी थी। पर मेरे पास लिखीत मे बताया था की, इतने लोगो का १४-१४ साल से परवाना बाकी है। उसमे भी आप लोगोने अभी तक कोई एक भी एक्शन नही किया गया है। अगर १० मिनिट लगते है और १४ करोड रू. लगते है तो १० मिनिट लगने दिजिए। ॲक्शन क्या लेंगे इसका जवाब दिजीए। सुनने का और समझने का इसका कोई मतलब नही।

**मा. महापौर :-**

वह विषय पर चर्चा करेंगे ।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, सर्व प्रथम हमारे सन्मा. नगरसेवक मिलन पाटीलजीने मारवाडी, मारवाडी बहुत बार गुन गाया है। मारवाडी को आपने महापौर बनाया है और अगलीबार ऑडीटर भी मारवाडी ना हो। फिर आपको दिखाते है की, कितना फरक आता है। दुसरी बात जो आप बोल रहे है की, हमारा अधिकार छीन लिया। जब आप दोनो की युती थी तब महासभेने सब अधिकार स्थायी समिती को दिया है। अब महासभाने सब अधिकार स्थायी समिती को दिया है। अब वापस वह अधिकार महासभा मे ले लो। तो शायद आपको यह आपकी दुःखद बात इधर करने का मौका नही मिलेगा। यह शायद आपको मालूम नही होगा। सन्मा. नगरसेवक चंद्रकांत वैती साहब ने बताया की, हर बजेट मे अधिकारी लोग अपनी बात या अपने इष्टांक को पुरा नही करते आज इस बजेट मे धन्यवाद किसको देने का, प्रशासन को देने का, स्थायी समिती को देने का या बाद मे महापौर साहब जो बजेट फायनल करेंगे तो उनको देने का। यह पेज का विषय है। सबसे पहले महापौर साहब आपको बताता हु स्थायी समिती के हमारे भी सदस्य थे। कॉंग्रेस के भी सदस्य थे। मै उस मुद्दे पर बादमे आता हु। शायद इसमे बहुत गदारा होगा। सबसे बडी बात है जब वैती साहब ने विषय निकाला प्रॉपर्टी टॅक्स, ये बात सही है। आज प्रॉपर्टी टॅक्स मे कमी आयी है। हमने महापालिका मे दो प्रस्ताव पहिलीबार ऐसे आए है। एक जो खुली जगह है उस खुली जगह पर टॅक्स लगाने का और इललिगल बांधकाम है उस इललिगल बांधकाम मे तीन गुना टॅक्स लगानेका यह प्रस्ताव को देखकर के ही पिछली बार महापालिका मे ५० करोड की तरतुद हमने की थी। उस वक्त मे भी था। आज पुरे साल का अगर हमलोग विश्लेषण करेंगे, जैसे मैने बताया की, किसको दोष देना चाहिए। आज महापालिका मे ऐसी दशा है की, अधिकारी जिस डिपार्टमेंट है उस डिपार्टमेंट काम नही कर रहा है। आज हाउस टॅक्स का जो विषय है। उसमे जितने कर्मचारी चाहिए टॅक्स वसुली करने के लिए, बिल देने के लिए। आज वह सब अधिकारी सेस ऑक्ट्रॉय नाकेपर है। आप किसको दोष देंगे? जब अधिकारी वर्ग नही जिस डिपार्टमेंट के अंदर मे और सबसे बडी बात जैसा ट्रॅफिक पुलिसावाला जब ट्रॅफिक की गाडी पकडता है, तो चलन बनाने का काम उसका, उस गाडी की टोचन करके लेके जाने का काम दुसरा और उसके उपर गुन्हा दाखल करने का काम कोर्ट का ऐसे

तीन अधिकारी होते है। हमारी महापालिका मे भी जो खुल जगह पर टॅक्स लगाने का विषय आया। हमारे आयुक्त साहब ने १०/४ को आदेश निकाला की, खुली जगह पर टॅक्स जब तक उसका कम्प्लीटीशेन सर्टीफिकेट नही देना चाहिए। पाणी का कनेक्शन नही देना चाहिए। ऐसा आदेश निकालने के बादमें भी हमारे नगररचना विभागने सभी को ऑक्युपेशन सर्टीफिकेट दे दिया। पाणी डिपार्टमेंटने पानी का कनेक्शन दे दिया। यह आप किसका दोष मानेंगे। यह दोष क्या कर डिपार्टमेंट का है? इसमे एक बात नक्की है। कुछ जबाबदारी कॉडीनेशन के साथ मे होती है। ये कार्डीनेशन महापालिका मे नही है। टॅक्स डिपार्टमेंट चाहता है की, नगररचना हमे सब अवगत कराए। टॅक्स डिपार्टमेंट नगररचना को पत्र देता है। दोनो पत्र आपस के फाईल मे चले जाते है। कोई किसीका ध्यान नही देता है। आप को जब मालूम है की, खुली जगह का टॅक्स का विषय १६८ ऐसे लोगो के उपर यादी दी गयी। आज महापालिका के पास वह यादी है के नही? कितने लोगो के साथ मे वह टॅक्स वसुल किया? कितने साल का मोकळे जगह का टॅक्स झीरो दिखाया। इस साल ४ करोड दिखाया है। लेकीन बोलने का मतलब जो काम नगररचना को करना चाहिए था, जो खुली जगह का टॅक्स आज जब वह विकास कर लेते है, खुली जगह के टॅक्स की जबाबदारी नगररचना को आपको देनी चाहिए। क्योंकी वह ऑक्युपेशन सर्टीफिकेट देते है। वह आपको कम्प्लीट सर्टीफिकेट देते है। और यह चिज पर कोई ध्यान नही देता है। नगररचना छुट जाता है। वह अपना जैसा अभी प्रफुल्ल पाटील साहब ने बताया की, अपनी अपनी दुकान चालू है। किसीको किसीसे मतलब नही है और इसका कामयाना महापालिकाके आम नागरिक को भुगतना पडता है। महापौर साहब, एक बात बताउंगा, हमारे सभापती साहबने ४ चीजो मे जो सबसे बडी रक्कम बढाया है जाहिरात कर, और इसका जब विषय आया तो इस विषय को मैने हर महासभा मे बताया आप जाहिरात कर के लिए, एन.ओ.सी. जो दुकानदारो को एन.ओ.सी. दी उसकी आप सरल पद्धती किजिए। एक लम सम अमाउंट सभी के लिए किजिए लेकीन इस साल हमारे सभापती साहबने उसपर हमारे कॉंग्रेस के नगरसेवक हमारे बी.जे.पी. के नगरसेवक, जिस राष्ट्रवादी के नगरसेवक शिवसेना जिस खाते मे ३० लाख रू. उत्पन्न होते है। ३० लाख रू. मे पुरे साल मे उसमे १० करोड की आवक दिखाईए। अभी उनका ३० लाख रू. और १० करोड रू. इतना डिफरन्स क्यो समझ मे नही आया। वह कैसे वसुल करनेवाले है। वह मुझे भी समझ मे नही आता है। मैने ३० लाख रू. ९ करोड रू. का डेप्रिशिएट तो खाली एक ही हेड मे आप इसको कैसा और कैसे दोष दे। स्थायी समिती को दोष्ज्ञ दे, मैने जैसा बताया की, आपको आयुक्त दोष दे। यह विषय इस साल जो बजेट है, अभी आप जब पान वाईज जाऐंगे तो कुछ चिजे ऐसी है, जिसके उपर बहुत ध्यान दे। हम हॉस्पीटल चालू करनेके मुड मे नही है क्या? दवा के लिए १ करोड रू ३ साल से ु करोड रू. आ रहा है। इसका मतलब किसीकी भावना नही है की मिरा हॉस्पीटल चालू हो। एक करोड रू. मे दवा आऐगी क्या? इस चीज को किसीने ध्यान नही दिया लेकीन गटर, नाले साफसफाई के लिए १६ करोड का २१ करोड रू. लेकीन आरोग्य का दवाखाने का किसीको सोच नही आया। यह सब चीज जब आप पेज वाईज लेंगे, जिसको आप गंभिरता से लिजीए। ऐसा आपको निवेदन है।

**मा. महापौर :-**

जे तुम्हाला अपेक्षित आहे त्याच्यावर बोला.

**अनिल सावंत :-**

स्थायी समिती सदस्य आहेत. त्यांना मी सुचना करतोय, मा. नगरसेवकांनी, वारंवार येथे स्थायी समिती सदस्यांचा उल्लेख केला त्यांच्याविषयी संशयाचे वातावरण निर्माण केले. तीन दिवस स्थायी समितीने ह्याच्यावर चर्चा करून बजेट फायनल केलेले आहे. मला वाटत नाही फुगवून बजेट, फुगवून बजेट, तर कुठे फुगवले आहे हे मला कळत नाही. पण स्थायी समितीने चर्चा करून बजेट फायनल केलेले आहे. ज्यावेळी तुम्ही फिगर चेंज कराल किंवा एखाद्या हेडबद्दल तुम्हाला काय संशय असेल तर स्थायी समितीचे सभापती येथे आहेत किंवा स्थायी समितीचे सदस्य आहेत त्याची सुद्धा मत त्यावेळी विचारात घेतली जावीत.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**प्रशांत पालांडे :-**

सन्मा. महापौर साहेब, खतगांवकर साहेब, सन २००९ – १० चा मुळ अंदाजपत्रक सादर करतेवेळी कोणत्याही प्रकारची मिरा भाईंदरच्या नागरिकांवर कुठल्याही प्रकारे करावा बोझा आपण लादणार नाही त्याबद्दल स्थायी समिती व प्रशासनाचे मनापासुन आभार मानतो. मुंबई महानगरपालिकेचे बजेट झाले व ठाण्याचेही झाले प्रत्येक महानगरपालिकेने आपल्या उत्पन्नामध्ये वाढ दाखवलेली आहे. पण आपल्या बजेटमध्ये जर निट बघितले तर वाढ तर सोडा जवळ जवळ १ करोड रू. आपण जर घट दाखवलेली आहे तर हे उत्पन्न आपल्या महानगरपालिकचे वाढवण्यात आपण अपयशी ठरलेले आहोत. दुसरी गोष्ट, आपले जे सुधारीत अंदाजपत्रक आहे त्याच्यामध्ये जवळ जवळ ३७ कोटीची शिल्लक दाखवलेली आहे. पण आत्ता जे आपण मुळ अंदाजपत्रक सादर करतोय त्याच्यामध्ये शिल्लकीचा कुठे उल्लेख केलेला नाही. असे काय झाले आहे ? म्हणजे ते येणारच नाही असे आपण गृहीत धरलेले आहे का ?

**बालाजी खतगांवकर सो. (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नवीन वर्षाचा जो अर्थसंकल्प आहे आणि जुन्या सुधारीत रक्कमा आहेत त्या ३१ मार्च पर्यंत खर्च होतात असे अपेक्षीत असते. शिल्लक राहुन कॅरी फॉरवर्ड होण्याची जर परिस्थिती असेल तर शिल्लकमध्ये येते. अपेक्षीत शिल्लक जितकी दाखवली आहे ती तीतकीच आहे.

**प्रशांत पालांडे :-**

यावर्षी आपण जो सुधारीत अर्थसंकल्प सादर केलेला आहे. त्यात ऑक्ट्रॉयमध्ये आपला जो लॉस झालेला आहे, खतगांवकर साहेब, गेल्यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये अपेक्षित उत्पन्न आहे. ऑक्ट्रॉयमध्ये आपले नुकसान झालेले आहे आणि घरपट्टी पण बरीचशी बाकी होती. वसुल होतील अशी काही चिन्ह दिसत नाही म्हणजे या अर्थसंकल्पामध्ये आपण साधारणपणे १० कोटीने सुरूवातीपासुन आपण मायनसमध्येच आहोत. असे धरायला मला वाटते काही हरकत नाही. मग ते १० कोटी मायनस आहे ते आपण पुढे कुठे ॲडजेस्ट करणार आहोत? आणि जे उत्पन्नाची साधन दाखवलेली आहेत. मगाशी वैती साहेबांनी सांगितले की, एस्कॉर्ट मधून आपण अडीच कोटी आयुक्तांचे अंदाज आहेत त्याबद्दल बोलतोय.....

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य कुठल्या हेडविषयी असेल तर आपण त्यावेळी चर्चेला बोलू. आता, सभागृहाचा बराच वेळ जाईल. जनरल आपले काही असेल तर सांगा बाकी आपण पेजवाईज जाणार आहोत. माझे जे विचार आहे ते मी सभागृहापुढे आणतो, मागच्यावेळी आपण पेज टू पेज, हेडवाईज, लाईनवाईज आपण बजेट तयार केले होते आणि नक्कीच ज्यावेळी ८० नगरसेवक एखादा कुठल्या विषयावर चर्चा करतो. आपल्याला १५ वर्षे, १० वर्षे, ५ वर्षे या महापालिकेचा अनुभव आहे. प्रत्येक डिपार्टमेंटचा अनुभव आहे. खात्याचा अनुभव आहे. बजेट जे आपण बोलतो दरवेळी फुगवले आहे, फुगवले आहे, फुगवले आहे. एक उदा. आता देतो की, आयुक्तांनी यावर्षी बजेटबद्दल जी प्रस्तावना दिलेली आहे. ते ४५० करोड आहे किंवा ४२३ करोड आहे आणि जे स्थायी समितीच्या सदस्यांनी सुचवले आहे ते फक्त ३० करोड रू. वाढीव आहे. म्हणजे आपण जे काय जास्त सुचवले ते ३० करोड रू. आहे. म्हणजे माझे असे मत आहे की, एखादा डेप्रीशिएट आला तर ३० करोड पर्यंत यायला पाहिजे जसे आम्ही सुचवलेले आहे पण ज्या अधिकाऱ्यांनी बसुन हे बजेट केले आहे तर कमीत कमी त्या टारगेटला काम पोहचत नाही हा एक महत्वाचा विषय आहे. म्हणजे आपण एखादा मागच्यावर्षी ४०० करोडचे केले असेल आयुक्तांनी आणि अधिकाऱ्यांनी प्रस्तावांना दिली असेल ३८० करोड रू. म्हणजे आपले नेहमी असे असेल की, खर्चाची इनकम बाजु वाढवली. तर खर्च वाढवू पण ज्यावेळी अधिकारी बजेट देतात तेव्हा नक्की त्यांचा अनुभव, त्यांचा सगळा बॅकलॉक विचारात घेउन ते बजेट तरी त्या टारगेटला पोहचत नाही. वैती साहेबांनी सांगितल्याप्रमाणे डेप्रीशिएट किती २०० करोड, १०० करोड रू. एवढे डेप्रिशिएट मग आयुक्तांना कोणी प्रेशर केले की तुम्ही हे सगळ फुगवून द्या आणि स्थायी समितीचे सदस्य तीन तीन दिवस ह्याच्यावर विचार करतात तर नक्कीच प्रत्येक नगरसेवक प्रयास करतो, घरी अभ्यास करतो आणि आपली भावना स्थायी समिती मध्ये ठेवल्यानंतर त्याच्यावर विचार केला जातो आणि मंजुरी देते. आता ह्याच्यामध्ये काही बदल असे आहेत की, आपण रिकव्हरी केली नाही तर कदाचित बॅलेन्स होउन पुढच्या वर्षी येउ शकतात. एखाद्या टॅक्सची आपली करन्ट ४१ करोड रू. करंट डिमांड आहे ते बिल आपण गृहीत धरू १३ करोड वसुल झाली व बाकी नाही झाली तर आपल्याला पुढच्यावर्षी करता येईल पण काईक खाते असे आहेत की, ह्यावर्षी आपण दिले नाही तर पुढच्यावर्षी आपल्याला मान्यता ही येणार नाही. ती रक्कम मी आता बघितली आहे साधारण ६०, ७० करोड रूपये आहे. म्हणजे एखाद्या अधिकाऱ्याने काम केले नाही व १० करोड रू. आपले डूबवले ते पैसे आपल्याला परत येउ शकत नाही. असे बरेचसे डिपार्टमेंट आहेत. आरोग्य असेल, कर असेल किंवा परवाना विभाग असेल. त्यांनी जर कार्यवाही केलीच नाही आता आपण त्या दुकानात जावून सांगायचे का, आम्हाला पाच वर्षाचे पैसे द्या किंवा दहा वर्षाचे पैसे द्या. अग्निशमन कर ज्यावेळेला रिन्युअल असते. आपण फायर एन.ओ.सी. देताना ११ महिन्याची एन.ओ.सी. देतो आणि त्याचे रेट पण खुप हाय आहेत. एक बिल्डींगला साधारण आपण १-१ लाख रू. एक - एक एन.ओ.सी. ला घेतो आणि रिन्युअल १० टक्के घ्यायचो. म्हणजे एका इमारती कडून आपल्याला १०-१० हजार रू. घ्यायचे आणि गेल्या चार वर्षे आपण ते केले नाही. तर आपण आज जावून मागितले का आम्हाला पाच वर्षाचे पैसे तुम्ही द्या. सोसायटी आम्हाला देणार का? पण ज्या अधिकाऱ्याने ह्या प्रकारचा आमचा रेव्हेन्यु कायम स्वरूपी ठेवलेला आहे म्हणजे एखादा आपला प्रायव्हेट कंपनीमध्ये कर्मचारी काम करतो तर त्याचा आपण निर्णय घेतो. ह्याला ससपेन्ड करा. ह्याला कामावरून काढा. ह्याला दंड करा किंवा ह्याची बदली करा. काहीतरी आपण नक्कीच करतो. एखाद्या भावाने जरी नुकसान केले तरी आपण काहीतरी निर्णय घेतो. पण ह्याठिकाणी जो लॉस परमनंट म्हणजे आता भविष्यात तुम्ही ठरवले काय आणि मी ठरवले काय तरी येणार नाही. ह्याप्रकारे जो करोडो रू. लॉस केलेला आहे. त्या अधिकाऱ्यावर आपण कुठल्याप्रकारे निर्णय घ्यायचा त्याचे गांर्भियाने विचार केला पाहिजे. कारण आपण परत अपेक्षित करणे हे पैसे येणार आहे आणि जो अधिकारी कामच करणार नाही आणि पैशांची रिकव्हरी करणार नाही आणि पुढच्यावर्षी आपल्याला तो रेव्हेन्यु येउच शकत नाही. त्या ह्या पेमेन्टचा आपण काय करणार आहे? त्याला दोषी कोण? आज १०० करोड रू. ह्या वर्षाचे नुकसान झाले आहे त्याला

जबाबदार कोण? उदा. सांगतोय की, आज आपली बरीचशी काम पेन्डींग आहेत. म्हणजे १० करोड रू. डी.पी. रस्तेचे पेंन्डींग आहे. आपण ते वापरले नाही. हॉस्पीटलचे ८ करोड रू. वापरले नाही. सब-वे चे ८ करोड रू. वापरले नाही. जे.एन.एन.यु.आर.एम. चे पैसे आपण वापरले नाही. प्रभाग निधी आपण वापरलेला नाही. ६ करोड रू. फायरस्टेशनचे आपण वापरलेले नाही. म्हणजे एखादे हे १०० करोड रू. वापरले असले तरी हाच बजेट नाही वापरले तरी हाच बजेट म्हणजे काही कारणाने १०० करोड रू. आपण वापरलेच नाही.

**मिलन पाटील :-**

साहेब, आता तुम्ही बोललात की, प्रतिनियुक्तीवर येणारे जे लोक आहेत ते महासभेपुढेच येउ दे ह्यांच्यावर आपण बंधन टाकू.

(सभागृहात गोंधळ)

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर साहेब, आपण सभागृहात आपले निवेदन करावे फक्त सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांना सर्वांच्यावतीने विनंती करा की, सगळ्या गोष्टी जातीवर घेउ नका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ज्याने सुरूवात केली तेव्हा तोंड बंद होती. त्यावेळी तुम्हाला मजा येत होती. उस समय मारवाडी शब्द का मजा ले रहे थे।

**मा. महापौर :-**

शांततेने समजुन घ्या. म्हणजे मी जे विषय बोलतोय ही महासभा संपली की आपल्याला ही माहित आहे की, परत कोणी विचार करणार नाही. या प्रकारचे काम चालणार आहे. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी चांगला अभ्यास केला आहे. त्यांचे ही तेच मत आहे. सन्मा. सदस्य वैती साहेबांचेही तेच मत आहे की, एखादा अधिकारी ज्यावेळेला अपल्याला बजेट निवेदन करतो त्यावेळी नक्कीच त्याने अभ्यास करून केलेला असतो. पण ह्या भविष्यात पण जिथपर्यंत आपण त्या अधिकाऱ्यावर मी कुठल्याही अधिकाऱ्याला वैयक्तिक दोष देत नाही. पण त्यांच्यावर जिथपर्यंत कंट्रोल राहणार नाही. ह्याचप्रकारे १०० करोड रू. दरवर्षाला डुबत राहणार आहे. जे आपण कुठल्याही नागरिकांकडून मागू शकत नाही. आणि दरवर्षी बजेटमध्ये हेच डेप्रीशिएट येत राहणार आहे. आता मुळ मुद्दा असा होता की, ज्यावेळी आपण दिडशे करोड वापरलेच नाही आणि वापरले असते तरी हेच बजेट, नाही वापरले तरी हेच बजेट म्हणजे सन्मा. सदस्य मिलन पाटील ह्यांनी सांगितले की, बरीचशी अपेक्षा होती. पण माझे तर वैयक्तिक मत असे होते की, ज्यावेळी आपण येणाऱ्या चार महिन्याची रक्कमा अपेक्षित दाखवतात की, एवढी रक्कम अपेक्षित आहे आणि खर्च जो आहे तोही करणे अपेक्षित आहे म्हणजे एखादे ३३० करोड रू. अपेक्षित आहे. मी त्यांना सांगितले आज तुमच्याकडे ॲक्युरेट फिगर असायला पाहिजे की, तुम्ही कोणा कोणाला पेमेंट द्यायचे बाकी आहे ती रक्कम तरी काढा. आज कशाला बोलतात की, ३३० करोड रू. रक्कम अपेक्षित आहे. म्हणजे जे कायच आपण केले नाही. हॉस्पीटलचा पेमेंट द्यायची गरज नाही मग कसे सांगू शकतो की, अपेक्षित आहे ३३० करोड रू. खर्च मग आज तुम्हाला नक्की माहित आहे की, कोणाला पैसे द्यायचे, कोणाकडून पैसे घ्यायचे? एखाद्या टॅक्स डिपार्टमेंटने सांगितले तर टॅक्स डिपार्टमेंटकडे नक्कीच फिगर आहे की, त्याने बिलाची किती मागणी केलेली आहे. मग त्याप्रमाणे जिथपर्यंत बजेट होत नाही तिथपर्यंत हे असेच चालत राहिल. म्हणजे जे झाले तरी ठिक आणि नाही झाले तरी ठिक ह्याप्रकारे चालत राहिल आणि उद्या ३३० करोड रू. मध्ये १ रूपया वसुल झाला नाही तर आपण येथे १० करोड, २० करोड रू. रस्त्याला किंवा डिपार्टमेंटला प्रोव्हीजन करणार आणि हे मागचे बॅकलॉक भरायला ते पैसे वापरून टाकणार मागच्या वेळेचे आपल्याला आठवण आहे की, नाही. १० करोड रू. आपण रस्त्याला प्रोव्हीजन केले होते. ज्यावेही विचारले की, रस्त्याचा विषय द्या त्यावेळी सांगितले की, ते पैसे आम्ही वापरले तर कुठे वापरले? बोलतात की, सात रस्ते चालू आहे मग बोललो, त्यावेळी बजेटमध्ये का नाही सांगितले की, ते पैसे आम्ही वापरले तर वापरले कुठे? बोलतात की, सात रस्ते चालू आहे. मग बोललो, त्यावेळी बजेटमध्ये का नाही सांगितले की, आम्हाला सात करोड रू. त्यासाठी पण लागणार आहे. दोन कोटी ह्यासाठी लागणार आहे. असे कोणी सांगितले नाही. आज पण आपण प्रोव्हीजन करतोय. ज्यावेळी आपण त्यांना कामाला जाणार जसे श्री. पाटील साहेबांनी सांगितले की, आपण विचारले पुढच्यावेळी कुठे तर बजेट संपले. विचारले पैसे कुठे आहे, तर मागची थकबाकी होती त्यांना दिली तर सभागृहालाही माझे असे निवेदन राहिल की, मागच्या थकबाकीला काय झाले, कोणी खर्च केला ते आता आपल्या हातातुन निघालेले आहे. जी थकबाकी आहे व काम झाल्यावर पैसे आपल्याला नक्कीच द्यायला लागेल. कोणी चुक केली तरी ते पैसे कमी होणार नाही. किंवा कुठलाही ठेकेदार सोडणार नाही किंवा रस्तेवाला सोडणार नाही तर त्याचा ही विचार केला पाहिजे. नक्की तुम्हाला बॅलेन्स ॲज ऑन टुडे किती पैसे द्यायचे बाकी आहे? १० करोड रू. पेमेंट चुकवायचे आहे की २० करोड रू. चुकवायचे आहे की १०० करोड रू. चुकवायचे आहे ते लक्षात घ्या. त्याशिवाय हा बजेट स्ट्रीट लाईट भविष्यात सुद्धा होणार नाही. आज ही होणार नाही. उद्या होणार नाही. आपण एखादे बोलणार, तुम्ही बोलणार मी बोलणार आणि संध्याकाळी घरी गेल्यानंतर हीच गोष्ट राहणार तर नक्कीच आपण ज्या ज्या हेडवर विषय करू तेवढ्या शांततेने करू या आणि सगळ्यांनी बोलण्यापेक्षा पक्षाचे

एक किंवा दोन व्यक्तीने बोलले तर व्यवस्थित अधिकाऱ्यांना आपल्याला समजावता येईल त्यांच्याकडूनही आपण एक एक डिटेल घेउ. गरज पडल्यास आपण चार दिवस, पाच दिवस बजेट चालवण्यासाठी माझी सुद्धा तयारी आहे. आणि मी आता श्री. खतगांवरक साहेबांना विचारले एकदा बजेट सुरू झाले तर दुसऱ्या दिवशी असेल तर त्याला आचार संहिता लागते का? तर तेही कन्फ्युजनमध्ये आहेत. म्हणजे आपण आज बजेट चालू केले व उद्या आचारसंहिता लागली तर वी आर ऑलरेडी स्टाटेड द मिटींग म्हणजे ते आम्हाला लागणार नाही. माझ्या माहितीप्रमाणे तर तसेच, त्याप्रमाणे आपण हा बजेट कंटीन्यु करू. दोन दिवस गेले तरी हरकत नाही पण कमीत कमी ह्याला कुठेतरी आपण सिस्टममध्ये आणले पहिजे. अन्यथा हे वर्षानुवर्षे असेच चालत राहणार आहे. तुम्ही कितीही बोंबलत राहा मी कितीही ओरडत राहणार तरी हे सगळे असेच याप्रकारे चालणार आहे. आणि ज्या अधिकाऱ्याने कायम स्वरूपी महापालिकेचा करोडो रूपयाचा नुकसान केला आहे त्याला कुठेतरी शिक्षा झाली पाहिजे. त्याला फक्त दोन रूपये फाईन करा पण फाईन करा. एक दिवसासाठी निलंबित करा अन्यथा हे १० करोड, २० करोड रू असेच डुबत राहणार आणि ह्या पैशांचे भविष्यात सुद्धा उत्पन्न होणार नाही. धन्यवाद.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, याठिकाणी आपण चांगले वक्तव्य केलेले आहे. कारण जवळ जवळ महापालिकेचे आर्थिक नुकसान जे अधिकारी करत आहेत ते तुम्ही आज सांगितले आणि बजेटमध्ये दिसत आहे. परंतु महापौर साहेब आम्ही वर्षातुन एकदा तुम्हाला बजेट मंजुर करून देतो. त्यानंतर वर्षभर कारभार चालवण्याचे काम तुमचे आहे आणि आयुक्तांचे आहे. जर जो अधिकारी अशाप्रकारे वागतो ते आयुक्तांकडून तुम्ही त्यांच्यावर कार्यवाही का करून घेत नाही. आज सभागृहामध्ये तुम्ही एवढे वक्तव्य करता त्याने लोकांमध्ये मेसेज काय जाणार की, आपण सर्व सदस्य हतबल झालेलो आहोत या प्रशासनासमोर जर महापौर अशापद्धतीने वक्तव्य करत असतील तर सर्व सदस्य हतबल आहेत या अधिकाऱ्यांवर वर चढून काम करून घ्यायला हे तुमचे म्हणणे सर्व आम्हाला मान्य आहे.

**मा. महापौर :-**

माझे हे अधिकार आहेत त्या अधिकाराच्या वर मी जावू शकत नाही.

**प्रकाश दुबोले :-**

तुम्ही महापौर आहात तुमच्याकडे भरपुर अधिकार आहेत.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी सांगितले मी ज्यावेळी सांगितले होते की, प्रत्येक नगरसेवकांना त्रैमासिक जो काही अहवाल असतो तो द्या. पण अधिकाऱ्यांनी दिली नाही. वारंवार चर्चा झाली तरी काय झाले नाही आणि सन्मा. सदस्य चंद्रकांत वैत्ी साहेबांनी सांगितले, ते काय सांगायचे होते त्यांच्या भाषणात माझे थोडक्यात हेच म्हणणे आहे की, ही जी गोष्ट आहे ती स्थायी समितीपुढे दर महिन्याला जात असते की, किंवा त्यांच्याकडून क्वॉटरली जात असते त्यांना जास्त ह्याच्यावर नियंत्रण ठेवता येईल आणि एखादा, मी कितीही बिझनेस मॅन असला तरी माझा अकाउंटन्ट आणि सी.ए. त्यांचे काम मेजर असते की, त्यांनी सगळे ह्या गोष्टीचे पालन करायचे.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, जर आसा प्रकार आहे तर तुम्ही महिन्याला गटनेत्यांची मिटींग घेउन त्यांच्या निर्दशनास आणा मग महासभेत कोणत्या अधिकाऱ्यावर काय कार्यवाही करायची हे महासभा ठरवेल. आमच्या पक्षाचे गटनेते आम्हाला सांगतील की, अशी अशी परिस्थिती आहे. तुम्ही निर्दशनात आणतच नाही. बजेट आल्यानंतर तुम्ही आज सभागृहाला ही परिस्थिती सांगत असाल तर आम्ही तरी काय करायचे? पुर्ण वर्षे झाले लॉस झाले आणि तुम्ही आज आमच्या निर्दशनास ह्या बाबी आणून देता.

**मा. महापौर :-**

आज आता असे झाले आहे आपण निर्णय घेउ या प्रत्येक तीन महिन्यांनी त्रैमासिक अहवाल महासभेतच द्यायचे.

**राजेंद्र जैन :-**

जब आप स्वयं संतुष्ट नही है तो आप यह महासभा मे लाने क्यो नही देते हो? पहले आप अपना खुद संतुष्टीकरण किजीए फिर महासभा मे लिजिए।

**मा. महापौर :-**

इनकम जो रेव्हेन्यु कर रहा है उसकी बात कर रहा हु। जो जो डिपार्टमेंट को टॅक्स पे करने का है, जो भी करना है वह उनके डिपार्टमेंट की बात है। हम जब प्रोव्हीजन करते है तो उस हिसाब से उतना पैसा आना चाहिए। इतना डेप्रिशिएट नही होना चाहिए की, सीधा ५० टक्के डेप्रीशिएट आये।

**एस. ए. खान :-**

मा. महापौर साहेब, जी टॅक्स वसुली आहे ती फेब्रुवारी आणि मार्च महिन्यामध्ये जे लिपिक आहेत ते घरोघरी जातात व वर्षभर असेच बसुन राहतात म्हणून मागेपण.....

**मा. महापौर :-**

एक अजुन माहिती देतो अकाउंट प्वॉईंट ऑफ व्युव्ह ने त्याचा गैर वापर होईल का नाही हे मला माहित नाही पण आता आपण जेवढे प्रभाग कार्यालय आहे. जेवढे टॅक्स रिकव्हरी कार्यालय आहे ते आपण एकमेकांना फायबरने कनेक्ट करतो की, येथे टॅक्स भरण्यात येईल. माझे तर तेही म्हणणे आहे की, एक एक कनेक्टीव्हीटी नगरसेवकांना द्यावी. त्यांना घरी बसुन रोज बघता येईल की, त्याच्यामध्ये काय आहे. ते मला माहित नाही की, त्याचा किती गैरवापर होउ शकतो. तेही केल्याने आपले ओपन असेल तर तेही द्यायला हरकत नाही. नगरसेवकांना आपले अकाउंट डेली घरी बसुन बघता येईल.

**एस. ए. खान :-**

बरोबर आहे. ते नुसते फ्रेब्रुवारी आणि मार्च महिन्यामध्येच घरोघरी जातात. वर्षभर असेच बसुन राहतात. मागे पण मी सुझाव दिला होता.

**मा. महापौर :-**

तुम्हाला डेली अकाउंट बघता येईल. कुठे किती पैसे आहेत. पण त्याचा किती गैरवापर होईल ते ही बघा.

**एस. ए. खान :-**

वर्षभर वसुल करायला जायचे किती बाकी आहे, काय आहे आणि तुम्ही सुचना केली तसे केले तर नगरसेवकांना त्याची माहिती मिळाली तर ते करतील.

**मा. महापौर :-**

आपण आता हेडवाईज जाउ या. प्रत्येक डिपार्टमेंटचे आणि ज्या अधिकाऱ्याने चुक केली असेल त्याला एक दिवसासाठी तरी आपण निलंबित करू या.

**नगरसचिव :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने, पान क्र. १ महापालिका दर व कर (१) जमिनीवरील नियमातील कर.

**प्रफुल्ल पाटील :-**

कितने सदस्य है, हर मिटींग मे हर एक सदस्य बोलता है की, सभागृह की भावनाओ को देखो, सभागृह की भावना का सदस्य की भावना आखिर मे इस भावना का खुन करता है कौन? भावना की कोई कदर नही करता है अधिकारी हर एक के हर भावना के खुन का इल्जाम हे जिसके उपर वह आनेवाले है देने सफाई खुद हमारे द्वार पर। सभी तो आ गए लेकीन वह कातील कयो नही आया? मैने बोला शिक्षण अधिकारी नही है उनके पास मेसेज पोहोच गया। इतनी उमर मे भी उनकी भावना जागृत है। अच्छा लगता है। एक टीचर के उपर अन्याय हुआ है उसके बारे मे मै बोला लेकीन बाद मे उनके उपर कुछ असर नही पडा है। हो सकता है आदमी जवानी खोने के बाद स्फुर्ती भी खो देता है। मेरा पहला कहना है की, आपने, सन २००९-१० ला ४८ कोटी ५० लाख रू. इतक इमारती वरील आणि जमिनीवरील कर आणि दर याच्यासंबंधी डिटेल विवरण द्या. त्याच्यामध्ये २००९-१० साली तुम्ही किती कर लावणार आहात ह्याचे कॅल्युलेशन तुम्ही केले त्याशिवाय सन २००८-०९ ची तुमची काही रक्कम बाकी आहे का? मागच्या तीन वर्षातला तुम्ही जर आढावा घेतला तर २००५-०६ ला २४.३१ कोटी, २००६-०७ ला २९ कोटी, २००७-०८ ला ३६ कोटी. २००८-०९ हे साडे ४८ कोटी हे डायरेक्ट नविन असेसमेन्ट असणार आहे का? मागच्या तीन महिन्यामध्ये जसे आम्ही हाऊसमध्ये निर्णय घेतले की खुल्या जागेवर किती टॅक्स लागले त्याना सी.सी. दिलेली आहे पण त्यांनी काम चालू केले नाही. त्यांना टॅक्स लावायचे ठरले. टाऊन प्लानिंग डिपार्टमेंटने अशा किती लोकांचे टॅक्सेस तुमच्याकडे प्रपोझल पाठवले. त्या प्रपोझलचे असे कॅल्यक्युलेशन केले तर इतका टॅक्स आम्हांला मिळू शकतो. तिसरा विभाग अजून आहे सी.सी. बाब. अनधिकृत बांधकामाच्या संदर्भामध्ये ज्याने जास्त एफ.एस.आय वापरला आहे. त्या लोकांचे टॅक्स तुम्ही किती काढलेले आहेत? त्या सर्वांची माहिती द्या.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, ही जी प्रापर्टी टॅक्सची फिगर आहे तर गेल्यावेळेच्या बजेटमध्ये पण मी सांगितले होते की, साधारणपणे ४ ते ५ कोटी अशी फिगर आहे की, जी निर्लेखित करायला पाहिजे. म्हणजे मिळूच शकणार नाही आणि आपण डबल टॅक्स काही ठिकाणी लावलेला आहे तो चुकीचा टॅक्स लावलेला आहे ते आपण कधी करणार की, ५ कोटी रू. त्याच्यातून काढून टाकण्याचे जे येणारच नाही ते प्रत्येकवेळी बजेटमध्ये दाखवण्याची गरज काय? त्याबद्दल पण पाटील साहेब थोडेसे निवेदन करावे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने बोलतोय, आपल्या आरोग्य विभागाचा ह्याच्यामध्ये अहवाल दिला आहे की, प्रभाग निहाय साफसफाईसाठी २१ करोड रू. मंजुर केलेले आहे. त्यांनी जो खुलासा दिलेला आहे ते तुम्हांला वाचन करून दाखवतो सध्या शहरात लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. जर आज मितीस ८ लाख ५० हजार अंदाजे लोकसंख्या आहे. शहरात मोठ्या प्रमाणावर गृहसंकुले उभारली जात असून दाटीची लोकसंख्या झालेली आहे एवढ्या लोकसंख्येच्या तुलनेने साधारणतः कचऱ्याचे प्रमाण देखील मोठ्या

प्रमाणात वाढलेले आहे म्हणजे ह्यांच्या नुसार त्यांना २१ करोड रू. का दिले तर लोकसंख्या वाढली म्हणून दिलेले आहे. लोकसंख्या वाढली म्हणजे आपल्याकडे इमारती वाढल्या आहेत. त्यामुळे आपला टॅक्स वाढला पाहिजे. इथे आपण त्याच्यामध्ये मागे ५० लाख करोड रू. केलेले आहेत. मला श्री. अजित पाटील साहेबांना विचारायचे आहे की,? मागील २००८-०९ या वर्षामध्ये आपण किती कर आकारणी केली? प्रत्येक प्रभाग वाईस १,२,३,४ त्याची मला फिगर सांगावी. तुमच्याकडे नसेल तर मी देतो तुम्हांला.

**अजित पाटील :-**

मा. पिठासीन अधिकारी यांच्या परवानगीने बोलतो. सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील ह्यांनी डिटेल महिती विचारली ती एकत्रित माहिती माझ्याकडे आहे वॉर्डाची, ती आपल्याला मी सगळी एकत्रितरित्या सांगतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रभाग निहाय माहिती आपल्याला नंतर देवू, एकत्रित मला माहिती आहे. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्या संदर्भात पहिले बोलतोय ५० कोटीचा जो उल्लेख केला आहे ते गेल्यावेळी सन २००८-०९ चा अंदाजपत्रक सादर करताना प्रशासनातर्फे एकंदरीत ४१ कोटी रू. प्रस्तावित केलेले होते. त्याच्यामध्ये मोकळ्या जागेचा पण उल्लेख करण्यात आला होता. त्यामध्ये १.५० धरले होते. ४१ कोटी रू. असताना महासभेने अपेक्षित वाढ धरून ५० कोटी धरलेले आहे. आणि ह्या ५० कोटीमध्ये माकळ्या जागेचा उल्लेख आहे. आता जेव्हा स्थायी समितीमध्ये चर्चा झाली त्यावेळेला ते वेगळे करावे अशी सुचना केल्यामुळे ते दोन वेगळे केलेले आहे. ४८,५० हे हाऊस टॅक्सचे घरलेले आहे आणि ४ कोटी मोकळ्या जागेचे धरले आहे म्हणून तो फिगर असा कमी दिसतोय. ५० कोटी इनक्युलिडिंग मोकळ्या जागा असे गेल्यावर्षी धरले होते..

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आपण त्या जागेची आकारणी केली आहे का?

**अजित पाटील :-**

सन २००८-०९ चे जे अंदाजपत्रक सादर केले त्यावेळेला नगरपालिकेची एकंदरित डिमांड ४२ कोटी ६३ लाख रू. एवढी होती. नवीन बिल काढून आणि मोकळ्या जागेची आकारणी करून ४७ कोटी ४० लाख रू. एवढी डिमांड झालेली त्याच्यामुळे २ कोटी ७८ लाख रू. जागेची बिल काढलेली आहेत. पण मोकळ्या जागेची बिल ही डिसेंबर महिन्यात काढण्यांत आलेली आहे. आता बजावण्याची कार्यवाही चालू आहे. त्याच्यावर नागरिकांनी अपिल केलेले आहे. चालू आहे. त्याच्यावर नागरिकांनी अपिल केलेले आहे. परसेन्डेजवॉईस ३२ लाख रू. जमा झालेले आहे. त्याच्या नंतर ४७ कोटी ४० रू. ची डिमांड असताना ह्याच्या मध्ये एकंदरीत ४० कोटी रू. वसुल होतील ८५% वसुल होऊन ७ कोटी बॅलेन्स राहिल. पुढच्या वर्षी हे हिशोबात ठेवून ३७ कोटी ७४ लाख रू. अधिक ७ कोडी ११ लाख रू. आणि नवीन इमारती शोधून काढून अपेक्षित उत्पन्न ५ कोटी रू. घरलेले आहे आणि पुढील वर्षी मोकळ्या जागेवर आकारणी करणार असे ३ कोटी रू. उत्पन्न धरलेले आहे असे मिळून ५२ कोटी ८५ लाख रू. ची पुढच्या वर्षीची आपली डिमांड होणार आहे. करंट वर्ष ३७ कोटी रू. ची आहे. चालू वर्षाची अपेक्षित थकबाकी ७ कोटी रू.ची, ५ कोटी रू. नवीन इमारतींना आकारणी करणे आणि ४ कोटी रू. मोकळ्या जागेची आकारणी अपेक्षित आहे. अशी ५२ कोटी ८५ लाख रू. आही पुढच्यावर्षी डिमांड होईल असे हिशोबात धरून ४७ कोटी ५० लाख रू. केले होते. स्थायी समितीने सगळा विचार करून उत्पन्न वाढीचा विचार करून ४८-५० हे हाऊस टॅक्स धरले आणि ४ कोटी रू. निव्वळ मोकळ्या जागेचे धरले असे ते ५२ कोटी रू. सांगितले.

**धुव्रकिशोर पाटील :-**

मोकळ्या जागेची लिस्ट तुमच्याकडे टाऊन प्लानिंग कडून आली का? तुम्ही स्थायी समितीमध्ये सांगितले होते की, मोकळ्या जागेची लिस्ट यायची बाकी आहे तुम्हांला यादी आली का?

**अजित पाटील :-**

नाही.

**धुव्रकिशोर पाटील :-**

मा. महापौर साहेब, ३ तारखेला आम्ही बजेट फायनल केले, स्थायी समितीमध्ये ज्यावेळी टाऊन प्लानिंगला सांगितले होते की, मोकळ्या जागेची यादी तुम्ही कर विभागाला दया. आज १५ दिवस होऊन गेले पण अजूनपर्यंत त्यांनी यादी दिलेली नाही. जर यादी दिली असती तर ह्या मोकळ्या जागेचा टॅक्स अजून वाढला असता. त्यांच्याकडे टोटल अप्रॉसिमेंटली १६८ लिस्ट आहे पण त्यांच्याकडे फक्त ६० यादी आलेली आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मी जे प्रश्न विचारले आहे त्याचे आपण मला पहिले पुर्ण उत्तर दया. त्यानंतर इतर सदस्यांना दया. कारण बाकीच्या सदस्यांचे पण नवीन मुद्दे ह्यांच्यामध्ये आहे कधी आता माझे नवीन मुद्दे येतील. अजित पाटील साहेब तुम्ही जे उत्तर दिले ही, ५० कोटी रू. मागच्या सन २००८-०९ मध्ये जेव्हा अपेक्षित उत्पन्न दाखवले तर

त्याच्याच ऑलरेडी तुमच्या जुन्या इमारतीच्या, मोकळ्या जागेत कराचाही उल्लेख आहे. त्याच्यात तुम्हांला किती रक्कम मिळाली?

**अजित पाटील :-**

चालू वर्षामध्ये फक्त ३२ लाख रू. मिळालेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आणि ती तर तुमची वसुली झाली.

**अजित पाटील :-**

आपल्या महासभेचा ठराव असा झाला होती की, नगररचना विभागाकडून सी.सी. दिल्याची यादी आल्यानंतर कर विभागाने आकारणी करावी. एकंदरीत आजपर्यंत ८४ प्रकरणांची आमच्याकडे यादी आलेली आहे. ८४ प्रकरणांमध्ये ६८ प्रकरणे अशी होती की, ती क्लिअरकट प्रकरणे होती. बाकी १६ प्रकरणांमध्ये फक्त यादी अशी येते की, सर्व्हे नं. घोडबंदर ११०, मिरारोड घोडबंदर ११० त्याच्यामध्ये ट्रेस हा होत नाही अशी पेन्डींग ठेवलेली ६८ प्रकरणामध्ये ३ कोटी ८ लाख रू. ची आम्ही आकारणी केली त्यातली ३२ लाख रू. वसुली.

**प्रफुल्ल पाटील :-**

जेव्हा तुम्ही बजेट बनवता, बजेट बनवणाऱ्या लोकांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, सन २००८-०९ ला तुम्ही जे सुधारीत अंदाजपत्रक सादर केले आहे. त्याच्यात एक नंबर वर बघा अ(१) मोकळ्या जागेवरील कर तो अख्खा रकाना बाकी. तो रकाना का बाकी ठेवला? तुम्ही ऑलरेडी टॅक्सेशन केलेले आहे. तुमच्याकडे संपूर्ण माहिती आलेली आहे तर ५० कोटीची टोटल दाखवली म्हणजे तो रेग्युलर टॅक्स झाला. मोकळ्या जागेचा टॅक्स हा ५० कोटीवर आलाच नाही.

**मा. महापौर :-**

मागचे जे मोकळ्या जागेचे टॅक्स आहे ते त्या टॅक्समध्ये इनवॉल केले आहे.

**अजित पाटील :-**

यावर्षी स्थायी समितीने बायफेरेशन केलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

बायफरफिकेशन केले पण आता जेव्हा तुम्ही सुधारित बजेट देता की नाही २००८-०९ ला ....

**मा. महापौर :-**

पण ते त्याच्यातच इनवॉल आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तीन महिन्याचे जेव्हा तुम्ही सुधारित बजेट दिले तेव्हा हेडखाली..

**मा. महापौर :-**

त्या हेडखाली तेव्हा प्रोव्हीजन नव्हते त्याच हेडमध्ये होते म्हणजे समजा, एखादा १४ करोड रू. रिकव्हर झाले. आपण दिलेले आहे. १३ करोड रू. टॅक्सचे आणि १ करोड रू. ओपन लॅन्डचे आलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

मा. आयुक्तांनी ज्यावेळेस हा बजेट स्थायी समितीला सादर केला त्यावेळेस मोकळ्या जागेवरील कर हा हेड नव्हता आणि त्या ५० कोटीमध्येच खुल्या जागेचे सुद्धा अपेक्षित येणाऱ्या..

**प्रफुल्ल पाटील :-**

जेव्हा एखाद्या उत्पन्नाचा स्तोत्र हा आम्ही बजेट मद्ये सांगतो की, नविन उत्पन्न चालू करावे. ते ठिक आहे तेव्हा नव्या बजेटमध्ये नव्या हेडखाली ते आले पण डुरींग डि ईअर म्हणजे एखादा आर्थिक वर्ष चालू झाले आणि मधल्या काळामध्ये आम्ही एक प्रकारच्या नवीन टॅक्स जर चालू केला तर तो टॅक्स तुम्ही जेव्हा सुधारित बजेट करता तेव्हा तो वेगळ्या शिर्षाखाली दाखवायला पाहिजे.

**अजित पाटील :-**

साहेब, मालमत्ता कराचे एकत्र केले होते.

**प्रफुल्ल पाटील :-**

मालमत्ता कराचे तुम्ही नंतर पुढे सबमिट करता.

**अजित पाटील :-**

स्थायी समितीने ह्यावर्षी त्याला बायपोस दिले.

**प्रफुल्ल पाटील :-**

हा विषय बजेट बनवणाऱ्या लोकांचा आहे की, जेव्हा तिथे सुधारित अंदाजपत्रक सन २००८-०९ सादर करत आहात आणि आज तुम्ही सुधारित अंदाजपत्रकाला पण मंजुरी मागत आहात. मग सुधारित अंदाजपत्रकाला मंजुरी देताना तुम्ही ते फिगर वेगळे दयायला पाहिजे. म्हणजे तुम्हांला ते फिगर का दयायचे नाही मला त्याचाच उल्लेख होतनाही आणि आता तुम्ही सांगताय की, २००९-१० तर २००८-०९ ची तुमची

वसुली टॅक्सेशन झाले आहे ते ४७.६७ कोटी झालेले आहे आणि तेवढीच रक्कम तुम्ही २००९-१० ला ठरवताय. तर २००९-१० ला ४७.६७ होते. मग २००९-१० ला ४७.६७ च्या वर आले पाहिजे.

**अजित पाटील :-**

४७ कोटी ४० लाख रू. हे मागील सह डिमांड आहे. म्हणजे मागीलची पण आली आणि करंटची पण ४७ कोटी रू. आपली डिमांड आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन २००८-०९ चे तुमचे माझ्याकडे कम्प्युटर मधले पत्र आहे. प्रभाग वाईस आहे. त्याच्यामध्ये मागची १९ कोटी ४९ लाख रू. आणि नवीन २००८-०९ स्पेशली तुम्ही मालमत्ता कर आकारणी केली आहे ती ४७.६७ लाख रू. आणि टोटल मिळून ६७.१५ लाख रू, २००८-०९ ची आहे. ५० कोटीचा फिगर हा तुमचा चुकलेला आहे.

**अजित पाटील :-**

४७ कोटी आपण म्हणता तर त्याच्यात ते सगळे करांची आकारणी आहे. आम्ही फक्त मालमत्ता करांबद्दलच बोलतोय.

**प्रफुल्ल पाटील :-**

वर लिहिले आहे. प्रभागानुसार मालमत्ता कराची एकूण मागणी.

**अजित पाटील :-**

६७ कोटी म्हणजे त्याच्यामध्ये सगळे कर आले.

**प्रफुल्ल पाटील :-**

हे तुमचेचे आहे. मालमत्ता कराची मागणी म्हटली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

त्या फिगरमध्ये शिक्षण कर आणि शासनाला जो भरणा करतो तेही त्याच्यामध्ये आले.

**अजित पाटील :-**

सगळे कर चार करांची ६७ कोटीची मागणी आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुमचे शिक्षण कर धरले तर ते किती येते ? तर १ कोटी २५ लाख रू. आहे. त्याच्यात तुम्ही जकात उपकर तर घेत नाही. सिनेमा, नाट्यगृह घेत नाही ?

**अजित पाटील :-**

नाही. ह्याच्यामध्ये शिक्षण कर, वृक्षकार, रोजगार हमी कर, विशेष स्वच्छता कर, अग्निशमन कर, नोटीस फी हे सगळं एकत्र येते.

**प्रफुल्ल पाटील :-**

गेल्या वर्षीचे आपण ५० कोटी रू. अपेक्षित उत्पन्न दाखवत होतो. त्या ५० कोटीमध्ये ३ कोटी रू. आपण आणखिन ॲड केले म्हणजे ४७ कोटी धरा. ४७ कोटी प्लस तुमचे वरचे धरून जास्त व्हायला पाहिजे.

**अजित पाटील :-**

आपली डिमांड ही ४७ कोटीची आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

पेज नं. ८ वर आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

विशेष शिक्षण कर तुम्ही सुधारित अंदाजपत्रकात काय लिहिले आहे तर १.७८ लिहिले आहे.

**अजित पाटील :-**

हे त्या रेशिओप्रमाणे आहे. विशेष शिक्षण कराची डिमांड १ कोटी ४६ लाख रू. आहे. आणि चालू वर्षी नवीन आकारणी केली म्हणून १.६४ लाख रू.डिमांड होते. चालू वर्षी ८५% वसुली धरून २४ लाख रू. बॅलेन्स राहे. पण करंट ईअरची डिमांड १.३५ आणि नवीन कर आकारणीची १८ लाख रू. मोकळ्या जागेवर ११ लाख रू. अशी मिळून १८ डिमांड धरलेली आहे. आपण ज्याच्यामध्ये ८५% वसुली करून १.७० धरलेली आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही गेल्यावर्षी ४७.६७ लाख रू. जेव्हा तुम्ही सन २००८-०९ ची मागणी धरता आणि मागची जी शिल्लक रक्कम तुमची वसुल व्हायची आहे ती १९.४८ धरता आणि मग २००९-१० त्या तुम्ही मोकळ्या जागेवरचा कर बाकीचे सगळे तुमचे ४८.५० आणि म्हणजे ५२ कोटीच येतात.

**अजित पाटील :-**

१९ थकबाकी आहे. त्याच्यामध्ये सगळे टॅक्स आलेले आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

कुठले कुठले टॅक्स आलेले आहे हे तुम्ही सविस्तर सांगा.

**मा. महापौर :-**

आता जी नवीन डिमांड ५२ कोटी रू.ची सांगितली त्याच्यामध्ये सगळे इनक्ल्युड आहेत?

**अजित पाटील :-**

हा नेट हाऊस टॅक्स आहे.

**मा. महापौर :-**

तुम्ही किती परसन्ट वसुली करता?

**अजित पाटील :-**

हिशोबामध्ये ८५% धरली आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण मला सांगा, तुमच्या हिशोबाने ५२ कोटी ५० लाख रू. हे सर्व जोडून आहे का?

**अजित पाटील :-**

मालमत्ता सोडून.

**प्रफुल्ल पाटील :-**

बाकीचे सगळे धरून किती आहे ते सांगा?

**अजित पाटील :-**

बाकीचे डिटेलवाईस ह्याच्यामध्ये विचारलेले नाही. सगळे वेगवेगळे आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

टोटल सांगा. त्याच्यामध्ये मागच्या वर्षाची जी थकबाकी आहे ती येणार आहे का?

**अजित पाटील :-**

५२ कोटी दाखविलेले आहे. मागील बाकीसह ती थकबाकी दाखवलेली आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

१९ कोटी तुमची सन २००८-०९ ला मागील थकबाकी होती आता चालू मागणीमध्ये तुम्ही तुमचे सगळे टॅक्स एकत्र धरले. मग मागची १९ कोटी रू.ची वसुली झालेली नाही ती ह्याच्यामध्ये का येणार नाही.

**अजित पाटील :-**

साहेब, प्रत्येक हेडवाईस मागील थकबाकी दाखवली आहे. ४२ कोटी ६३ लाख रू. ही आपली करंटची डिमांड आहे. म्हणजे इनक्ल्युडींग मागील बाकी हाऊस टॅक्सची त्याच्यामध्ये मागील बाकी ९ कोटी रू आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मागचे सन २००८-०९ ला तुमची १९.४९ कोटी रू. थकबाकी आहे.

**अजित पाटील :-**

थकबाकी आहे. पण त्याच्यात सगळे कर आले.

**प्रफुल्ल पाटील :-**

सगळ्या करांची परत तुम्ही दाखवली ती सन २००९-१० ला देणार की सन २००८-०९ ला येणार?

**अजित पाटील :-**

थकबाकीसह दाखविली आहे. प्रत्येक बायफरवाईस.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही आम्हांला टोटल सांगा की, इतकी आली आणि टाऊन प्लानिंगने त्यांना माहिती का पाठविली नाही ते स्पष्टीकरण करा. बाकीचे शिक्के बरोबर मारायला येतात.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, अजित पाटील साहेब, आपल्याकडे टॅक्स लावण्यासाठी किती प्रस्ताव आलेले आहे व प्रलंबित किती प्रस्ताव आहेत.

**अजित पाटील :-**

प्रलंबित किती आहे ते काढायला लागेल? नवीन कर आकारणी ६ कोटीची केलेली आहे ते दाखवण्यात आलेली आहे.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, महापालिकेच्या कारभारामध्ये कर आकारणीसाठी प्रस्ताव सादर करून सुद्धा कर आकारणी लवकर होत नाही. लोकांना चक्करा माराव्या लागतात. आता पुन्हा एटीपी ची एनओसी आणावी लागते. म्हणजे लोक कर भरायला तयार आहेत. प्रस्ताव सादर झाले ह्याच्यावर उपाय काय काढणार आहात? तरच तुमचा कर वसुल होईल.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांशी संबंधित प्रश्न आहे. पाटील पाहेब आपण कॅलक्युलेशन करण्यापूर्वी मी जे सुरूवातीला निवेदन केले की, आपल्यामध्ये बजेट का वाढतय तर सावंत साहेब, आपल्याला ही मोठा प्रश्न होता की, बजेट का वाढले? बजेट का फुगले असे आपण म्हणतोय. तर त्याच्या मागची भूमिका

मी स्पष्ट करतो. माझ्याकडे जी आकडेवारी आहे तर प्रफुल्ल पाटील साहेब, आपण मागील त्यांच्याकडे जी कॅलक्युलेशन करताय माझ्याकडे कॅलक्युलेशन तयार आहे. सन २००५-०६ या आर्थिक वर्षामध्ये आपल्याला जमिनीवरील आणि इमारतीवरील कर या सगळ्यामधून ३८ करोड ५० लाख रू. अपेक्षित होते आणि त्यावेळेला आपण १४करोड १८ लाख रू. च्या डेप्रीशिएटमध्ये आहोत. ती रक्कम तशी पुढे गेली. सन २००६-०७ या आर्थिक वर्षामध्ये आपल्याला बजेयमध्ये आपण अपेक्षित अशी रक्कम ४० करोड रू. हाऊस टॅक्समधून येतील. परंतु, त्यावेळेला १० करोड ९८ लाख रू. नी, ११ करोड रू. ने. आपण डेप्रीशिएटमध्ये गेलो आहोत. मोजून बघा. त्यानंतर सन २००७-०८ या आर्थिक वर्षामध्ये आपल्याला अपेक्षित रक्कम ५० करोड रू. होती. त्यावेळेला आपण १३ करोड ८६ लाख रू. म्हणजे १४ करोड रू. नी डेप्रीशिएटमध्ये गेलो आहेत. पुन्हा ही रक्कम आपण कॅरीफॉरवर्ड केली आहे आणि या चालू आर्थिक वर्षामध्ये आपल्याला अपेक्षा होती कि, आपण साधारणपणे ५० करोड रू. चे टारगेट पार करू. परंतु, प्रत्यक्ष आपल्याकडे ४ महिन्यामध्ये १४ करोड ८३ लाख रू. वसुल करू शकलो आणि अजून वसुल करू शकलो नाही ती रक्कम ३५ करोड १६ लाख रू. हे आपण चार महिन्यात काय वसुल करणार आहात? म्हणजे तुम्ही तुमच्या स्टाफला कुठे कामाला लावले? आणि जुना आकडा आहे तो तसाच आहे आपले कर्मचारी चार महिन्यात ३५ करोड रू. वसुल करू शकू का? जर मागे हा आकडा १४, करोड, १० करोड रू. असा येत असेल तर आपल्याला निश्चितपणे त्याच्यामध्ये ४-८ करोड रू. असे असतील की, जे ज्या रक्कमा आपल्या नक्की वसुल होतील, परंतु, काही रक्कमा आपल्याला निर्लेखित करण्याची वेळ येणार आहे. मग त्या रक्कमा कुठल्या आहेत ते फाईंडआऊट केल्या पाहिजेत. म्हणून मी ऑडीटर महोदयांना सांगत होतो की, आपण निवेदन करायचे आहे. आपल्याला ह्या रक्कमा निर्लेखित करता येतात का? कारण कुठेतरी आपल्याला, कधीतरी भूमिका घ्यावी लागणार आहे जर दोनशे आणि अडीचशे करोड रू. चे बजेट हे आपले डेप्रीशिएट येत असेल तर ते कुठेतरी थांबले पाहिजे आणि हे बघा ३५ करोड रू. आपले ४ महिन्यात बाकी आहे. ते वसुल करू शकत नाही आणि ज्यांचे फ्लॅट बिल्डरने करून ठेवले आणि सील केले त्याचा लिलाव जरी केला नाही. तो लिलाव ह्यावर्षी करावा. काही फ्लॅटचे लिलाव आपल्याला करावे लागतील.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा. :-**

पाटील साहेबांची जी शंका होती की, मालमत्ता करामध्ये प्रशासनाने मागील थकीत रक्कमा किंवा इतर सर्व बाबी न घेता हे दाखवलेले आहे. ते नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, मालमत्ता कर हे कन्सॉलडेटेड प्रॉपर्टी टॅक्स म्हणून आपण एकत्रित करतो. त्यामध्ये निव्वळ मालमत्ता कर पुढच्या वर्षासाठी ४८ कोटी ५० लक्ष अपेक्षित केलेले आहे आणि मोकळ्या जागेवरील कर ४ कोटी रू. आपण अपेक्षित केलेले आहे. विशेष शिक्षण कर १ कोटी ७३ लाख रू. अपेक्षित केलेले आहे. अग्निशमन कर १ कोटी ७३ लक्ष अपेक्षित केलेले आहे. विशेष स्वच्छता कर..

**प्रफुल्ल पाटील :-**

मालमत्ता कराच्या बिलामध्ये अग्निशमन कर ..

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा. :-**

हे सर्व मालमत्ता बिलामध्ये येते. पण त्याचे वेगवेगळे हेड या पुर्ण ह्याच्यामध्ये आहे ते आपल्याला सांगतो. विशेष स्वच्छता कर १ कोटी ३५ लक्ष रू. अपेक्षित केलेले आहे. आणि वृक्षकर १ कोटी ७३ लाख रू. अपेक्षित केलेले आहे असे एकत्रित मालमत्ता कर ५७ कोटी ३३ लक्ष या बजेटमध्ये आपण अपेक्षित केलेले आहे. यामध्ये शासनाकडे भरावयाचे दोन कर आहेत १) शिक्षण कर - ११ कोटी १५ लक्ष आणि २) रोजगार हमी रोजना कर - १ कोटी २० लक्ष असे १२ कोटी ३५ लक्ष हे शासनाकडे भरावयाचे आहे. असे कन्सॉलडेटेड प्रॉपर्टी टॅक्स येणाऱ्या वर्षामध्ये जर आपण अपेक्षित करतो तर ६९ कोटी ६८ लक्ष रू. म्हणजे या सर्व रक्कमा वेगवेगळ्या हेडखाली ह्याच बजेटमध्ये आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

निर्लेखित करायच्या रक्कमा किती आहेत आणि यावेळी करणार आहात का?

**प्रफुल्ल पाटील :-**

माझा मुद्दा असा आहे की, टाऊन प्लानिंगने यांना किती प्रस्ताव पाठवले? ज्यांना सी.सी. दिलेली आहे. ज्यांना मोकळ्या जागेवर टॅक्स लावायचे आहे असे किती प्रस्ताव त्यांनी पाठवले त्याची माहिती दयायला पाहिजे. आतात ते म्हणतात की अमुक एक प्रस्तावामध्ये डिफेक्टीव्ह आहे. त्याची काय माहितीच नाही. त्याला जबाबदार कोण? ते उत्पन्न तुम्ही धरणार नाही का? त्यांना तुम्ही आज टॅक्स लावणार तेव्हा ते आजपासून भरतील त्यांचे म्हणणे आम्ही मागून का भरू, मागची बिल मागता येतात का? तशा प्रकारची तुम्ही काय कार्यवाही केली आहे का? ते का झाले नाही? याची टाऊन प्लानींग डिपार्टमेंटने माहिती दयावी.

**वंदना पाटील :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलते, माझ्या बिल्डींगमध्ये एकालाच कमी टॅक्स आणि एकाला जास्त टॅक्स मिळतोय. एकतर समान कर लावा. एकाला दोनशे, एकाला शंभर का?

**मा. महापौर :-**

आपण मधल्या काळात सर्वांना संधी दिली होती व एक टाईम निश्चित केला होता की, या वेळेमध्ये ..

**वंदना पाटील :-**

दोन वर्षापूर्वी होऊन गेलेले आहे. आता परत एकदा त्यांना चान्स दयावा. एक महिन्यासाठी करावे.

**मा. महापौर :-**

आजचा तो विषय नाही. आपले निवेदन आपण दयावे. त्यांनतर विचार करून आपण त्या विषयावर नंतर बोलू.

**लक्ष्मण जंगम :-**

पाटील साहेब, अनधिकृत बिल्डींगला डबल टॅक्स जे लावणार होते ते मागच्या वेळेस चर्चा झाली होती तर ते लावण्यात आले का?

**अजित पाटील :-**

होय.

**धुव्रकिशोर पाटील :-**

किती लावला आहे?

**अजित पाटील :-**

महासभेचा ठराव झाला होता. नगररचना विभाग कडून अधिकृत, अनधिकृत याबाबत अभिप्राय घेतल्यानंतर जे नगररचना विभाग अधिकृत सांगेल त्याला अधिकृतप्रमाणे अधिकृत व अनधिकृतप्रमाणे सांगितले तर अनधिकृतपणे टोटल एकंदरीत आमच्याकडे फाईल आल्या त्याप्रमाणे ३७ लाख रू. ची आपण नवीन आकारणी केली आहे. पेनल्टी लावण्याची आणि बाकीचे नगररचना विभागाकडून आमच्याकडे अभिप्राय आलेला आहे. त्यात अधिकृतपणे आलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पाटील साहेब, अमाऊंट नाही. किती प्रकार? नंबर ऑफ क्वॉनटिटी.

**अजित पाटील:-**

टोटल अमाऊंट आणलेली असते. टोटल क्वॉनटिटी समजणार नाही.

**एस.ए. खान :-**

आकारणी केली आहे तुम्ही पण वसुली किती झालेली आहे?

**अजित पाटील :-**

वसुली ४ लाख ५० हजार रू. झाली आहे.

**एस.ए.खान :-**

लोक पैसे भरायला येतात तर तुम्ही लोक घेत नाहीत.

**अजित पाटील :-**

असे होणार नाही.

**एस.ए.खान :-**

तुम्ही एवढी कर आकारणी केलेली आहे आणि पैसे का वसुल केले नाही? स्वतःहुन कर आकारणी केलेली आहे व स्वतःहून भरायला येतात तरी तुम्ही घेत नाही. माझे तुमच्यावर एलिगेशन आहे.

**अजित पाटील :-**

ठिक आहे. आम्ही सांगू. पण ते होणार नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

पाटील साहेब, मी आपल्याला चारही प्रभागाची कर अमाऊंट विचारली आहे. सन २००८-०९ ची किती कर आकारणी झाली आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

विषय काय झाला आहे, पहिल्यांदा त्यांनी काय सांगितले की, आम्ही मोकळ्या जागेवर कर लावला. नंतर काय सांगितले, ज्यांना सी.सी. दिली आहे. ज्यांनी काम चालू केले नाही. त्यांच्यावर टॅक्स लावला आहे. ज्यांनी काम चालू केले नाही. त्यांच्यावर टॅक्स लावला आहे. आता काय सांगितले, सन्मा. सदस्य लक्ष्मण जंगम ह्यांनी प्रश्न विचारला की अनधिकृत बांधकाम केले आहे त्यांच्यावर टॅक्स विचारला की अनधिकृत बांधकाम केले आहे. त्यांच्यावर टॅक्स लावला आहे का.तर तोच टॅक्स अनधिकृत बांधकामावर तोच टॅक्स सी.सी. दिल्यानंतर काम चालू केले त्याच्यावर तोच टॅक्स मोकळ्या जागेवर म्हणजे नक्की जागेवर हा टॅक्स आहे?

**मा. महापौर :-**

आपल्याकडे आता चार प्रकारचे टॅक्स झाले.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपल्याकडे आता तीन प्रकारचे टॅक्स झाले.

**प्रफुल्ल पाटील :-**

चार प्रकार झाले. एक ओरिजनल तुम्ही जे फ्लॅट बांधले ते एक. दुसरा तुम्ही सी.सी. घेतली पण बांधकाम केले नाही. तोपर्यंत बिल्डरने टॅक्स भरावा म्हणून तो तिसरा मोकळ्या जमिीवरचा टॅक्स.

**मा. महापौर :-**

तोच सी.सी

**प्रफुल्ल पाटील :-**

त्याच्याशिवाय बिल्डींगच्या बाहेरच्या टॅक्सला आपण परवानगी दिलेली नाही. पण मग त्याच्यामध्ये जे ऑलरेडी बांधकाम जास्त झालेले आहे. अनधिकृत बांधकाम.

**मा. महापौर :-**

ते शास्ती. तेच तीन प्रकारचे झाले आणि आपण आता दोन प्रकारचे दाखवलेले आहे. म्हणजे नवीनमध्ये पण.

**प्रफुल्ल पाटील :-**

टाउन प्लानिंग डिपार्टमेंटने आम्हांला माहिती दयावी.

**लक्ष्मण जंगम :-**

पाटील साहेब, त्याचा खुलासा झाला नाही की, तुम्ही ज्या बिल्डींगला परमिशन आहे त्या ५० फुटाला १००० रू. टॅक्स लावला तर इललिगल जे अनधिकृत बांधकाम असेल त्या ५० फुटाला तुम्ही किती लावले आहे?

**अजित पाटील :-**

नगररचना विभागाकडून जसा आम्हांला अभिप्राय येईल. पहिला माळा किंवा समजा तिसरा माळा अधिकृत आहे व चौथा माळा अनधिकृत आहे तर तिसऱ्या माळ्याला रेग्युलर रेट लावू व चौथ्या माळ्याला पेनल्टीसकट लावणार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हे चुकीचे आहे. मॅडमने, आता विषय काढला समान कर. आता तुम्ही नोटीसवर त्याची बिल पाठवताना तुमचा हा तिसरा माळा अनधिकृत आहे म्हणून लावलेला आहे. नाहीतर, परत जसे मॅडम बोलले की समान कर लावा. तर त्याच बिल्डींगमध्ये पुन्हा हाच गोंधळ होणार आहे.

**अजित पाटील :-**

त्याच्यामध्ये टॅक्स सारखा लागेल पण फक्त पेनल्टी लागेल.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, आता त्यांनी सांगितले की, तसे नगररचनाकडून आम्हांला माहिती देतील. पहिला माळा अधिकृत, दुसरा माळा अधिकृत आणि तिसरा माळा अनधिकृत तिथे लोकांना काय माहित पडेल? जे घेणार आहेत त्यांना काय माहित पडायला पाहिजे की, नाही?

**मा. महापौर :-**

तो विषय येथे कुठे आहे?

**शरद पाटील :-**

आता त्यांनी तेच सांगितले. त्यांनी आता काय सांगितले अनधिकृत टॅक्स असेल. तिसरा माळा अनधिकृत असेल तर अनधिकृत टॅक्स लावणार असे सांगितले ना. त्याच्यामध्ये लोक भरतील का बिल्डर भरतील.

**मा. महापौर :-**

ज्याच्याकडे ताबा आहे तो भरेल.

**शरद पाटील :-**

त्या लोकांना कसे माहित पडेल की, ते अनधिकृत आहे असे.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, मागच्यावेळी हाच विषय महासभेसमोर मांडला होता. जी बिल्डींगला हौसींग लोन मिळते.

**शरद पाटील :-**

म्हणजे या शहरात आपण अनधिकृत रोकण्याचा प्रयत्न करायचाच नाही. त्यांना डबल टॅक्स लावतो. तुम्ही अनधिकृत बांधा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही बिल्डरला शास्ती करा आणि ज्याने फ्लॅट खरेदी केलेला आहे हा फ्लॅट इललिगल आहे म्हणून तुमच्याकडून बिल्डरकडून कन्फम करून घ्या.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, आपण पेनल्टी लावावी म्हणून महासभेनेच परवानगी दिलेली आहे. त्यावेळेला हे सदस्य होते.

(सभागृहात गोंधळ )

**मा. महापौर :-**

महासभेचा ठराव आहे त्याचप्रमाणे ती कार्यवाही होत राहील. त्या विषयाशी आजचा काही संबंध नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महासभेने त्या जी.आर. च्या विरोधात जावून काही बाब केलेले आहे. त्यामध्ये तिसरा माळा अनधिकृत ठरवा असे कुठेही नाही.

**मा. महापौर :-**

पुर्ण बिल्डींग इललिगल ठरवायची का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

होय.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपण दुसरा तिसरा माळा सांगतोय इललिगल ठरवाल. एखाद्याने चौरस वाढवल्यानंतर काय़ लिगल? तर तुम्ही त्याला असे का लावत नाही की.....

**मा. महापौर :-**

शांततेने ऐकून घ्या. आपण एखाद्या जी प्लसला ६ ची परवानगी दिली आणि एक माणूस आपल्याकडे आला की, पाचवा माळा हा लिगल आहे व आपण त्याला सांगणार की, तुम्ही घ्या ते लिगल आहे आणि त्याने फ्लॅट विकत घेतला. काही सहा महिन्यानंतर जेव्हा बिल्डींग पुर्ण होईल तेव्हा त्याने सातवा माळा बांधला तर तुमचे असे म्हणणे आहे की, ज्या माणसाने आपल्याकडून लिहून घेतले. सहावा माळा लिगल आहे तर त्याला ही पेनल्टी लावायची का?

**शरद पाटील :-**

हो. तुम्ही सातवा बांधू का देत नाही.

**मा. महापौर :-**

तोडायचे, ठेवायचे, लावायचे तो विषय आज संबंधित नाही, शास्ती कोणावर लावावी तो विषय आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यावेळी तुम्ही विचार करा. त्या सातव्या माळ्यावर कोण राहायला आलेले आहे ते...

**मा. महापौर :-**

ती त्याची जबाबदारी आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जर ते बिल्डरच्या नावाने आहे. बिल्डरने एकदा विकल्यानंतर त्या माणसाला नंतर लक्षात येईल की, ही पेनल्टी भरायची आहे.

**मा. महापौर :-**

त्या फ्लॅट ओनरची जबाबदारी आहे की, त्याने टॅक्स पावती चेक करावी. महानगरपालिकेत तपासणी करावी की....

**एस.ए.खान :-**

आम नागरिकांना हे कसे काय माहित पडेल? कुठली बिल्डींग अनधिकृत आहे व कुठली अधिकृत.

(सभागृहात गोंधळ )

**डॉ. राजेंद्र जैन :-**

यह गलत काम है? इतका कॉम्पलेक्स कानून है, एक अकेला आदमी यह जानकारी नही ले सकता। आप टाऊन प्लानिंग के साहब को सामने बुलाईए।

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब पहिल्या वेळी राजे महाराजे वेश बदलून जात होते, पण आपण खाली कुठच्याही डिपार्टमेंटला वेश बदलून बसा, अधिकारी लोकांना किती उत्तर देतात ते बघा. तुम्ही काय सांगता लोकांनी तिथे जावून विचारायचे? ते लोकांना कॉपरेट करतील असे वाटत नाही.

**मा. महापौर :-**

ठराव सभागृहाने केलेला आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

टाऊन प्लानिंग के डिपार्टमेंट का इनकम लाने के लिए अगर फिफ्टी बिल्डींग को ओ.सी. नही है। तो ओ.सी. नही होनेपर पेनल्टी नही लगती है क्या? तीन साल के अंदर पैसे देना चाहिए तो क्यो नही आज तक

लिया गया? २) लिगल, इलिगल की बात होती है, आप सी.सी. देते हो सर्टिफिकेट की, फस्ट स्लॅब, सेकेंड स्लॅब, थर्ड स्लॅब की परमिशन दे देते हो, तो आपका लिगल इलिगल होगा ही नही।

**मा. महापौर :-**

हर स्लॅब को देने का?

**डॉ. राजेंद्र जैन :-**

हा, क्यो नही? आप बताईए क्यो नही ?

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, आपण नेमकं कशाला लिगल म्हणणार आहोत?

**मा. महापौर :-**

शांततेने समजून घ्या. एखाद्या नगरपालिकेने परवानगी दिली आणि प्लानप्रमाणे त्याने बिल्डींग बांधली तर नियमाप्रमाणे कर लागतील. एखादी त्याने जर प्लिंथ वाढवून टाकली तर तो पूर्ण बिल्डींग करेल जर ज्यादा फुट फ्लॅट वाढला म्हणजे पूर्ण बिल्डींग इललिगल झाली आणि एखादे सहा माळे लिगल आहे व सातवा माला इललिगल आहे तर तो सातवा माळाच इललिगल म्हणून गृहीत धरला जाईल. कारण त्याची पण जबाबदारी आहे. फ्लॅट घेताना की. ते सगळे कागदपत्र तपासायचे आहे. महापालिका जास्तीत जास्त आपण जिथपर्यंत परवानगी दिली आहे. तिचपर्यंत आपण ते सर्टीफाय करू की, आम्ही एवढी परवानगी दिली आहे तुम्ही फ्लॅट घ्या. एखाद्या ठिकाणी तुम्ही भूमिपुजनाला गेलात आणि महापालिकेला विचारले की, ह्याला किती पुट फ्लॅटची परवानगी आपण दिली? तर आपण सांगणार की, अमुक अमुक फुटची आहे. तुम्ही फ्लॅट बुकींग करून घेतले आणि त्यानंतर कोण  दोन वर्षानंगर गेले की, मला सातवा माळा पाहिजे म्हणून त्या ग्राऊंड फ्लोअरवाल्याला मारायचे का? त्याने त्या आपल्या महापालिकेला विचारून तो फ्लॅट घेतला की हे बरोबर आहे का आणि आज पण तो बरोबर आहे. तर वरचे इलिगल आहे. तर त्याच्यावरच फक्त कार्यवाही व्हायला पाहिजे. सन्मा. सदस्य शरद पाटीलजी आणि पूर्ण बिल्डींग वाढवली तर पूर्ण बिल्डींगंच इललिगल.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, एखाद्याने जर एखादा माळा वाढवला. आपण त्याला कर लावला. सगळी मंजुरी दिली आणि उद्या आपण जर ते पाडायची मागणी केली तर तो कोर्टात जाणार नाही का? कर लावला आहे म्हणून.

**मा. महापौर :-**

त्याला आपण लिगल करत नाही, टॅक्स लावल्याने लिगल होत नाही.

**नयना म्हात्रे :-**

ज्या दिवशी आपण तोडायची मागणी करणार त्यादिवशी तो कोर्टात नाही का जाणार?

**मा. महापौर :-**

टॅक्स आता पण लागलेला आहे. फक्त ापण त्याला तीनपट करतोय तेवढेच आहे. बाकी काय फरक नाही.

**नयना म्हात्रे :-**

एखादा गरीब माणूस फ्लॅट घ्यायला जाईल तर त्याची चुकी नसताना सक्ती. तो कशाला तीनपटीने तुमचा टॅक्स भरेल.

**मा. महापौर :-**

त्या विषयावर आपण गटनेत्यांची बैठक लावू व त्याच्यावर परत विचार करू. जे बोलायचे आहे ते आपण बजेटवर बोला. या तो सभागृहने नक्की करो लाईन पर चलनेका या फिर नक्की करो बर नगरसेवकाने कितना टाईम बोलनेका, मेरी तयारी है।

**भगवती शर्मा :-**

सभी को बोलने दिजीए।

**मा. महापौर :-**

एका नगरसेवकाने जे आहे ते त्याचे मत पूर्ण मांडावे परत उठायचे नाही.

**भगवती शर्मा :-**

इसलिए तो बजेट में प्रॉब्लेम होती है। आप सबको बोलनेकी आझादी नही देते है। इनको देखीए कितने टाईमसे खडे है।

**मा. महापौर :-**

वह बोले लेकिन पुरे बजेट मे एक ही बार बोले। वापस खडे होकर नही बोले।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आप मुझे जवाब दिजीए। एस बजेट मे ओ.सी. पर पेनल्टी लगाने इनकी कौनसी इनकम दिखाई गई है। ओ.सी.के. बिल्डींग के उपर कितना डिमांड लगना चाहिए था और कितना उसपर करनेका आपका प्राविधान है।

**मा. महापौर :-**

मै उनको उत्तर देने के लिए बोलता हु लेकिन अगर इस तरह से हम जाऐंगे तो बजेट होगा नाही। हर नगरसेवक को बोलना है तो मुझे कोई तकलिफ नही है, लेकिन वह एक ही बात पुरे बजेट के उपर हर पेजेस पर जो बोलना है वह बात को नही, जैसे सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील बोल रहे है। वह यह भी बोल रहे है, वही वह भी बोल हे है। सब एक ही बात बोल रहे है तो उसको मिनींग ही नही है।

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, आम्ही जर नाही बोललो व उद्या जर तसे झाले तर दुसरे कोणतरी बोलेल तुम्ही होता ना त्यावेळेला, तेव्हा का नाही बोललात? मग ते कोण ऐकेल नंतर?

**मा. महापौर :-**

माझे असे म्हणणे आहे की, एकच गोष्ट रिपीट करू नका.

**भगवतीी शर्मा :-**

सबकी समझ अलग है। इसके लिए तो यहापे भेजा है।

**लक्ष्मण जंगम :-**

या विषयावर लोक बोलले नसतील पण विषय असा आहे की, चुकीचे विषय आपण जे तेवढ्या टाईमासाठी पाच मिनिटासाठी थांबवतो त्याचा जर त्यावेळेला निर्णय झाला तर हे परत परत वादावादी होणार नाही. तुम्ही विषय लक्षात घ्या. तुम्ही मला सांगता, कुठली बिल्डींग इललिगल आणि लिगल तर तुम्ही समजावले. मी तुम्हांला सांगतो, तुम्ही जी बिल्डींग बांधता तुम्हांला अशी प्रकरणे १,२ नाही तर ५ देतो. त्याला महानगरपालिकेची परवानगी आहे असे त्यांनी रजिस्ट्रेशन ऑफीसला पेपर दिले आहे. त्याच्यामध्ये आहे कलेक्टरची परवानगी आहे. सगळं आहे आणि सगळ्या हौसींग फायनान्स कंपन्या त्यांना लोन देतात आणि माहितीच्या अधिकाराखाली विचारले तर त्या बिल्डींग बांधायला.

**मा. महापौर :-**

ती १००% आपल्याकडे परवानगी नाही. इललिगल आहे. परवानगी दिली नाही म्हणजे ती बिल्डींग इललिगल त्याने काय सबमिट केले? कुठून लोन घेतले हा आपला विषय नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

नाही, म्हणजे तुमचा हा कारभार "आंधळ दळतय आणि कुत्रं पिठ खातय." अशातल्या तुम्ही कारभार चालवला आहे का? तुम्ही मला सांगा, आयुक्त कशावर बोलणार आहात आणि आम्ही लोक बोलू आम्ही लोकांना बिल्डींग बनवताना अधिकाऱ्यांनी जे काय करायचे ते करायचे. त्याच्यानंतर इललिगल बनवणयासाठी जे काय कोणाचा आर्शीवाद असेल त्यांनी आर्शीवाद लावायचा आणि दंड या शहरामध्ये येणाऱ्या लोकांनी भरायचा का?

**मा. महापौर :-**

शासनाने जी.आर. काढला ह्याचा अर्थ असा का, शहरात इललिगल बांधकाम व्हावे म्हणून.....

**लक्ष्मण जंगम :-**

कोणी करावा हा विषय नाही पण ज्याने केले त्याच्यावर प्रशासनाचा जाब नको का?

**वंदना चक्रे :-**

बजेटच्या या मिटींगमध्ये या विषयावर माझे असे म्हणणे आहे की, पहिला माळा ते तिसऱ्या माळ्यापर्यंत लिगल बांधकाम, परमिशन, त्यांच्यावर नंतर ४,५ आणि ६ इललिगल खाली लिगल व वर इललिगल. मग कशासाठी आम्ही वारंवार मागच्या मिटींगला सुध्दा सांगितले होते. आता कर लावण्याचा प्रश्न आला डबल, समजा मी एखादा प्लॅट विकत घेतला आता तर मला माहित नाही, सगळे काही डोक्याने शिकलेले नाहीत किंवा बुद्धीवान नाही किंवा तज्ञ नाही तें जावून बघतील की, खालचे लिगल व वरचे इललिगल आहेत म्हणून आमचे असे म्हणणे होते की, मी वारंवार सांगायची की, तुम्ही त्या ठिकाणी पाट्या लावा. महानगरपालिकेचे हे तीन माळे, दोन माळे, चार माळं इललिगल आहेत व खालचे लिगल आहेत ते तुम्ही लावले नाही. ही दिशाभूल महानगरपालिकेने शासनाने केलेली आहे. त्याचा परिणाम राहत्या त्या वॉर्डामधील नगरसेवकांना आणि घेणाऱ्या लोकांना जे कोणी आयुष्याची कमाई त्याच्यामध्ये घालतात अशा लोकांचे नुकसान होते.

**शरद पाटील :-**

त्यांनी बोलले त्याचे उत्तर तुम्ही काय दयाल हे मी तुम्हांला सांगतो. त्यांनी बोलले ते चुकीचे आहे हे मी सांगतो. तुम्ही त्या बिल्डरवर सक्ती करा की, तुमच्या पाट्या इथे लागल्या पाहिजेत हे अमुक अमुक स्के.फुट ची बिल्डींग आहे. अमुक अमुक माळ्याची बिल्डींग आहे. हे कम्प्लीट लागले पाहिजे आणि त्याच्यावर ही, आपल्या अधिकाऱ्यांना गाड्या दिलेल्या आहेत. त्यांना चेकींगसाठी पाठवा. आपल्या अधिकाऱ्यांना आपण जर कधी कुठच्या गोष्टी ची तक्रार केली तर साहेब तुम्ही अर्ज दया. कशाला अर्ज दया?

**मा. महापौर :-**

आपण बोलता की, बिल्डरने बोर्ड लावायचे व मॅडम बोलतात आपण बोर्ड लावायचे इललिगल असल्यावर....

**शरद पाटील :-**

नाही, त्या बिल्डरनेच तो बोर्ड लावला पाहिजे. जी परमिशन दिली आहे त्या बिल्डरने बोर्ड लावला पाहिजे. आणि तुमच्या म्हणण्यानुसार ते बरोबर आहे. आपण तीन माळ्याची परमिशन दिली आहे. लोकांना आपण तीन माळ्याचे सांगतो.

**मा. महापौर :-**

बोर्ड कोणी लावायचे?

**शरद पाटील :-**

बिल्डरने.

**मा. महापौर :-**

जी + ३ चा बोर्ड लावला आणि बिल्डींग अशी वाढवली तर?

**शरद पाटील :-**

तशी वाढवतील म्हणून त्यांनी तसा सगळा एरिया दयायचा....

**मा. महापौर :-**

सामान्य नागरिक काय मोजणार १,२,३, मग तुम्ही बोलणार महापालिकेने सक्ती का लावली नाही?

**शरद पाटील :-**

त्याने त्याचा बायोडेटा दयायचा आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सर्व सन्मा. सदस्यांना माझी विनंती आहे की, अनधिकृत बिल्डींगला टॅक्स कसा लावावा? आजच्या सभेमध्ये फार सिनिअर सदस्य आहेत व अपेक्षित एवढेच आहे की, चालू येणाऱ्या आर्थिक वर्षामध्ये अनधिकृत बांधकामातून किती उत्पन्न होईल हे गेस करायचे आहे आणि पूर्ण वर्षभर अनधिकृत बांधकामाचा जो टॅक्स आहे ते कसे एक्झ्युकेशन केले जाते. त्याच्यावर आपल्याला वर्षभर चर्चा करता येईल. प्रकरण वाईस चर्चा करता येते. आज अपेक्षित काय आहे तर मालमत्ता करामध्ये जे वेगवेगळे हेड आहे. १) मालमत्ता कर २) मोकळ्या जागेवरील कर ३) विशेष शिक्षण कर ४) अग्निशमन कर ५) विशेष स्वछता कर ६) वृक्षकर आणि ७) अनधिकृत बांधकाम वरील कर. अशा वेगवेगळ्या करातून या पोटी किती उत्पन्न होईल याच्याबद्दल चर्चा करणे अपेक्षित आहे. याचे जे इम्प्लीनेन्टेशन आहे. ॲक्च्युअल आकारणी आहे. आपण प्रकरण वाईस सुद्धा त्याच्यावर वेळोवेळी चर्चा करू शकतो. आज ह्याच्यातून किती उत्पन्न कसे होईल. त्याचे दर काय असतील? ते तर शासनाने आणि वेळोवेळी महासभेने ठरवून दिलेल्या दराने प्रोसीजरनेच केले जाते. त्याच्यामध्ये एखादी प्रोसीजर आपल्याला अपेक्षित असल्यासारखी नसेल तर महासभेला वेळोवेळी त्याच्यामध्ये सुधारणा करता येतात. हा विषय आपल्याला कधीही वेगवेगळ्या महासभेत जाऊन करता येतो. पण आपण आज एकाच दिवशी सर्वच विषय याठिकाणी अंतिम करणार असाल तर मला वाटते की, फार मोठा तो विषय होईल तर अपेक्षित उत्पन्न ते उत्पन्न कसे साध्य केले जाईल त्याच्यावर आपण येणाऱ्या काळामध्ये निर्णय घेऊ शकतो.

**वंदना चक्रे :-**

उपायुक्त साहेब, तुम्हांला घ्यायचे असेल तर मी, तरी असे म्हणेन की तुम्ही बिल्डरकडून घ्या. जनतेकडून कशाला? तुम्हांला महानगरपालिकेला जर उत्पन्न हवे असेल तर डबल टॅक्स लावून उत्पन्न हे जनतेकडून का?

**मा. महापौर :-**

आपण बिल्डरकडूनच घेणार आहोत. पण बिल्डरन विकले तर कसे करायचे?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

सर्व माझ्या नगरसेवकांना, नगरसेविकांना एक विनंती आहे की, हा विषय येथे बजेटचा चालू आहे आणि ह्या बजेटमध्ये आपल्याला खरोखर फक्त बजेटवर चर्चा करायची आहे. कुठे हेड वाढवायचे आहे. कुठे कमी करायचे आहे त्याच्यावर चर्चा केली तर फार उत्तम मिटींग चालेल? आण माझे ही एकच मत आहे की, ह्याच्यावर दुसरा विषय आपल्याकडे पाच वर्षे राहिले आहे आपण महिन्यात आपण कुठले विषय घ्यायचे त्याच्यावर महापौरांनी विषय घेऊन आपण त्याच्यावर चर्चा करू शकतो पण आज बजेटवर चर्चा आहे तर पूर्ण दिवस बजेट चालू दया आणि व्यवस्थित पार पडू दे अशी विनंती करतो. धन्यवाद.

**मा. महापौर :-**

श्री. लोंढे साहेब, आपण किती यादी टाऊन प्लानिंगकडून टॅक्स डिपार्टमेंटला दिली व किती दयायची बाकी आहे व आपण त्याबद्दल काय कार्यवाही केली व काय करणार आहे त्याची माहिती दया.

**मिलन पाटील :-**

पूर्ण माहिती दिली पाहिजे.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

आपल्याकडे मोकळ्या जागांचे १८६ प्रकरणे आहेत. त्यापैकी १२५ प्रकरणांची माहिती आपण कर विभागाला वेळोवेळी पाठवलेली आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

हे प्रशासनामध्ये कुठे मेहकाई काढली मी तुमच्या समोर अजून बरीच प्रकरण आहेत. हे बजेट १० दिवस संपणार नाही.

**मा. महापौर :-**

हे १२५ बोलतात पण माझी खात्री आहे की, ३५०, ४०० पेक्षा जास्त प्रकरण असतील. कारण की, आपण असे नाही ठरविले की, ह्यावर्षी प्लान पास करणार आणि त्यालाच लावणार. आतापर्यंत जेवढी सो.सी. आपण दिलेली आहे आणि अंडर वर्किंगमध्ये आपण त्याला १ एप्रिल पासून कर लावणार आहे. फक्त सन २००८-०९ च्या इमारतीवर लावणार नाही. मागचे २००७-०८ किंवा २००५-०६ जे काही इमारती असतील आणि त्यांचे काम आज चालू आहे. त्यांना १ एप्रिल पासून कर आकारणी करावी.

**प्रफुल्ल पाटील :-**

स्पष्टीकरण करा. ते म्हणतात की, १२५ केसेस पाठवल्या हे म्हणतात. फक्त ८० आल्या म्हणजे हे काय आहे?

**चंद्रकांत वैती :-**

दरवेळेला मी म्हणालो की, या शहराचे दुर्दैव सुरू आहे असे मी नेहमी सांगतो त्यांचे हे जातिवंत उदाहरण आहे. कर्मचाऱ्यांमध्ये एचओडी मध्ये इंटरकनेक्शन कुठले नाही. प्रत्येक डिपार्टमेंटला काय असते. आमच्या वकील साहेबांनी सांगितले, मिरा रोडला चार फ्लॅट आहे. एक फ्लॅटचे पैसे भरायला गेल्यानंतर सांगतो की, माझे काय? ही कर्मचाऱ्यांची, अधिकाऱ्यांची प्रवृत्ती असेल तर ते अतिशय गंभीर आहे. आपण जर १२५ प्रकरणे पाठवली असतील महापौर महोदय सांगत असतील की ते ३०० असतील आणि कर निर्धारक सांगत असतील का ते ८० आहेत तर मग त्या ८० वर कार्यवाही झाली का नाही? त्याची बिल पाठवली गेली का नाही आणि या शहराचे दुर्देव आहे हे स्पष्ट होतय. अजून सुधार करा. आपल्यामध्ये जर आपसमध्ये ताळमेळ नसेल तर तुम्ही महापालिकेचे कामकाज कसे चालवाल या जनतेकडून. या शहरातील लोक खुप शोषिक आहेत. साडे आठ लाख लोकसंख्या झाली तरी पण ८० एमएलडी मध्ये सुखरूप आहे. तुम्हांला फिरून देता....

**मा. महापौर :-**

जेवढी इमारत, शहरात बांधकाम चालू आहे. हे नक्कीच १२५ पेक्षा जास्त आहे हे कोणालाही दिसून येईल. मंदी हे फिर भी सी.सी. लिया है और पैसा भरना है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, मोकळ्या जागेवरचा जो टॅक्स आहे तो तुम्ही त्या डिपार्टमेंटला दया. ते तुम्ही तिथे दिले तर तसे कॉडीनेशन होणार नाही. जसे हे विकासकर्ते करतात ना.

**एस.ए.खान :-**

जसे आर.एन.ए फ्लॅटमध्ये चार फ्लॅट आहे व तीन फ्लॅटचे टॅक्सचे पैसे भरले व एका फ्लॅटच्या टॅक्सचे पैसे भरायला येत आहे. तर तो म्हणतोय हे आमच्या वरच्यांसाठी पैसे घेतो. आजच सकाळी तो आला होता पण मी बोललो की, आज जनरल बॉडीला आहे. आपण मंगळवारी सकाळी या. मी बघतोय काय आहे ते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

१२५ आणि ८५ काय आहे ह्याचा खुलासा तरी करा.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

प्रशासनाचे जे इंटर्क्शन चांगले.....

**मा. महापौर :-**

तुम्ही रायटींगमध्ये दिलेले तुमच्याकडे पत्र आहे का? वर्बली, ओरली काय?

**उत्तरेश्वर लोंढे :-**

माझ्या अगोदर दिलेले पत्र आहे.

**मा. महापौर :-**

त्याची रायटींगमध्ये कॉपी आहे का?

**उत्तरेश्वर लोंढे :-**

आहे.

**मा. महापौर :-**

किती प्रकरण आहे ते दाखवा. ८५ आहेत ना?

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर महोदय, ज्यावेळी आम्ही तो ठराव केला. महाराष्ट्र शासनाचा जी. आर. आला. खरं म्हणजे सगळ्या सदस्यांनी ह्याच्यावर विचार करायला पाहिजे महाराष्ट्र शासनाच्या जी.आर.मध्ये काय म्हटले आहे की सगळ्या अनधिकृत बांधकामांना टॅक्स लावा. ठाणे महानगरपालिकेने काय केले पूर्वी पासुन ज्या काही अनधिकृत बिल्डींग आहेत त्यांना टॅक्स लावला मा. आयुक्त साहेब हे सुद्धा मानायला तयार नव्हते जुन्या

बिल्डींग आहेत अनधिकृत त्यांना सुध्दा मी टॅक्स लावणार त्याच्यावर आमची वादावादी झाली. आयुक्त साहेबांना मी सांगितले की, जो. जी.आर. आज आला त्याचा तुम्ही पुर्वलक्षी इफेक्ट कसा देवू शकता? आज जी. आर आला तर आजपासून लावू. म्हणजे जुन्या गोष्टी गेल्या. नव्या गोष्टी तरी नीट होऊ दया. नव्या गोष्टी नीट होत नाही मग तसे ह्या सगळ्या प्रकरणांना शास्ती लावायची.

**मा. महापौर :-**

प्लानिंगने जरी यादी पाठविली आहे ती शास्तीबद्दलची पाठवलीच नाही. रूटींन प्लान पास सी.सी.वाली पाठविली. मोकळ्या जागेचे.....

**प्रफुल्ल पाटील :-**

आजच्या तारखेला जेवढ्या जुन्या पार्ट सी.सी. किंवा फुल सी.सी.पेन्डींग आहे म्हणजे एखादे शांती नगर धरले त्यांना कधी सी.सी. दिलेली आहे आणि त्याच्यामध्ये अजून त्यांची सी.सी. वापरली नाही. काही ठिकाणी मोकळा भूखंड असेल, अजून त्यांना इमारती बांधायच्या असतील. त्याठिकाणी सुद्धा टॅक्स तेव्हा पासून लागला पाहिजे.

**मा. महापौर :-**

त्यामध्ये ऑलरेडी ज्या बिल्डींगला कर आकारणी झालेली आहे. तेवढे वगळून बाकीच्याला लावायला पाहिजे.

**प्रफुल्ल पाटील :-**

पार्टमध्ये म्हणतोय, पार्ट सी.सी. ज्याची बाकी आहे. म्हणजे १० बिल्डींगला परमिशन दिली एका सी.सी. मध्ये ५ बिल्डींगचे बांधकाम झाले व ५ बिल्डींगचे बांधकाम बाकी आहे. मग त्यांना टॅक्स लावायाला पाहिजे.

**मा. महापौर :-**

पाच बिल्डींगला मोकळ्या जागेचा कर व पाच बिल्डींगला रूटीन टॅक्स लावले पाहिजे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तसे कुठे आहे? तशी प्रकरण टाऊन प्लानिंगने एक ही शोधून काढली नाही.

**मा. महापौर :-**

ह्यांचे काम फक्त मोकळ्या जागा द्यायचे आहे. बिल्डींग झाली की, त्यांचे काम आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

ज्यांच्यामध्ये इमारती झाल्या नाही त्याची माहिती टाऊन प्लानिंगकडे असणार आहे. का, टॅक्सवाले थोडीच शोधणार आहे?

**मा. महापौर :-**

तेच शोधतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

इललिगल बिल्डींग कोण शोधणार?

**मा. महापौर :-**

पाटील साहेब, आपण जी चर्चा करतोय ती सध्या मोकळ्या जागेची करत आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मोकळ्या जागेची म्हणजे काय? तुम्ही जर बिल्डींगसाठी सी.सी. दिली १० बिल्डींगसाठी त्याच्यामध्ये ५ बिल्डींग ऑलरेडी बांधून झाल्या व ५ बिल्डींगमध्ये त्याने बांधकाम सुरू केले नाही. ती मोकळी जागा झाली की, नाही? ती प्रकरण अशी किती वर्षापासून सी. सी. पेन्डींग आहेत.

**मा. महापौर :-**

रिव्हीजनल जे येते आणि ५ बिल्डींग झालेली आहे व ५ बिल्डींगला नवीन परवानगी दिली त्याबद्दलचे

**प्रफुल्ल पाटील :-**

ते पण प्रकरण त्यांनी दयायला पाहिजे. मा. महापौर साहेब, तुम्हांला दुसरा विषय सांगतोय की. हा टॅक्सचा विषय चालू आहे. आपण सी.एफ.सी. सेंटर मधल्या मुख्य अधिकाऱ्यांना बोलवा. प्रश्न असा आहे की, मला एक बिल आले त्याच्यामध्ये मागील थकबाकी दाखविली टोटल, हेडवाईस आणि शेवटी काय सांगितले. व्याज नोटीस फी, वॉरंटी तर मला बिलच आले नाही. त्याच्या अगोदर नोटीस फी कशी लागली. नोटीसच नाही आली. त्याच्या अगोदर वॉरंटी कशी आली? तेही वाजूला ठेवा. गेल्यावर्षीचे बील मी भरले नाही तर हयावर्षी प्रत्येक टॅक्समध्ये वर्गवारी जी केलेली आहे. मालमत्ता कर विशेष कर, वृक्षकर हा कर तो कर त्याच्यामध्ये प्लस इंटरेस्ट ॲड होऊन आले. ही कुठली पध्दत आहे. टॅक्स लावायची? तुमचे टॅक्स एरियसमध्ये आहे तर त्याच्यामध्ये पुढच्यावर्षी जर तुमचा इंटरेस्ट येतो तर मागचे इंटरेस्ट एरियर्सच्या कॉलममध्ये ते क्लोज झाले पाहिजे. प्रत्येक हेडवाईस तुमचे इंटरेस्ट कसे काय डिस्ट्रीब्युट होत आहे की, कुठली पद्धत आहे असे कधीही टॅक्स लागले नव्हते. दोन-चार वर्षामध्ये नवीन पध्दत सुरू झाली आहे. म्हणजे एखाद्या, मला जर माझा फ्लॅटचा २०० स्क्वे.फुट च्या फ्लॅटला ४५० रू. टॅक्स फिक्स आहे. मी ४५० रू. नाही भरले तर मला

वर्षाचे जे इंट्रेस्ट आहे ते तुम्ही लावणार. त्याची नोटीस फी लावण्यात येणार. आता ४५० रू. च्या माझ्या मालमत्तेच्या टॅक्सवर तुम्ही ५० रू. मला इंटरेस्ट लावला व मी ते भरले नाही तर पुढच्या वर्षी काय येणार? की, ४५० रू माझी करंट, मागच्या वर्षीचे इंटरेस्ट ५० रू. प्लस ह्यावर्षीचे जर असेल तर. पण तुम्ही काय करता ते मागच्या वर्षीचे ५० रू. इंटरेस्टचे ४५० मध्ये वर्गवारी डिवाईड करता ही कुठली पद्धत आली? म्हणजे ते काय, कंम्पाऊंड व्याज झाले की, कसे झाले? ही काय सिस्टीमच नाही. म्हणजे मी कुठे असे सर्टिफाय करू शकत नाही की, मी अनेक वर्ष २०० स्के. फुट च्या फ्लॅटमध्ये राहत आहे. त्याला ४०० रू. त्याच्या पुढच्या वर्षी ५०० रू. त्याच्या पुढच्या वर्षी ६०० रू. ही कुठली पध्दत आहे. तुम्ही त्या सी.एफ.सी. च्या लोकांना बोलावून इथे घ्या. तुमचे सॉफ्टवेअर खुप पैसे देवून घेतले आहे ते वाट लावून टाकले तुमच्या महानगरपालिकेच्या टॅक्स डिपार्टमेंटची कुठे कसली माहिती नाही. एकाही डिपार्टमेंटची तुम्हांला नीट माहिती मिळत नाही. रेग्युलर माहिती मिळत नाही. हा जो चार्ट घेतला आहे. त्या चार्टमध्ये काय आहे? मालमत्ता कराची एकूण मागणी. इज स्पेसीफाय. तुम्ही बजेट बनवता, काय खतऱ्याचे बजेट बनवले आहे. त्याच्यापेक्षा पोथी दयायचे ती वाचायला बरी आम्हांला घरी बसल्या वसल्या, महाभारत, बायबल आणि आणखिन काय ते. त्याच्यामध्ये तुम्ही सरळ सरळ मोकळ्या जागेवरील कर, सुधारीत बजेट तयार केले. त्याच्यामध्ये तुम्ही ते टाकायला पाहिजे. आता श्री. अजित पाटील बोलले की, आम्ही ८४ प्रकरण पैकी ६८ प्रकरणाला किती टॅक्स लावला? त्याच्यात तुम्ही काय म्हटले आहे की, अनधिकृत बांधकाम, म्हणजे आम्ही जो टॅक्स लावला व एक्स्ट्रा बांधकाम केले त्याच्यावेळी टॅक्स लावला हे बरोबर आहे. ज्या अधिकृत इमारतीमध्ये एक्स्ट्रा एफएसआय जो वापरला आहे त्याला तुम्ही टॅक्स लावला आहे. कुठला सेक्शन खालचा तो २६७ (अ) खालचा आहे ना, मग २६७ (अ) काय दाखवतोय तो अख्खा ब्लॅक आहे. तुमची बजेट प्रोव्हीजन पुढच्या वर्षाची १ करोड रू. कुठे कसली माहिती? किराणाच्या मालाच्या दुकानात गेल्यानतर तिथे आपण होलसेल मालाचा कपडा मागतो का? चणे-वाटाणे, तेल, शेंगदाणे मागणार ना. मसाल्याच्या दुकानात गेल्यावर काय साबण मागायचे? म्हणजे मसाल्याच्या रकानामध्ये साबणाचा खर्च, साबणाच्या रकान्यामध्ये मसाल्याचा खर्च म्हणजे काय आहे? बजेट बनवताना तुम्ही रितसर बनवा. तुम्ही तर नवीनच बनवताय. मी असे नाही म्हणत की, मागच्या वर्षाचे जे तुम्ही सन २००५-०६, २००६-०७, २००७-०८ चे फिगर चेंज करा. ते तर तुमचे फिक्स झाले आहे. पण सन २००८-०९ ची जेव्हा तुम्हांला पोझिशन लक्षात आली की, आम्ही नवीन शास्ती लावली त्या शास्तीमुळे आम्हांला मोकळ्या जागेवरचा कर मिळायला लागला. जास्तीचे बांधकाम केले म्हणून त्याच्यावरचा कर मागायला लागला. त्याच्यावर तुम्ही स्पेसीफाय करायला पाहिजे होते. सन २००८-०९ मध्ये व सन २००९-१० मध्ये ही तुम्ही स्पेसीफाय करायला पाहिजे आणि तुम्ही म्हणताय की, तुमच्याकडे ८४ प्रकरणं आली आहेत आणि १ कोटी रू.ची तुट तुम्ही दाखवताय की अनधिकृत बांधकाम शास्ती २६८....

**अजित पाटील :-**

ते मोकळ्या जागेचे.

**प्रफुल्ल पाटील :-**

ठिक आहे. तुम्ही ते म्हणताय ना की, अनधिकृत जास्तीचे बांधकाम केले त्याचे सुद्धा आले आहे. तो हेड आल्यावर आपण बोलू. तुम्ही सी.एफ.सी च्या लोकांना बोलून ठेवा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, व्याज का विषय निकला. अभी बिल आता है अक्टूबर मे नोव्हेंबर मे और व्याज पुरे साल का लगाता है। इसपर महासभा मे चर्चा हुई थी। आप व्याज कभी देंगे? जब बिल भेजा है उसके मे व्याज दोगे ना। आप चार महिने पहिले व्याज लेते हो।

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, मालमत्ता करावर पुढे चर्चा चालू राहिल.

**मा. महापौर :-**

लंच टाईम २.१५

**प्रेमनाथ पाटील :-**

पाटील साहेब, मी आपल्याला एक प्रश्न विचारला की, मला चारही प्रभागांची माहिती दया. आपण किती कर आकारणी केली २००८-०९ मध्ये

**मा. महापौर :-**

आपल्याकडे चारही प्रभागाची वेगवेगळी माहिती उपलब्ध आहे का?

**अजित पाटील :-**

टोटल डिमांड आहे. प्रभाग क्र. १-१ करोड १७ लाख रू. प्रभाग क्र. २-७ कोटी १८ लाख रू. प्रभाग क्र. ३ – २२ कोटी ११ लाख, २२,०७५ रू.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, हे नवीन कर आकारणीची मागणी आहे का?

**मा. महापौर :-**

टोटल आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मला हे पाहिजे सन २००८-०९ करिता आपल्याकडे किती कर लावण्यासाठी प्रकरण आलेली आहे त्याची तुमच्याकडे टोटल मागितली आहे.

**अजित पाटील :-**

तेच सांगतोय.

**प्रेमनाथ पाटील :-**

ठिक आहे. प्रभाग क्र. ४ ची किती?

**अजित पाटील :-**

९९ लाख रू.

**प्रेमनाथ पाटील :-**

हे सर्व टॅक्स मिळून आहे का? उपकर शिक्षण कर.

**अजित पाटील :-**

सर्व कर.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपली ॲक्च्युअल अमाऊंट किती आहे?

**अनिल सावंत :-**

रिकव्हरी किती आहे ते सांगा?

**अजित पाटील :-**

१ करोड ५९ लाख ७५ हजार रू.

**अनिल सावंत :-**

हे कधीपर्यंतचे आहे?

**प्रेमनाथ पाटील :-**

मला हे पाहिजे, आपण सन २००८-०९ ला जी आकारणी केली ती किती केलेली आहे.

**अजित पाटील :-**

ते आणायला लागेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रभाग अधिकारी आम्हांला देतो आणि तुमच्याकडे नाही? आमच्याकडे आहे. प्रभाग समिती क्र. ३ साठी १ करोड ५० लाखाची आता नवीन कर आकारणी केलेली आहे. प्रभाग समिती क्र. ४ साठी ९० लाखाची आकारणी झालेली आहे. प्रभाग समिती क्र. २ साठी १७ लाखाची आकारणी झालेली आहे. ती तुम्ही ॲड कशी करणार आहे. तुम्ही इथे ऑलरेडी ५० करोड चे आयुक्तांचे अंदाज ४७ करोड ५० लाख स्थायी समिती येथे ४८ करोड ५० लाख रू. आहे. मग आकारणी एवढी २ करोड ६० लाख रू. आकारणी झालेली आहे. मग इथे वाढायला पाहिजे. आपण उलटे कमी केले. ५० करोड चे ४८ करोड ५० लाख रू. केले आहे. प्लस सन २००९-१० साठी कर आकारणी वेगळी.

**अजित पाटील :-**

दाखवले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

कमी केलेले आहे. तुम्ही मोकळ्या जागेचे हेड वेगळे केलेले आहे. ते ह्याच्यात नाही. मालमत्ता करामध्ये ते नाही. आता ह्याच्यामद्ये ५० करोडचे उलटे कमी केले. ४८ करोड ५० लाख रू. स्थायी समितीने केले आहे. ४ करोडचा हेड वेगळा केला आहे. ५- करोड मधून ४ करोड रू. कमी केले तर ४६ करोड रू. झाले. ४६ ला सांगता, ६ करोड रू. कितीचे मग ५२ करोड लाख रू. व्हायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटीलजी आपले नेमके काय म्हणणे आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

माझे म्हणणे हेच आहे की, मालमत्ता करामध्ये वाढ झाली पाहिजे.

**मा. महापौर :-**

किती?

**प्रेमनाथ पाटील :-**

५२ करोड रू. तरी झाले पाहिजे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मगासचा विषय पेन्डींग आहे. टाऊन प्लानिंगला विचारा.

**मा. महापौर :-**

टाऊन प्लानिंगला विचारले. त्यांनी १२५ ची यादी दिली होती व त्यांच्याकडून परत काहीतरी ती एक्स्ट्रा माहिती मागविण्यात आली ८४ ची माहिती त्यांनी दिलेली आहे. बाकी माहिती द्यायची पेन्डींग आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

१२५ प्रस्तावाना किती टॅक्स आला? ८४ प्रस्तवांना तुम्ही टॅक्स लावला ना.

**अजित पाटील :-**

६८ ला ३ करोड ८ लाख रू. झाले.

**प्रफुल्ल पाटील :-**

६८ ला जर ३ करोड रू ८ लाख रू. झाले मग १२५ ला किती व्हायला पाहिजे? म्हणजे ३ कोटी रू. ते वाढतात आणि त्यांनी सांगितले ४ कोटी रू. ते वाढतात.

**मा. महापौर :-**

प्रकरण जास्त आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

प्रकरण जास्त आहे म्हणजे अजून तुम्ही ३ कोटी रू. वाढवा म्हणजे १० कोटी रू. वाढवा. ह्यांना टारगेट दया. त्याशिवाय होणार नाही.

**मा. महापौर :-**

पाटील साहेब, १२५ प्रकरणं आत्ताची म्हणजे साधारण अप टू डिसेंबर त्यानंतर काही प्लान पास झाले असतील ते त्याच्या अतिरिक्त २००७-०८ ला जी परवानगी दिली त्याला कर आकारणी करायला पाहिजे. म्हणजे साधारण ते ३०० च्या आसपास प्रकरण असतील म्हणजे आपण जे फिगर सांगितले त्याप्रमाणे ते फिगर यायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

आता ८४ ला किती झाले?

**अजित पाटील :-**

६८ चे क्लिअर आहे. ३ कोटी ८ लाख रू. बाकी १६ मध्ये डिस्प्युट आहे व माहिती नाही म्हणून परत पाठवले. ते आता काल का परवा आमच्याकडे आले आहे.

**मा. महापौर :-**

ह्याच्यात अजून एक मुद्दा होता की, काहीक पालिकांनी प्लिंथ सर्टिफिकेट हे ते सगळे बंद करून ठेवले आहे. तोही एक मुद्दा पेन्डींग होता. तर आयुक्त आल्यावर त्यांनी चालू केले तर हा कर भरायला बिल्डरला काही वांदा नाही. पण एखादी आपल्याकडून स्थगिती दिली असेल आपण त्या कामाला तर कसे भरायचे?

**प्रफुल्ल पाटील :-**

प्लिंथ सर्टिफिकेट तुम्ही कमेन्समेंटवर करत आहात ना!

**मा. महापौर :-**

कमेन्समेंट केले आणि प्लिंथ केल्यावर त्याला बोलायचे काम बंद कर तर त्याने पुढे काय करायचे? टॅक्स भरायचा आणि काम बंद ठेवायचा.

**प्रफुल्ल पाटील :-**

इललिगल आहे का, तो ते बंद ठेवेल.

**मा. महापौर :-**

मा. महासभेत आपण काल निर्णय असा घेतला की, आता ह्यापुढे इस्टेट इनव्हेस्टमेंट एनओसी मागायची नाही. आपण ते करत जायचे. त्यावेळी काही जे कंडीशनर एनए होते तर आता आपण त्यांच्याकडून स्टेट एनओसी मागतो म्हणून आपण ते सध्या बंद केले होते. आपण जो काल ठराव केला त्याप्रमाणे आयुक्त येतील व आयदर ते कार्यवाही करतील. आयदर ते कुठेतरी रिफर करतील मग निर्णय जिथपर्यंत होणार नाही तिथपर्यंत हा इश्यू पेन्डींग राहिल.

**प्रफुल्ल पाटील :-**

ॲट लिस्ट जे जुने आहेच कमेन्समेंट दिलेले त्याप्रमाणे ते लावा.

**मा. महापौर :-**

म्हणजे साधारण ह्याचे चार टाईम होईल.

**अजित पाटील :-**

साहेब, जर आता ह्यावर्षात लावले नाही तर पुढच्या वर्षी आपल्याला अडचणीचे होईल. कारण करंट ईअरलाच आपल्याला आकारणी करायला पाहिजे, झालेल्या प्रकरणांची....

**मा. महापौर :-**

अजित पाटीलजी आता टॅक्स किती झाला? ८४ प्रकरण किती आहे.

**अजित पाटील :-**

६८ मध्ये ३.८ लाख रू. आहे.

**मा. महापौर :-**

अजून तुम्हांला ८४ दिले म्हणजे साधारण ६ करोड रू. जनरली. आता ह्या ६ करोड रू. मधून आपण अजून रिकव्हरी केली नाही. म्हणजे पुढच्या वर्षी रिकव्हरी करणार प्लस पुढच्या वर्षी नवीन प्रकरण म्हणजे साधारण १० करोड रू.पर्यंत जाईल ३ करोड रू. मधून रिकव्हरी किती आहे?

**अजित पाटील :-**

४५ लाख रू. आहे. पण कोण भरतच नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

सुधारित अंदाजपत्रकामध्ये ती रक्कम टाका आणि ह्याच्यात ही टाका.

**मा. महापौर :-**

ज्यावेळी आपण अजून बिल प्रोड्यूस केले नाही व ते मार्च महिन्यामध्ये करणार तर एवढी रिकव्हरी होणार नाही. मग त्यापेक्षा ते कॅरीफॉरवर्ड करायला लागेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्हांला सगळी जी वाढ आहे ती २००९-१० मध्ये दाखवायची आहे.

**मा. महापौर :-**

म्हणजे आता आपण जे ४७.५० दाखवलेली आहे ते थकबाकी जोडूनच दाखवलेली आहे. तर ह्याच्यातच डायरेक्ट वाढ करा म्हणजे तो कॉलम स्लॉव्ह होईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

कमीत कमी १० कोटी रू. तर होतातच.

**मा. महापौर :-**

मोकळ्या जागेवरचे जे कर आहे ते आऊट स्टॅण्डींग प्लस नवीन. म्हणजे चार कोटी रू. ते त्या जागेवर १० कोटी रू. होईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्हांला टारगेट दिला आहे.

**मा. महापौर :-**

प्रॉब्लेम तोच आहे. आपण वसुली करत नाही. तुम्ही जो टॅक्स लावला आहे तो बरोबर आहे का? नियमाप्रमाणे आहे का?

**अजित पाटील :-**

होय. १०० टक्के नियमाप्रमाणे आहे.

**मा. महापौर :-**

पैसे वसुल करणार?

**अजित पाटील :-**

सी.सी. आणि –

**मा. महापौर :-**

त्यांनी नाही दिले तर वसुल काय करायचे?

**अजित पाटील :-**

ॲक्च्युअली त्यांच्याकडे येते तीच जास्त वसुली असू शकते. आपल्याला प्रोसीजर करायला लागेल.

**मा. महापौर :-**

माझे असे म्हणणे आहे की, तुम्ही जो टॅक्स लावला आहे तो रिझनेबल आहे का?

**अजित पाटील :-**

बरोबर आहे.

मा. महापौर :-

नियमाप्रमाणे आहे ना?

**अजित पाटील :-**

होय.

**मा. महापौर :-**

मग प्रश्न काय?

**अजित पाटील :-**

प्रश्न असा आहे की, आपण कोणाला पाणी कनेक्शन देताना टॅक्स भरायला भाग पाडतो. सी.सी.देताना टॅक्स भरायला भाग पडतो. ते जर वसुली केले तर वसुली होईल.

**मा. महापौर :-**

तुमचे असे म्हणणे आहे की, प्रशासन कार्यवाही करतील ते तुम्हांला अजून माहीत नाही..

**अजित पाटील :-**

प्लिंथ सर्टिफकेट सी.सी. दिले तर अडचणीचे होईल. त्यांनी भरले तर आपण डेव्हलपमेंट कर कसे वसुल करतो. घेतल्याशिवाय सी.सी. देत नाही. तसे झाले तरच वसुली होईल. अन्यथा वसुली कशी होणार?

**मा. महापौर :-**

त्याला अजून एक इलाज आहे. आज आपण जे करतो त्याला ज्यानी केली नाही त्याला आपण शोकास नोटीस दिली तर पुढच्यावर्षी नक्की करेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

नोटीस दया. जर कनेक्शन दिले असेल तर कापून टाका. आपल्याकडे कायदा आहे. पाण्याचा टॅक्स, घरपट्टी टॅक्स भरला नाहीतर ते आपण कापतो.

**मा. महापौर :-**

आपण इथे आता मोकळ्या जागेबद्दल बोलतोय. मोकळ्या जागेवर आपण कसले पाणी कनेक्शन देतो?

**प्रफुल्ल पाटील :-**

हे म्हणतात तसे त्यांना अडवायची तीच भूमिका आहे.

**मा. महापौर :-**

नवीन कर आकारणी करताना आपण ही माहिती घ्या की, त्यांनी मागच्या वर्षाचे ओपन टॅक्स, प्लानचे टॅक्स भरले आहे का?

**अजित पाटील :-**

सी.सी. देताना, प्लिंथ सर्टीफिकेट देताना ते जर वसुल झाले नाही तर प्लिंथ सर्टिफिकेट देताना वसुल झाले पाहिजे.

**मा. महापौर :-**

प्लिंथ सर्टीफिकेट देताना ते थोडीच वसुल करणार?

**अजित पाटील:-**

कमेन्समेंट दिल्यानंतर प्लिंथला मनुष्य येतो तेव्हा वसुल करायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

ते तुम्ही सांगू शकता.

**प्रफुल्ल पाटील :-**

तेच म्हणतोय, प्लिंथ सर्टीफिकेट त्यांनी टॅक्स भरल्याशिवाय देवू नये आणि ते देतच नाही. आमच्या सगळ्या बाल्कनी उघड्या आहेत. तरी सी.सी., एन.ए.,एन.ओ.सी. देताना बंदिस्त बाल्कणीचे पैसे आपण घेतो. टाऊन प्लानिंगवाले पैसे काढायला काही कमी नाही. वरचे नी खालचे दोन्हींकडून बरोबर काढतात. बंदिस्त बाल्कणीचे पैसे घेतात व बिल्डर एक ही बाल्कणी बंदिस्त करत नाही. नंतर तो करील असे समजून १०० टक्के एनए, एनओसी ला भरतात की, नाही?

**मा. महापौर :-**

पाटील साहेब, ह्यापुढे प्लिंथ सर्टीफिकेट द्यायच्या अगोदर त्यांनी मोकळ्या जागेची कर आकारणी करून भरले आहे कींवा नाही? आणि पैसे भरायचे आहे की, आकारणी करायची आहे ह्या दोन गोष्टी आहे. प्लिंथच्या अगोदर जशी आपली एखादी मागणी पूर्ण वार्षिक असते आपली डिमांड असते की, ह्या वर्षात त्यांनी भरावे. त्याची लास्ट डेट असेल ऑक्टोंबर आणि तो जुन महिन्यामध्ये आला तर तुम्ही त्याला बोलणार भरू नका तर मग कसे चालेल?

**प्रफुल्ल पाटील :-**

एरियर्स दाखवणार.

**मा. महापौर :-**

कर आकारणी झाली पाहिजे की पेमेन्ट आला पाहिजे ह्या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

कर आकारणी झाली म्हणजे पेमेन्ट आला पाहिजे.

**मा. महापौर :-**

माझे तेच म्हणे आहे की, आपण जेव्हा एप्रिल महिन्यामध्ये कर आकारणी करतो आणि तो मे महिन्यामध्ये आला आणि आपली मुदत डिसेंबर महिन्यापर्यंत आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

एकतर तुम्ही असा पायंडा पाडा, आयुक्त साहेब म्हणून तुम्हांला सांगतोय, आपण कमीत कमी जी बिल पाठवतो ती ऑक्टोंबर, नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी पर्यंत ऑलरेडी सहा महिने गेलेले असतात आणि ज्याला बिल येतो तर तो काय म्हणतो, मी का ॲडव्हॉन्स भरू अजून वर्ष संपले नाही. तेव्हा वर्षातून कमीत कमी दोन बिल पाठवा. सहा-सहा महिन्यातून टॅक्सेशनचे. खरे म्हणजे बाकीकडे असे आहे.

**मा. महापौर :-**

आता मी तुम्हांला तेच विचारले, एखादे बिल पाठवले.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग तुम्ही सहा-सहा महिन्याचे बिलींग करा. आपल्याकडे आता एवढे सेंटर आहे. एवढे कम्प्युटर ऑपरेटर आहे. सगळी मशिनरी आहे. सगळा डाटा फिट केलेला आहे. दया सहा महिन्याचे तुम्ही. १ एप्रिल जेव्हा वर्ष सुरू होते तेव्हा एकदम मे महिन्यामध्ये पहिल्या सहा महिन्यामध्ये बिल गेले पाहिजे.

**खतगांवर सो., :-**

वार्षिक जाईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

वार्षिक जाईल तर अजून चांगले आहे. वार्षिक गेले तर तुम्ही एकदम वर्षाचे मागू नका. सहा महिन्याचे तरी ॲट लिस्ट मागा.

**मा. महापौर :-**

परत तेच झाले ना. दोनदा बिल दयायला लागेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

कुठलेही कोर्ट मॅटर झाले तर त्याने सहा महिन्याचे बिल भरायचे आणि कोर्टात जायचे. बऱ्याच ठिकाणी असा कायदेशीर मुद्दा येतो. वर्षभराचे बिल भरण्याची गरज नाही. सहा महिन्याचे भरा आणि सहा महिने लॅप्स झाले असतील तर पूर्ण वर्षाचे भरावेच लागतात. पण आपली बिलजी आहेत ती आठव्या नव्या महिन्यात जातात. वसुलीत फरक का नाही पडत ते बघा.

**मा. महापौर :-**

माझी पण तेवढीच शंका आहे की, एप्रिलमध्ये आपण सी.सी. घेतली व ते बिल मे महिन्यामध्ये प्लिंथला आला व आपली मुदत बिल भरण्याची डिसेंबर, ऑक्टोंबर, नोव्हेंबर जे काय असतील आणि तुम्ही सांगतात की, प्लिंथ पाहिजे तर आजच भर तर परत कसे चालणार?

**प्रफुल्ल पाटील :-**

करावेच लागेल.

**मा. महापौर :-**

त्याला आपणच मुदत दिली की, अपटू त्या तारखेपर्यंत भरावे.

**प्रफुल्ल पाटील :-**

बिल मिळाले तर त्याने पैसे भरायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

प्लिंथ हा इश्यू नाही. प्लिंथ घेतले नाही तरी त्याने पैसे भरायचे आहे. म्हणजे सी,सी. झाली की, त्याला कर आकारणी करून बिल पाठवायची आणि त्याच्यामध्ये मुदत असणार आहे क, ऑक्टोंबर, नोव्हेंबर, डिसेंबर किंवा मार्च जे काय असतील.

**अजित पाटील :-**

बिल मिळाल्यापासून १५ दिवस आपली मुदत असते.

**मा. महापौर :-**

म्हणजे तुम्ही एप्रिलमध्ये सांगणार की, पुर्ण १५ दिवसाचे बिल भरा.

**अजित पाटील :-**

कायदयातच तसे आहे.

**मा. महापौर :-**

घरपट्टीला डिसेंबर महिन्यापर्यंत.

**प्रफुल्ल पाटील :-**

घरपट्टीचे बिल दिल्यानंतर १५ दिवसानंतर त्याने पैसे भरायचे आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

३१ मार्चपर्यंत.

**प्रफुल्ल पाटील :-**

३१ मार्च पण नाही. ते पुढे जातात. आम्ही अख्ख वर्ष उपभोगले आता पुढे बिल भरू.

**मा. महापौर :-**

असे झाले आहे की आपण त्यांना येथे कायदा पण टाकला आहे व कायदा काढून पण घेतला. म्हणजे त्यांना आपण सांगितले की, हे सी.सी. झाले. तुम्ही इमिजिएट कर आकारणीला माहिती दयायची की, तुम्ही कर आकारणी करा. समजा, त्याने केले नाही तर बिल्डर त्याचवेळी सांगणार की, तुम्ही जावून तिथे पहिले करून या, नंतर या.

**प्रफुल्ल पाटील :-**

प्लिंथ सर्टीफिकेट दया किंवा देवू नका पण तुम्ही टॅक्स भरा.

**मा. महापौर :-**

माझे असे म्हणणे आहे की, आपण आता सांगितले की, एखादा प्लान पास झाला की, टाऊन प्लानिंग डिपार्टमेंटची सी.सी. झाली. नंतर त्या संबंधित टॅक्स डिपार्टमेंटला पत्र द्यायला पाहिजे की, अमुक अमुक नंबरची ही सी.सी. त्याला कर आकारणी करा.

**प्रफुल्ल पाटील :-**

बरोबर आहे.

**मा. महापौर :-**

माझे असे म्हणणे आहे की, हे त्याने दिलेच नाही. ह्यांना माहिती ज्यावेळी तो बिल्डर प्लिंथला जाईल. त्यावेळी त्याला हे लोक कामाला लावेल की, तुम्ही जा टॅक्स डिपार्टमेंटला व तुम्हीच सर्व करून या. त्यांनी माहितीच दिलेली नसेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

प्लिंथला त्यांच्याकडे जाते ह्यांच्याकडे मग कुठे येते ?

**मा. महापौर :-**

त्यावेळी बिल्डरला सांगतील. तुम्ही जा टॅक्सकडे आणि तुम्ही तुमचे लावून घ्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

जे लोक सी.सी. ला द्या असे सांगत नाही ते प्लिंथला द्या एवढा कुठे सोज्जवल पणा टाऊन प्लानिंग डिपार्टमेंटकडे आहे. ज्या शासकिय कर्मचाऱ्यांना किंवा अधिकाऱ्यांना प्रामाणिकपणे जर कर वसुल करायचा आहे. जेव्हा तुम्ही आयओडी ला एनए, एनओसी ला जेव्हा तुम्ही बंदिस्त बाल्कणीचे पैसे घेता तेव्हा तुम्हांला सांगता येत नाही की, तुम्हांला आता कमिटमेंट दिले म्हणजे तुम्हांला टॅक्स लागू झाला. तेव्हा त्यांना ह्याच्यासोबत नोटील दया की, आता कमेन्समेंट तुम्हांला दिले. आता तुम्हांला या नियमाप्रमाणे टॅक्स लागू होईल. ते भरण्याची आपण तयारी ठेवा. अशी त्यांना नोटीस दया.

**मा. महापौर :-**

त्यांची भरायला मनाई नसणार. माझआ प्रश्न असा होता की, एखाद्याला सी.सी. दिल्यानंतर टाऊन प्लानिंग डिपार्टमेंटने टॅक्स डिपार्टमेंटला सांगून ती कर आकारणी करायची आहे. इड इज अवर इंटरनल सिस्टीम.

**प्रफुल्ल पाटील :-**

एक सिस्टीम आयुक्त साहेब, आपण जरूर आणा. ज्यादिवशी सी.सी. देतील त्या सी.सी.ची कॉपी त्यांनी टॅक्स डिपार्टमेंटला, मग तो टॅक्स लायबल असो किंवा नसो त्याची कॉपी त्यांनी इमिजिएट दयावी. एक प्लानची कॉपी आणि सी.सी. कॉपा इमिजिएट दयावी.

**मा. महापौर :-**

प्लान दिले नाही व एरिया दिला तरी खुप आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्यांना नंतर वेरीफाय करता येईल ह्यांनी काय गडबड केली तर ह्यांचे रिवाईस प्लान खूप होतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

आतापर्यंत आपण मला चारही प्रभागांची फिगर दिली. ती टोटल फिगर किती आहे?

**अजित पाटील :-**

६७. १५ लाख रू.

**प्रेमनाथ पाटील :-**

दिवाबत्ती, शिक्षण कर, वृक्षकर, कॅप्टीटेशन फी आणि विशेष शिक्षण कर हे टोटल आपण ह्याच्यावर किती परसेन्ट घेतो?

**अजित पाटील :-**

मालमत्ता कर २८ टक्के आहे. विशेष शिक्षण कर १ टक्के, वृक्षकर १ टक्के

**प्रेमनाथ पाटील :-**

टोटल १ टक्के आहेना. म्हणजे टोटल ५ का ६ होतात.

**अजित पाटील :-**

होय.

**प्रेमनाथ पाटील :-**

पाटील साहेब, आपण सांगितले की, ६७ मधून ६ टक्के वजा केले तर आपल्याला.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटीलजी आपल्याला ५२ पाहिजे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, ह्याच्यामध्ये जास्त होत आहे.

**मा. महापौर :-**

किती होत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

६३ करोड रू. होतात.

**मा. महापौर :-**

कसे ते सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

सांगतोय, साहेबांनी मला चारही प्रभागाची माहिती दिली ६७ करोड ५० लाख रू. त्याचे टोटल ६ टक्के वजा केले. शिक्षण कर, दिवाबत्ती कर.

**अजित पाटील :-**

शासनाचा शिक्षण कर रोजगार अंतर्गत मोठ्या प्रमाणात असतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

६७ करोडमध्ये ह्या सर्व बाबी आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्याच्यातून आपण हे वजा केले.

**अजित पाटील :-**

नाही.

**मा. महापौर :-**

६७ मधून वजा करण्याचे बाकी आहे. ६७ ग्रॉस फिगर आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

४ करोड २ लाख रू. वजा केले.

**अजित पाटील :-**

६७ कोटीमध्ये मालमत्ता कर, शासनाचा शिक्षण कर, रोजगार हमी कर, नगरपालिकेचा शिक्षण कर, अग्निशमन कर आणि विशेष शिक्षण कर हा इनक्ल्युडींग ह्यांच्यामध्ये दुसरे, दंडांची रक्कम, व्याजाची रक्कम असे मिळून ६७ कोटी रू. आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

सर्वांवर किती परसेन्ट कर लागतोय हे मी तुम्हांला विचारतोय. दिवाबत्ती किती टक्के, शिक्षण कर किती टक्के वृक्षकर किती?

**अजित पाटील :-**

शिक्षण कर स्लॅब वाईस असो. १२ टक्के, ९ टक्के, ७ टक्के, ३ टक्के वेगवेगळी कॅटेगिरी असते.

**मा. महापौर :-**

५२ ना.

**दिनेश नलावडे :-**

साहेब, आपण जकातीच्या बाबतीत मालमत्ता करासाठी बोलतोय. आमच्या प्रभागामध्ये जे टॅक्सचे अधिकारी आहेत. तिथे अशा सोसायटी आहेत का? ज्यांचे बिल्डींग तयार आहे. लोक राहतात. पण त्यांना अजून मालमत्ता कर लागलेला नाही. आमच्याकडे काही बिल्डींग आहेत त्यांना पाणी कनेक्शन लागलेले अआहेत. पाणी दिले जात आहे. पाच पाच वर्षे झाली बिल्डींग तयार झालेली आहे. पैसे न दिल्यामुळे. पैसे न मिळाल्यामुळे काही अधिकारी टॅक्स लावत नाही. साहेब, तुम्हांला मी बिल्डींगच्या नावासहीत देवू शकतो.

**मा. महापौर :-**

दया, टॅक्स लावून घेतो.

**दिनेश नलावडे :-**

दत्ताकुंज गल्लीमध्ये ईश्वरकृपा म्हणून सोसायटी आहे.

**मा. महापौर :-**

बजेटमध्ये काही सुचना आहे का?

**दिनेश नलावडे :-**

सुचना म्हणजे मालमत्ता कर आपण वसुल करतोय.

**मा. महापौर :-**

अजित पाटील साहेब, त्या बिल्डींगला टॅक्स लावून घ्या.

**दिनेश नलावडे :-**

साहेब, इथे बोलून चालत नाही. पाच वर्षाचा टॅक्स वसुल कोण करणार आहे? बिल्डींगची लोक पाच वर्षापासून आपल्याकडे येत आहे. पैसे आम्हाला दया, नाहीतर आम्ही टॅक्स लावत नाही. पाण्याचे कनेक्शन गेलेले आहे. आपण पाण्याचे कनेक्शन केव्हा देतो, जेव्हा ८० टक्के टॅक्स भरलेला असतो तेव्हा देतो. तर त्यांना कनेक्शन कसे काय गेलेले आहेत? असे ह्या मिरा भाईंदर शहरामध्ये किती सोसायटया आहेत की, ज्यांना टॅक्स लागलेला नाही. फक्त पैसे न भरल्यामुळे आपण त्यांना टॅक्स लावत नाही.

**अजित पाटील :-**

आपण नावं दया.

**दिनेश नलावडे :-**

साहेब, आम्ही नावं देण्यापेक्षा आपल्याकडे प्रभाग अधिकारी आहेत. वॉर्डचे अधिकारी आहे.

**मा. महापौर :-**

ते काढतील. मालमत्ता करात वाढ होत असेल तर ..

**दिनेश नलावडे :-**

ते काढतील तर मग आज का नाही काढले? कशाला थांबत आहे? साहेब, तुम्ही प्रभाग समिती अध्यक्ष असताना आपल्याकडे कमीत कमी दिडशे बिल्डींगला नवीन टॅक्स लागला गेला. त्या बिल्डींग पाच वर्षे अगोदर पासून तयार झालेल्या होत्या. लाखो-करोड रू. आपले त्याच्यामध्ये नुकसान झालेले आहे. हे फक्त अधिकाऱ्यांच्या गैर कारभारामुळे. साहेब, आपण जर इथे अधिकारी आहात. आम्हांला तुमच्यावर भरोसा आहे. परंतु, हा प्रकार कुठे तरी थांबवा आमि मिरा भाईंदर शहराचा बजेटच्या बाबतीमध्ये विचार करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्याच्यामध्ये जी रक्कम आहे. तर व्याजाची रक्कम किती आहे?

**मा. महापौर :-**

टॅक्सची इंटरेस्ट रक्कम दाखवा.

**अजित पाटील :-**

६ कोटी १० लाख रू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, अभी जैसे सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहबने बोला, यह फिगर ४८.५० यह टॅक्स के साथ मे है। अगर मोकळे जागेका टॅक्स नंतर इललिगल बांधकामाचा टॅक्स आणि व्याज धरले अजून फिगर वाढते का, नाही?तो व्याज म्हणजे तुमची ॲक्च्युअली टॅक्स किती?

**अजित पाटील :-**

थकबाकी दाखवली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

व्याज कमी केला तर ९ प्वॉईंट करोड रू. होतात.

**मा. महापौर :-**

तुम्ही कॅरी फॉरवर्ड केले ९ करोड रू. आणि व्याज कसा काय ६ करोड रू. येईल? माझे असे म्हणणे आहे की, मुळ ह्यावर्षी ९ करोड रू. जाणार. मग ९ करोड रू. वर ६ करोड रू. व्याज कसे काय होईल?

**अजित पाटील :-**

आलेले आहे.

**मा. महापौर :-**

तुम्ही आता जे मला बोलत आहात ते विथ इंटरेस्ट आणि आता ग्रॉस बोलत आहात ना!

**अजित पाटील :-**

तुम्हांला मी नेट दाखविली आहे.

**मा. महापौर :-**

आपण आता मला सांगा की, व्याज किती बाकी आहे आणि मुळ किती बाकी आहे?

**अजित पाटील :-**

६ कोटी रू. बाकी आहे व ९ कोटी ओरिजनल.

**मा. महापौर :-**

६ कोटी रू. बाकी आहे व ९ करोड रू. ओरिजनल बाकी आहे. म्हणजे १५ कोटी रू. बाकी आहे. मग आता इथे तुम्ही ९ धरले.

**अजित पाटील :-**

जमेचा व्याजाचा हेड वेगळा आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा्रो. :-**

या अर्थसंकल्पामध्ये सर्व हेड स्थायी समितीने एक्झामिन केलेले आहे आणि हेडच्या माध्यमातून मालमत्ता कर विभागाकडून या येणाऱ्या आर्थिक वर्षासाठी ७० कोटी रू. ची अपेक्षा केलेली आहे. ते वेगवेगळ्या हेडमध्ये आहे. काही व्याजाच्या रक्कमा आहेत. साधारण जमा आहेत. काही महसुली जमा आहेत. काही शास्ती आहेत. त्याचे वर्गीकरण वेगवेगळ्या अ,ब,क,ड मध्ये आहे. पण आपली डिमांड ७० कोटीच्या जवळपास मालमत्ता कराची आहे. यामध्ये आपण एक-एक मुद्दे वाईस अपेक्षित केले तर आपले काही सुझाव विचारत घेता वाढ अपेक्षित असेल तर आपण एख एक फिगर फायनल करून पुढे जायला पाहिजे. नाहीतर, आम्ही स्थायी समितीने केलेले बरोबर आहे अशी खात्री करायला पाहिजे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही केले आहे हे आपण असे बरोबर धरू. तुम्ही सांगितले ७० कोटी रू. म्हणजे सगळे हेड इनक्ल्युड करून गेले की, नाही? त्या ७० कोटीमध्ये मागील वर्षाचे काय आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा्रो.:-**

आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तोच तर प्रश्न आहे. मागील वर्षाचे ७० कोटीमध्ये किती आले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा्रो. :-**

१५ टक्के च्या आसपास मागील वर्षाचे येते. ८५ टक्के आपली दरवर्षी वसुली होते. १५ टक्के मागील वर्षाची ह्याच्यामध्ये आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपली ८५ टक्के वसुली झालीच नाही ना?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा्रो. :-**

होते.

**मधुसुदन पुरोहित :-**

मा. महापौरजी, या सर्व विषयावर चर्चा चालू आहे. त्याच्यावर माझे एक म्हणणे आहे. माझी एक सुचना आहे की, जेव्हा आपण इम्पलीमेन्टेशन करतो. जेव्हा आपण कर या विषयावर चर्चा करतो तर मागील पाच महिने झाले आहे. तुम्ही प्रभाग समिती कार्यालयात जा किंवा कुठल्याही कर विभागात जा. कुठलाही मनुष्य आपल्याला भेटत नाही. सन्मा. नगरसेवकाने सांगितले की, आपण कर आकारणी केली नाही. पण मागील चार महिने झाले. आपला जो सिस्टीम आहे तो कॉलीप्स झालेला आहे. पहिला त्या सिस्टीमचे इम्पलीमेन्टेशन झाले पाहिजे. आज अशी परिस्थीती आहे जेव्हा आपण सेस लागू केले तेव्हा जेव्हा आपण सेस लागू केले तेव्हा जे कर्मचारी होते ते सेसला गेले. त्यानंतर जेव्हा आपला ऑक्ट्राय आाला तेव्हा कर विभागाचे कर्मचारी आहेत ते ऑक्ट्रायला गेले. म्हणजे ॲक्च्युअल प्रॉब्लेम कुठे आहे ते बघणे गरजेचे आहे. आपण का कमी घेतोय. आपण का कर आकारणी करत नाही. आपल्याला पैसे का येत नाही? कुठल्याही अधिकाऱ्यात आपण टिका टिपणी करण्यापेक्षा आपल्या सिस्टीमवर इम्प्लीमेन्टेशन करणे गरजेचे आहे. आज परिस्थिती अशी आहे की, मागील चार महिने झाले महापालिकेत एक ही अधिकारी भेटत नाही. एक ही कर्मचारी भेटत नाही. तुम्ही लहान सहान काम घेऊन जा. मॅरेज सर्टीफिकेट घेऊन जा. डी.टी.पी. ऑपरेटर नाही. त्यांच्याकडे स्टेशनरी नाही. लोकांनकडे काम करण्यासाठी जो इनफ्रास्ट्रक्चर पाहिजे तो नाही. आपल्याकडे इनफ्रास्ट्रक्चर आपण डेव्हलप करत नाही. इम्प्लीमेन्टेशन आपल्याकडे काही नाही आणि त्यानंतर महासभेत म्हणजे आपण स्वतः जा आणि या शहराचा वेळ घेण्यासाठी इथे वेळ देतोय का? मागील चार महिने झाले, तुम्ही एव्हरेज काढा. २४/८/०९ ते आज १२ महिना आहे. म्हणजे ६ महिने झाले. ६ महिन्याचे सेस, ऑक्ट्राय आणि त्याच्यानंतर परत ऑक्ट्राय आणि इलेक्शन ड्युटी या सर्व कामामध्ये जी गुंतवणारी लोक आहेत म्हणजे ज्या लोकांनी हे काम केलेले आहे. ते सर्व करची अजून कुठल्यातरी डिपार्टमेंटची लोक आहेच. ह्या लोकांना तिथे पाठवण्यापेक्षा जर ह्याच लोकांनी ती कामं केली असती तर नक्कीच आपली जी वसुली बाकी आहे ती पुर्ण झाली असती. या विषयावर एवढी चर्चा करण्यासारखी गोष्टच नाही.

**मा. महापौर :-**

विषय आपला चालू आहे व जो इनकम आहे तो आपण प्रपोझ केलेला आहे ते बरोबर आहे का, कमी आहे, जास्त आहे त्यावर....

**मधुसूदन पुरोहित :-**

कॅरीफॉरवर्ड होत जाणार का, नाही?

**मा. महापौर :-**

कॅरीफॉरवर्डचा विषय नाही थकबाकी.....

**मधुसुदन पुरोहित :-**

थकबाकी वाढत चालली तर तो विषय पुढे ढकलतच जाणार ना.

**मा. महापौर :-**

थकबाकीचे बोलत नाही. आता हे जे थकबाकी इनक्ल्युडींग नवीन आपण प्रपोझ केले आहे ते कमी आहे जास्त आहे त्याच्यावर आपण बोला.

**मधुसुदन पुरोहित :-**

पण इनफ्रास्ट्रक्चरचे सेटअप झाले पाहिजे का नाही? कर आकारणी करणे, अर्थसंकल्प बनवणे, पेपर काळे करणे हे काम कोणीही करू शकतो. पण त्याचे इम्प्लीमेन्टेशन झाले पाहिजे की, नाही? माणूस तिथपर्यंत पोहचला पाहिजे की, नाही?

**मा. महापौर :-**

इम्प्लीमेन्टेशन झाले पाहिजे. पण आपण आज जी चर्चा करतोय ती फक्त बजेटवर करतोय.

**मधुसुदन पुरोहित :-**

ही जी चर्चा करतोय त्यामध्ये हा विषय घेणे गरजेचे आहे.

**मा. महापौर :-**

प्रत्येक हेडला आपण चर्चा करत गेलो. प्रत्येक डिपार्टमेंट वाईस तर बजेच कधी होणार? आपण बोलतो की, इम्प्लीमेन्टेशन व्हायला पाहिजे. पण आज ती वेळ नाही.

**मधुसुदन पुरोहित :-**

साहेब, माझे एकच म्हणणे आहे की, ज्या माणसाचे जिथे युटीलायझेशन आहे तिथेच युटीलायझेशन करा. त्याचे मिसयुटीलायझएशन केले तर बाकीच राहणार. आपण ऑलरेडी मागे आहोत व पुढे पण मागेच राहत जाणार आहोत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही पेज नं. ६ वर किती दाखवले?

**मा. महापौर :-**

पेज नं. १ की बात करो।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

उसमे अलग हेड दिखाया है।

**मा. महापौर :-**

वह जब हेड आऐगा तब बोलो।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अब उन्होंने ६ करोड रू. बताया।

**मा. महापौर :-**

टॅक्स के विषय मे कुछ है क्या?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

इसमे मे यह पुछता हु की, कितना करोड टॅक्स है? व्याज मे कितना रक्कम है?

**मा. महापौर :-**

इसमे व्याज किधर रखा है, आगे रखा है। तो वह कितना रखा है? ६ करोड रू. बता रहे है और उधर २ करोड रू. बता रहे है।

**मा. महापौर :-**

तो व्याज के टाईम पर बोलो, अभी मत बोलो।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मैं अमाऊंट बता रहा हू।

**मा. महापौर :-**

वह टॉपीक आऐगा तभी बोलो।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मालमत्ता का आपने मोकळी जागा. इललिगल बिल्डींग और ओरिजनल टॅक्स प्लस व्याज फिर वह एक रक्कम आने दो तो मालूम पडेगा की, कितना रक्कम आया है। आप दो करोड रू. वह पेज पर दिखा रहे हो और अधिकारी छह करोड रू. बोल रहे है।

**मा. महापौर :-**

आपके हिसाब से क्या होना चाहिए? आप बताईए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मैं मेरे हिसाब से नही बोल रहा हू। यह क्या बोले ६ करोड रू बाकी है व्याज का, वह रिझल्ट आज कल मे दिखाया मनपा आलमत्ता करावर व्याज २ कोटी रू.

**मा. महापौर :-**

और यह बोल रहे है ६।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

६ बता रहे है।

**अजित पाटील :-**

आपल्याकडे ६ कोटीची डिमांड आपली येणं आहे. आणि बजेटला २ कोटी तरतुद पकडलेली आहे.

**मा. महापौर :-**

असे कसे? आपण ओरिजनल डिमांड बोलता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

व्याजचे तुम्ही दिले आहे. एवढा डिफरन्स?

**मा. महापौर :-**

आपण सांगा ही येणारी डिमांड आहे का, मग ५० कोटी रू. का आले नाही. मागच्या वर्षीचे इट इज दि प्रपोझ.

**अजित पाटील :-**

मालमत्ता निर्लेखित केल्या आहेत त्याची पण मोठ्या प्रमाणात अमाऊंट आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

५० हजार, २० हजारचा फरक ठिक आहे. पण हे २ कोटी बोलता ६ कोटी कुठे? ४ कोटीच्या डिफरन्सने केलेले आहे. हा साधा डिफरन्स आहे काय?

**अजित पाटील :-**

मालमत्ता ज्या जप्त केलेल्या आहेत आणि निर्लेखित मालमत्ता त्याची ६ कोटीची अमाऊंट आहे ते फॉरवर्ड होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

निर्लेखित सोडून दया.

**अजित पाटील :-**

त्याच्यामध्ये ती सगळी अमाऊंट आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

पाटील साहेब, मालमत्ता कराचे जे हेड आहे ते तुम्ही सगळे एका लाईनमध्ये घ्या.

**मा. महापौर :-**

जिथपर्यंत आम्ही व्युह करत नाही. तिथपर्यंत ६ कोटी रू. आहे.

**अजित पाटील :-**

ते पैसे येणारच नाही.

**मा. महापौर :-**

यु क्यान डिसाईड? तुम्ही कसे नक्की करणार ?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

६ कोटीमध्ये निर्लेखित किती, व्याज ते सांगा. तेही माहित पडेल. तुम्ही २ कोटी रू. इथे दाखवता मग ६ कोटी रू. आले कुठून?

**कांचन पुजारी :-**

सन २००९-१० जर तुम्ही प्रॉफीट ॲण्ड लॉस अकाऊंट प्रॉपर्ली केले तर क्रेडिट बॅलेन्स मालूम पडेगा. लेकिन इसमे तो कुछ भी मालुम नही पड रहा है। और यह बोलते है की, है और हम बोलते है की, नही है। तो फिर इसमे कैसा मालूम पडेगा? प्रॉपर चॅनलपर आप चलो ताकि हमको भी मालूम पडे की क्या बॅलेन्स है और क्या मिलना है, क्या नही मिलना है।

**मा. महापौर :-**

जैसे प्रॉफीट ॲण्ड लॉस जनरल अकाऊंट ने अपने यहा होता है वैसा कॉर्पोरेशन मे करते नही है, पहले से अलग प्रथा चल रही है।

**कांचन पुजारी :-**

लेकिन कुछ तो मालूम तो होना चाहिए।

(सभागृहात गोंधळ )

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, डबल एन्ट्री बुकींग आऐगा तभी वह सिस्टम आ जाएगा। अभी आप जो बोल रहे हो, आज सभागृह मे तो ४०% लोग गए। अगर आप ऐसे ही मिस गाईड करेंगे, ६ कोटी रू, २ कोटी रू. दिखाऐंगे। किसको फुरसत है यहापर बैठनेकी? स्थायी समितीने दिया है वह मंजुर करो।

**कांचन पुजारी :-**

प्रॉपर चॅनलपर आप प्लीज चलिए तो सबको मालूम पडेगा की, क्या है और क्या नही है। यह सिर्फ आप कोही समझ मे आता है, हमको कुछ भी समझ मे नही आता है की, क्या बॅलेन्स है या नही है।

**अनिल सावंत :-**

आम्ही केले आहे ते बरोबर आहे. पुढे चला.

**मा. महापौर :-**

पाटील साहेब, रिकव्हरी किती आहे ते बोला?

**जुबेर इनामदार :-**

चुकीचे आहे. अजून ते वसुल झालेले, नाही. कधी कसे वसुल व्हायचे आहे ते सांगा.

**चंद्रकांत मोदी :-**

पाटील साहब, कल से कामपर लग जाओ। अभी आगे विषय लो।

**अनिल सावंत :-**

वसुली सांगा आजपर्यंत किती वसुली झाली आहे. मा. महापौर साहेब, म्हणजे ते डिपार्टमेंट काम करत आहे की, नाही ते कळेल.

**मा. महापौरः-**

तो डिपार्टमेंट तुमच्याकडे पाठवतो माहिती दयायला श्री. अजित पाटील त्यांना माहिती दया.

**प्रफूल्ल पाटील :-**

सीएफसी सेन्टरचे काय झाले? का अजून कोणी येत नाही?

**मा. महापौर :-**

तो येत आहे तोपर्यंत पुढे कन्टीन्यु करू.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, ह्याची अमाऊंट किती?

**मा. महापौर :-**

५२ करोड रू.

**जुबेर इनामदार :-**

५२ करोड रू. येणार कुठून ते सांगा?

**मा. महापौर :-**

५२ कोटी रू. सभागृहाने सुचविले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आयुक्त साहेब, जकात निवेदनामध्ये आयुक्त साहेब आपण निवेदन करा. ९२ कोटी रु. वर आपण कसे आलो?

**अनिल सावंत :-**

आम्हाला हे ४८ चे ५२ कसे गेले तेच कळत नाही. ४ चे १० कशासाठी गेले ते पण कळत नाही.

**मा. महापौर :-**

४ चे १० ह्याच्यासाठी गेले की फक्त ३०० मधून ८४ प्रकरणाला कर लागलेला आहे आणि येणाऱ्या वर्षात अजून काही पैसे आले नाही. पुढच्या वर्षापर्यंत ते डबल होणार आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

गेल्या आर्थिक वर्षामध्ये जकातीपासून ९२ करोड रु. उत्पन्न होणे अपेक्षित आहे असे अर्थसंकल्पामध्ये महासभेने तरतुद केली होती. त्यामध्ये साधारणतः आजच्या आयटमवर दरवाढ सुचविली होती आणि त्यामध्ये १२ कोटी रु. दरवाढच्या माध्यमातून अपेक्षित होते. परंतु, राज्यशासनाने या आर्थिक वर्षामध्ये जकातीच्या ऐवजी उपकर लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतल्यामुळे आपण ठेका काढू शकलो नाही. या आर्थिक वर्षात आणि जे ९२ करोड रु. चे उत्पन्न अपेक्षीत होते ते आपल्याला साध्य होउ शकलेले नाही. तथापी, उपकर लावण्याच्या पूर्वी याच महासभेत मागील आर्थिक वर्षामध्ये जो ठेकेदार होता त्याला काही कालावधीसाठी दोन वेळेस ठेका देण्यात आला. मुदतवाढ देण्यात आली तर त्यामध्ये अपेक्षीत वाढ न देता गेल्या आर्थिक वर्षातील दराप्रमाणे वसुलीवर १० टक्के वाढ करुन त्याला ठेका देण्यात यावा असे धोरण मान्य केले होते. त्याप्रमाणे संबंधितांना आपण कार्यादेश देवून ते कामकाज केलेले आहे. त्यामुळे गेल्या आर्थिक वर्षातील ९२ कोटीमध्ये १२ कोटी तर ते अपेक्षित साध्य झालेले नाही. त्याही पेक्षा मागे ४ महिन्यामध्ये उपकराची अंमलबजावणी केली होती, महासभेच्या मान्यतेने आणि राज्य शासनाच्या मान्यतेने त्या ठिकाणीसुध्दा गेल्या त्या संदर्भ कालावधीमध्ये प्रती माह साडे तीन कोटी रु. चे डेप्रीशिएट आलेले आहे. हा डेप्रिशिएट असाच कन्टीन्यु राहिल या भितीपोटी पुनःश्च महासभेने जकात लागू करण्याचे धोरण घेतलेले आहे. राज्य शासनाने त्याल मान्यता दिलेली आहे आणि आता आपण जकातीची वसुली करत आहोत म्हणून निव्वळ

एक उत्पन्न विचारात घेता व १० टक्के वाढ अपेक्षित करता मा. आयुक्तांनी ८५ कोटी ३२ लाख रु. ची पुढील वर्षासाठी......

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण सन २००७-०८ पासून विश्लेषण द्या. २००७-०८ ला आपले ऑक्ट्रॉय होते. ७० ऑक्ट्रॉय होती तर आपण त्याच्यावर १० टक्के वाढीव धरुन २००८-०९ ची फिगर यायला पाहिजे याच्यावर आणखिन १० टक्के वाढीव धरुन २००९-१० ची यायला पाहिजे. त्याच्या व्यतिरिक्त आपण १४ आयटमवर ऑक्ट्रॉय वाढवलेला आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते लागू केलेले नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

लागू करावेच लागेल.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पण ते पूर्ण वर्ष रद्दच गेले. आता सुध्दा जकात लागू करताना ती वाढ लागू करु नये असे त्या ठरावामध्ये आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

ती जकात किती तारखेपर्यंत अंमलात आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

परवा आपण जे जकात लागू करावे म्हणून धोरण घेतले आहे ना.

**प्रफुल्ल पाटील :-**

जुनपर्यंत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नव्याने जकात उपकराच्या ठिकाणी.

**प्रफुल्ल पाटील :-**

जानेवारीपर्यंत आहे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याच्यामध्ये सुध्दा जकात वसुली आणि नाके हे मागील आर्थिक वर्षाप्रमाणेच राहतील असे आहे आणि त्याप्रमाणे प्रशासनाने नोटीफिकेशनसुध्दा काढलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मी ते नाही म्हणतं. आता तुम्ही असे म्हणता की, ही जी वाढ लागू करु नये असे म्हणालात. त्याच्यानंतर आता तुम्ही सुध्दा ठेकेदाराला जो ठेका दिला जसे न्यायप्रविष्ठ बाब आहे त्या ठेकेदाराला किती तारखेपर्यंत आपण ठेका द्यायचे ठरवले?

**मा. महापौर :-**

एक वर्ष. १४ जानेवारी.

**प्रफुल्ल पाटील :-**

पूर्ण? १४ जानेवारी ते पुढचे १४ जानेवारी?

**मा. महापौर :-**

होय.

**प्रफुल्ल पाटील :-**

नंतर तीन महिने.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नंतर तीनच महिने राहतात. त्यात स्थायी समितीने परत ९२ केलेले आहे.

**चंद्रकांत वैती :-**

मागच्या तीन आर्थिक वर्षामध्ये साधारणपणे संकेत असे असतात की, आपण अपेक्षित असे धरती की, १० टक्के वाढ ही दरवर्षी व्हायला पाहिजे. गेल्या वर्षी आपण १२ आयटम वर १४ आयटमवर काही जकातीचे दर वाढवले होते आणि ते दर वाढवून आपल्याला अपेक्षित होते की ९२ करोड रु. येतील. ९२ करोड रु. अपेक्षित असताना व नंतर टेंडर काढताना आपण ते कमीचे काढले, मधल्या काळात तीन महिन्यांसाठी उपकर लागला आणि ह्या चालू आर्थिक वर्षामध्ये ९२ करोड रु. आपल्याला अपेक्षित असताना आयुक्तांनी मात्र त्यावेळेला ९०.१४ करोड रु. असा एक अंदाज दिला होता आणि त्यावेळेला आपली वसुली प्रत्यक्षात ७० करोड १४ लाख ६५ हजार रु. म्हणजे साधारणपणे २१ करोड ८५ लाख ३५ हजार रु. आपण डेप्रिशिएट आहोत जकातीमध्ये. आपण १० टक्के वाढ अपेक्षित धरतो तर तुम्ही त्यातले १ वर्ष पूर्ण काढू कसे शकतो. कारण आपण महापालिकेच्या माध्यमातून, जकात वसुलीत असताना तेव्हाही एक विशिष्ट टार्गेट सेट करुन दिलेला आहे. तो टार्गेट अप-डाउन होत असतो. कर्मचाऱ्यांचे त्याच्यात बरेच कष्ट आहेत. बरीच मेहनत आहे. आठ-

आठ, दहा-दहा तास नाक्यावर उभे राहतात. त्याच्यामुळे त्याच्यात काय शंका घ्यायचे कारण नाही. पण आपण १० टक्के वाढ अपेक्षित धरता आली असती. जर गेल्यावेळेला ९२ करोड रु. होते. मधले वर्षे वाया गेले पण मग आता आपण पुढच्या वर्षाचे अंदाज करताना मग आपला अंदाज कसा चुकेल. मग आपण चुक केली आहे तर आपण काय चुक केली आहे? ८५ करोड २३ लाख रु. कसे केले ते कोणालाच माहिती नाही. तुम्ही त्या १२-१४ आयटमचे दर वर खाली करा. मागे, जा, पुढे जा, १० टक्के वाढ करा. कसे झाले हा एक जादुचा फिगर आहे. तो कोणाला प्रुव्ह करता आला नाही. ना तुमच्या आमच्या समोर ऑडीटर साहेबांना ही करता येत नाही न कोर्टासमोर करता येतो. कोर्टासमोर तेवढ्यासाठीच लढाई चालली आहे की ८५ करोड २३ लाख रु. आपण कसे कन्सीडर केले? आणि मग आपल्याला जकातीचा जो देयकार आपला ठेकेदाराकडून तो ८५ करोड ३२ लाख रु. चा मग आपण त्याल इथे मेन्शन करुन कसे चालले म्हणजे हे असे झाले की, केंद्र सरकारकडून राज्य सरकारकडून किंवा बँकांकडून अनुदान घ्यायची बाब आहे किंवा कर्ज घ्यायची बाब आहे. तर ती ५० करोड रु. मागितली तर ५० करोड रु देणार. म्हणजे जेवढा अंदाज तेवढा करणार. आपली लोक काय करतात, ह्या बजेटला अनुसरुन खर्च करतात. खर्चाची तजबीज आपण तशीच ठेवतो. आता मोठा प्रश्न असेल, आपण प्रत्यक्षात आपले उत्पन्नाचे साधन बघितले तर १४९ करोड ५० लाख रु. पण आपण ४५६ करोड रु. खर्च करण्याची तयारी ठेवली आहे का नाही? एवढे मोठे मन आपण केलेले आहे. तर आपला बजेट मिरा भाईंदर महानगरपालिका सशक्त महानगरपालिका आहे त्याचे बजेट ५०० करोडच्या वर गेले पाहिजे. म्हणून ह्याच्यात देखील आपण वाढ अपेक्षित केली पाहिजे. का करत नाही? त्यात ८५ करोड रु. का पकडले? फक्त आपण केलेली चुक सिध्द करण्यासाठी, काय दाखवणार आहोत. आमच्या अर्थसंकल्पातच तेवढी नोंद आहे. तसे करुन चालणार नाही. मग आता जर ८५ करोड रु. विकार आले असेल तर त्याल अनुसरुन आपली १० टक्के वाढ तर अपेक्षित पाहिजे. मग ती आपण का केली नाही? ती करायाल पाहिले म्हणून ह्याच्यात भले डेप्रीशिएट आला परंतु त्यावेळेला तीन महिने आपले उपकराच्या माध्यमातून गेले, कर्मचारी जकात वसुली करतात. ठेकेदाराकडे फिक्स टार्गेट होता. आपल्याला २४ लाख रु. आपल्याला दररोज अपेक्षित होते. मग त्याच्यासाठी २१ करोड रु. डेप्रीशिएट आलेला आहे तर तो रिकव्हर होउ शकतो. रिकव्हर होण्यासारखा आहे. तो रिकव्हर होईल असा गंर्भीत अर्थ ठेवून आपण केलेला असतो. मग आता कमी का केला? ९२ करोड रु. पेक्षा ८५ करोड रु. दाखवतील. पुन्हा ९२ वर आलो आहोत. ह्याचा देकार तर घेतला. मग तो त्याच्यापेक्षा पुढे जायला पाहिजे. तो वाढवून घ्या.

**मा. महापौर :-**

९२ पेक्षा जास्त.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यामध्ये आर्थिक कालावधी आहे.

**मा. महापौर :-**

तीन महिने वाढीव होईल. मग ते २, १ करोड रु. वाढतील. पण एवढे नाही वाढणार. ९२ ऑलरेडी स्थायी समितीने केलेले आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

९२ हे स्थायी समितीने तीन महिने धरुनच वाढवलेले आहे.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, आपण याठिकाणी बजेट हे १ एप्रिल २००९ ते ३१ मार्चपर्यंत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अर्थसंकल्पामध्ये जरी अंदाज असले तरी ते......

**जुबेर इनामदार :-**

आपण एप्रिल ते मार्चपर्यंतचा बजेट करतोय. ही जी रक्कम वाढ केलेली आहे ती परत येणाऱ्या एप्रिलपर्यंतच केलेली आहे. येणाऱ्या मार्च महिन्यापर्यंत केलेली आहे. येणाऱ्या मार्च महिन्यापर्यंत केलेली आहे २०१० च्या. पुढचे तीन महिने पकडून केलेली आहे. ९२ कोटी रु. ची वाढ केलेली आहे. आम्ही जी वाढ सुचवलेली आहे.

**मा. महापौर :-**

ते अप टू ३१ मार्च महिन्यापर्यंत.

**जुबेर इनामदार :-**

ती ही वाढ स्थायी समितीने सुचवलेली होती. मी तर बोलेन, महासभेने ही वाढ अजून वाढवावी. कारण असे आहे की, १०० टक्के ऑक्ट्रॉयपासून आपल्याला अनुदान उत्पन्न वाढणार आहे. या वर्षामध्ये जे.एन.यु.आर.आर.ए.एम. ची कामं होणार आहेत. या वर्षामध्ये निर्मल स्वच्छता अभियानाची कामं चालू आहेत. एम.एम.आर.डी.ए. अंतर्गत फ्लायओव्हरची कामं चालू आहेत. त्याची प्रशासनाने कुठे ही दखल घेतली नाही. फक्त १० टक्के वाढ.

**मा. महापौर :-**

बरीचशी काम चालू आहेत तर मंदीवर आहेत.

**जुबेर इनामदार :-**

मंदीमध्ये असू दे पण येणारा माल हा येणारच आहे. शहरामध्ये रॉ मटेरीयल तर लागणारच आहे. कुठे ही मंदी नाही.

**प्रकाश दुबोले :-**

आपण जे अर्थसंकल्प बजेट तयार केले हे १ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१० त्यामध्ये आपण ऑक्ट्रॉयचे ९२ करोड रु. धरतोय. आपण त्यांना ठेका दिलेला आहे. त्या ठेकेदाराने ८५ करोड ३२ लाख रु. भरले आहे. ते पूर्ण एक वर्षाचे आहे. आता सध्या कोर्टामध्ये केस चालू आहे ती केस कधी संपेल ह्याची गॅरेंटी आज ही आपल्याला नाही. समजा ते ३१ मार्चला संपेल आणि १ एप्रिलपासून त्याला ठेका दिला तर तो पूर्ण वर्षाचे आपल्याकडे ८५ करोड रु. भरणार आहे.

**एस. ए. खान :-**

बजेटमध्ये आपाण तरतुद करतोय.

**प्रकाश दुबोले :-**

८५ करोड ३२ लाख रु. च तो भरणार आहे आणि येथे ९२ करोड रु. धरुन कसे चालेल?

**एस. ए. खान :-**

आपण बजेटमध्ये तरतुद करतोय अशी तरतुद पुढे पण करु. जसे रिवाईस प्लान करतो.

**प्रकाश दुबोले :-**

त्या ठेकेदाराला जर १ मार्चपासून देणार असे गृहित धरले तर ९२ करोड १ लाख रु. बरोबर आहे. परंतु, ठेकेदाराला १ एप्रिलपासून दिले तर ऑक्ट्रॉयची रक्कम कमी होणार.

**मा. महापौर :-**

१ एप्रिल आहे का, १ फेब्रुवारी आहे का, ३१ डिसेंबर आहे का? नंतर त्याच्यावर चर्चा करु.

**एस. ए. खान :-**

प्रकाश दुबोले साहेब कोर्टात केस चालू आहे ती कधी संपेल हे सांगता येत नाही. एक वर्ष पण जाईल. म्हणून त्याच्यासाठी आपण तरतुद करु. महानगरपालिकेचा फायदा होउ द्या. आपले कर्मचारी दररोज धावत धावत नाक्यावर जातात. रात्री ३.०० वा. ड्युटी करुन आला तरी सकाळी ड्युटीवर हजर असतो म्हणून जकात वसुली होते व त्यामध्ये ठेकेदाराचा व महानगरपालिकेचा ही फायदा होता.

**प्रकाश दुबोले :-**

पण त्याने ८५ करोड रु. देणार. मा. महापौर साहेब त्याने ८५ करोड ३२ लाखाचे भरले त्याच्यावर ते नाही जाणार. १ मार्चपासून ठेका दिला तर तो तुमचा डिफरन्स बरोबर आहे. पण १ एप्रिल पासून घेतले तर आपला बजेट पुन्हा फ्लॉप होणार आहे, ७ करोड रुपयांनी.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

गेल्या आर्थिक वर्षामध्ये आपला ठेका ७३ कोटी रु. चा होता. तो पुढच्या वर्षी ८० कोटी रु. ला गेला असता म्हणजे या आर्थिक वर्षात जुनपर्यंत आणि त्याच्यापुढे तो ८८ करोड रु. ला गेला असता म्हणजे यामध्ये आम्ही तो ८५ करोड रु. चा ठेका काढला त्या त्या आर्थिक वर्षातले ते ते दिवस आहे त्याचे जे अपेक्षित उत्पन्न आहे ते विचारात घेउन काढलेले आहे. एक ही पैसा इथे तिथे न होउ देता म्हणजे ७३ कोटी रु. १० टक्के ॲड करुन ८० कोटी रु., ८० कोटी कोटीमध्ये १० टक्के ॲड करुन ८८ कोटी रु. या संदर्भ कालावधीमध्ये जे महिने येतात त्या महिन्याचे अपेक्षित उत्पन्न विचारात घेउन ज्या ठेकेदाराला ज्या कालावधीमध्ये आपल्याला मक्ता द्यायचा आहे त्या अपेक्षित कालावधीचे उत्पन्न आपण ८५ कोटी रु. काढलेले आहे. ह्याच्यापेक्षा सभागृह वेगळे काही विचार करुन ठरवित असेल तर त्याच्यावर आम्ही काही बोलू शकणार नाही.

**अनिल सावंत :-**

९२ करोड रु. ठिक आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, जादू तो जादू झाला. दो बिल्ली के झगडे मे जैसा बंदर फायदा उठाता है, त्यावेळी जेव्हा हा प्रस्ताव आला तेव्हा हा टेंडर आपण अपेक्षित धरले महासभेमध्ये सेस आणि ऑक्ट्रॉय म्हणून येथे ठराव आला. त्या ठरावामध्ये कोणी लक्ष दिले नाही. अधिकारी वर्गाला माहित होते की, जे.एन.एन.यु.आर.एम. च्या बद्दल जसे सन्मा. सदस्य जुबेर इनामदार बोलले टेंडर आपल्या टेबलावर येउन पडले होते ते फक्त लागू करायचे होते. स्काय वॉकला पण आपण मान्यता दिली होती. सर्व आपल्याला माहित होते. जेव्हा कोणी माणूस बिझनेस करतो त्या बिझनेसमध्ये अपेक्षित जसे आपण आता करतोय. त्यावेळी अधिकारीवर अपेक्षितच घरले नव्हते जे.एन.एन.यु.आर.एम. ची आणि स्काय वॉकची आणि टाटा, रिलायन्स, स्काय केबल यांची कोणाची अपेक्षित धरली नव्हती. फक्त १० टक्के वाढ आणि जे १४

आयटमवर रेट वाढत होते त्यावेळी ती पण अपेक्षित धरायला पाहिजे होती. ठराव मांडताना तसा ठराव दिला पाहिजे होता. पण आमच्या दोघांच्या भानगडीमध्ये तो ठराव आपण असा दिला की, त्याच्यामध्ये ठेकेदाराचा फायदा.

**अनिल सावंत :-**

पण तो ऑक्ट्रॉयचा ठराव तुमचाच होता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, त्यादिवशी आयुक्त साहेबांच्या केबिनमध्ये बसले असताना फोन आला त्यावेळी आयुक्त साहेब त्या वकीलाला बोलत होते की, कोणाला ते मला माहित नाही की, हे काय होणार आहे? उद्या शासनाच्या निर्णयाप्रमाणे सेस लागू करायला लागेल. तर काय करायला लागेल? तर आयुक्तांनी त्या वकीलाला किंवा ज्या गृहस्थाशी बोलत होते की आपण असे कोर्टामध्ये डिबेट करा की, जोपर्यंत महाराष्ट्र शासन आम्हाला मेन पॉवर देत नाही. तोपर्यंत आम्हांला ऑक्ट्रॉय, उद्या समजा मेन पावर दिला आणि कोर्टाच्या आदेशाने सेस लागू झाला तर ह्याचे उत्पन्न अपेक्षित काय आहे? हे होणार आहे का? जी फोनवर चर्चा चालू होती की, तुम्ही डिबेट करताना आम्हांला मेन पॉवर द्या. त्या दिवसापासून आम्ही सेस लावू असा तुम्ही युक्तीवाद करा. हे साहेब, कोणाशी तरी फोनवर बोलत होते आणि आता तुम्ही ९२ कोटी रु. टेंडर दिले आहे म्हणून अपेक्षित धरले आहे. उद्या पुन्हा कोर्टाने निर्णय दिला सेस आणि तुम्ही सेसला तीन साडेतीन कोटीची महिन्यामध्ये तुट दाखविली होती आणि ती तुट आपण बारा महिन्याची काउंट केली जर ते तसेच राहिले तर हे फिगर कुठे जाणार आहे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

स्थायी समितीचे जे फिगर आहे त्याला वाढवू नका.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. ९२ करोड रु., सिनेमा नाट्यगृह २५ लाख रु.

**अनिल सावंत :-**

स्थायी समितीला हे ५० केले आहे. ह्यांनी फिगर चेंज केलेले नाही हे मी मगाशी बोललो. आता आपले रेट वाढवले आहे काल महासभा ठराव झाला नाही.

**मा. महापौर :-**

नवीन स्टेमप्रमाणेच मागचे ते २५ लाख रु. होते.

**अनिल सावंत :-**

नाही, ते ५० लाख करा.

**जुबेर इनामदार :-**

आम्ही सुचविले होते.

**मा. महापौर :-**

ठिक, ५० लाख रु.

**प्रफुल्ल पाटील :-**

ठिक आहे. आपण मला सांगा अख्खा सिनेमागृहाची संपूर्ण जंत्री बघा. २००५-०६ ला ३८ हजार रु. २००६-०७ ला ३ लाख ६० हजार रु., २००७-०८ ला ३ लाख २० हजार रु. २००८-०९ ला ३ लाख १९ हजार रु. ८ महिन्यामध्ये काय उजेड पडणार आहे. आपले मागचे सगळे अनुभव कसे आहेत?

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, ॲट इज इट राहू दे.

**अनिल सावंत :-**

काल ठराव झालेला आहे.

**अजित पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये ६ सिनेमागृह आहेत. त्या ६ सिनेमागृहामध्ये सिनेमॅक्स तीन स्क्रिन, रसाज - २, ठाकूर मॉल - ४, मॅक्सेस — ६, एम.एम. — १ असे एकूण १७ स्क्रिन आहेत. असे हिशोबात धरुन १७ गुणिले प्रत्येकाचे ४ शो पकडले आहेत. ६८ शो होतात. ३० दिवस, १२ महिने असे २४ हजार ४८० शो पकडतो तर २४ लाख ४८ हजार रु होतात आणि ५२ वर इतर पकडून २५ लाख रु. चा फिगर घेतला.

**प्रफुल्ल पाटील :-**

४ चे ८ होतील का? ५० लाख रु. पकडले तर.

**अजित पाटील :-**

नाही. ४ चे ३ होउ शकतील.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग तसेच करा.

**मा. महापौर :-**

हे जे २५ लाख रु. मध्ये ४ शो मिळतात. सिनेमॅक्स इथे तिथे आता ६ शो चालतात. रात्री ११.०० पर्यंत चालतात व इतर जे काही कार्यक्रम शहरात होतात त्याचे इन्कम अजून बाकी आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

पहिल्याच वर्ष वाढीचा आहे.

**मा. महापौर :-**

हे कसे फिक्स आहे. तुमचा थिएटर खाली जरी गेला तरी तुम्हाला शोवाईज द्यायचे आहे.

**भगवती शर्मा :-**

यह कौनसा बजेट है?

**अनिल सावंत :-**

शहरामध्ये आणखिन दोन मॉल येत आहेत, त्याचे ६ स्क्रिन होतील.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

स्थायी समितीचा अंदाज बरोबर आहे. तो कायम राहू दे.

**मा. महापौर :-**

३५ लाख रु. करुया.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

जाहिरात कर ७५ स्थायी समितीने अपेक्षित केले आहे.

**मा. महापौर :-**

हे नक्की कुठले जाहीरात कर आहे? ३८ आणि ७५ आहे तर नक्की काय करायचे?

**प्रकाश दुबोले :-**

वसुली करणाऱ्या अधिकाऱ्याला विचारा.

**प्रेमनाथ पाटील :-**

वसुली अधिकाऱ्यांना विचारा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

पानपट्टे साहेबांकडे आहे. मागील आर्थिक वर्षामध्ये ३३ लाख रु. होते आणि मा. आयुक्तांनी ३८ लाख रु. सुचविले होते आणि स्थायी समितीने ७५ लाख रु. केले.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण ५० लाख रु. करु या. १५ लाख रु. च वसुल झालेले आहे.

**मा. महापौर :-**

५० लाख रु., विशेष शिक्षण कर.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

विशेष शिक्षण कर हा परसेन्टेजमध्ये राहतो.

**मा. महापौर :-**

जे ५२ आपण तिथे सुचविले आहे त्या परसेन्टेजमध्ये

**प्रफुल्ल पाटील :-**

जेवढे मालमत्ता करात रिलेटेड आहे त्याची परसेन्टेजवाईस वाढ करा.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. विशेष शिक्षण कर १८५.

**शशिकांत भोईर :-**

ह्याचा खुलासा करा. कशा पध्दतीने येणार? आपण पे ॲन्ड पार्क कुठे सुरु केले आहे?

**अनिल सावंत :-**

सुरु केले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपण ठेका दिलेला आहे आणि ठेका किती दिवसाचा आहे?

**मधुसुदन पुरोहित :-**

मागील वर्षाचे किती आहे?

**प्रेमनाथ पाटील :-**

२५ लाख रु. होते त्यातले ८ लाख रु. च वसुल झालेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपण ठेका पध्दतीने दिलेले आहे. त्याची किती अमाउंट फिक्स केलेली आहे? त्याचा खुलासा करा आणि किती महिन्यासाठी त्याची बाकी आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

पे ॲन्ड पार्कचे जे साडेपाच लाख रु. आहे मागच्या वर्षाचे ते २५ लाख रु. ठेवले आहे त्याचे काय टेंडर काढणार आहे?

**मा. महापौर :-**

पे ॲन्ड पार्कची माहिती येते तिथपर्यंत सी.एफ.सी. वाले आले आहेत. आपल्याला काही विचारायचे होते.

**प्रफुल्ल पाटील :-**

मी आपल्याशी पहिल्यांदा बोललो पण आहे की जी बिल तुम्ही देता त्या बिलामध्ये तुम्ही मागील कोणाची थकबाकी असेल ती दाखवता आणि करंट ईअरचे बिल देता. मागील थकबाकीमध्ये तुम्ही प्रत्येक हेडला मालमत्ता कर, शिक्षण कर ह्याला त्याचे त्याचे जेवढे इंटरेस्ट आहे ते ॲड करुन तुम्ही त्या फिगरमध्ये आणता आणि मग करंट ईअरचेसुध्दा त्याच्यामध्ये इंटरेस्ट लावून देता हे कसे काय? चूकीचे आहे की, बरोबर आहे?

**सिमा मिश्रा :-**

मागणी बिलाचा नमुना आम्ही कर विभागाकडून घेतला आहे आणि ते कॅल्क्युलेशन आहे ते त्यांच्याप्रमाणेच केलेला आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

पण पूर्वी तर असे कॅल्क्युलेशन नव्हते. तुमची प्रत्येक वर्षाला एकाच फ्लॅटला घरपट्टी कर बदलत जाईल. त्याची थकबाकी राहिली त्याची घरपट्टी....

**मा. महापौर :-**

त्यांचा विषय असा आहे की, जे काही केलेले आहे ते टॅक्स डिपार्टमेंटने सुचवले. त्यांनी तो टॅक्स रिसीट नमुना तयार केला त्याप्रमाणे ते कॅल्क्युलेट करुन पाठवतात.

**प्रफुल्ल पाटील :-**

ते बरोबर आहे का? तुम्ही येथे सांगा. स्पेसीफाय करा.

**मा. महापौर :-**

हे टॅक्स डिपार्टमेंट सांगेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्यांच्याकडे लोक येतात आणि विचारतात की, आमच्या ह्याच्यामध्ये टॅक्स व्हेरीफिकेशन कसे झाले? गेल्या वर्षी, माझ्या फ्लॅटचा एरिया तर वाढला नाही तेवढाच आहे. गेल्या वर्षी मला अमुक मालमत्ता कर एवढा आला. शिक्षण कर एवढा आला. वृक्षकर एवढा आला. ह्यावर्षी उलटा कसा काय झाला?

**सिमा मिश्रा :-**

२८% हाउस टॅक्स, १% फायर टॅक्स यह जो डिस्ट्रीब्युशन है वह थकबाकी को लेके इट रिमेन सेम फॉर पिछे का वर्ष।

**प्रफुल्ल पाटील :-**

त्याच्यातच तुमची इंटरेस्टची फी ॲड होउन येते. आय कॅन शो यू सो मेनी बिल्स. आता हे करंट ईअर २००८-०९ आहे.

**मा. महापौर :-**

इंटरेस्ट ॲड होउन होतो की भरल्या नंतरही इंटरेस्ट येतो हे काय आहे?

**प्रफुल्ल पाटील :-**

इंटरेस्ट जर बाकी असेल तर त्यांनी इंटरेस्टच्या कॉलममध्येच ते द्यायला पाहिजे तर तुम्ही ते प्रिन्सीपल अमाउंटमध्ये ॲड करता आणि त्याच्यात सेग्रीगेट करता.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कल्याण - डोबिंवलीचा तो मॉडल आहे आणि त्याला शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये आपला जो मुद्दा आहे तो आम्ही तपासून घेतो. उद्या, नागरीकांवर बोझा, कर आकरणी ही होणार नाही. ज्यांचे रियल मागचा इंटरेस्ट क्लेम व्हावे. आपली जी अपेक्षा आहे की, एकदा कर आकारणी झाल्यानंतर रिवाईस होईपर्यंत महासभेने मान्यता देईपर्यंत विनाकारण त्याला लादले जावू नये हे तपासून घेतो.

**एस. ए. खान :-**

तपासून घ्या आणि करेक्ट करा. माझ्याकडे पण तशी बिल आहेत. मी तुम्हाला दाखवतो. त्याच्यामध्ये डबल डबल येतात. पैसे भरल्यानंतर तुम्ही त्याच्यात कसे काय कॅल्क्युलेशन करता.

**प्रफुल्ल पाटील :-**

समजा, गेल्या वर्षीचा माझा प्रॉपर्टी टॅक्स अक्च्युअली ४५० रु. ह्यांचा इंटरेस्ट १०० रु. आला. गेल्यावर्षी मी काही भरले नाही आणि ह्यावर्षी जेव्हा मला बिल येईल तेव्हा ते मागचे १०० रु. आहे. इंटरेस्टचे ते प्रत्येक हेडमध्ये वाढ करुन प्रिन्सीपल अमाउंट वाढ करुन देतात.

**मा. महापौर :-**

त्याच्यामध्ये प्रॉब्लेम असा आहे की, ३१ तारखेपर्यंत शेवटची डेट असेल किंवा काही एक्स.वाय.झेड. डेट असेल. आपण आपले जे दोन आहेत ते इंटरलिंक आहेत खालच्या सीएफसी मध्ये, प्रभाग कार्यालयामध्ये. बाकीचे टॅक्स डिपार्टमेंट आपण जे रिकव्हरी करतो डोअर टू डोअर किंवा इतर कार्यालयामध्ये किंवा प्रभागामध्ये तर ते येउन मार्च महिन्यामध्ये हेवी कलेक्शन होते आणि नंतर आपण एक, दोन महिने तेच काम करत असतो. रोलींग करायचे आणि कॉम्प्युटर कसे त्याच तारखेला जमा होतो म्हणून ऑटोमॅटीकली ते इंटरेस्ट जनरेट करतो. तोही एक प्रॉब्लम आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

कॉम्प्युटरला जेव्हा तुम्ही एन्ट्री लोड करता तेव्हा डेट ऑफ पेमेन्ट धरुनच तुम्ही एन्ट्री लोड करणार.

**मा. महापौर :-**

डेट ऑफ लोड कॉम्प्युटर त्या तारखेला धरतो. आपण घेतो ३१ तारखेला येथे कॉम्प्युटरला अपडेट होतो ३१ एप्रिल म्हणजे एक महिना उशीरा आणि ते ऑटोमॅटीकली इंटरेस्ट, पेनल्टी सगळ झंझट करतो आणि मग पुढच्या बिलमध्ये जाते.

**प्रफुल्ल पाटील :-**

तरी पण ते प्रत्येक हेडवाईस तुमचे इंटरेस्ट जायला नको. असे कसे इंटरेस्ट जाईल.

**मा. महापौर :-**

सॉफ्टवेअरमध्ये तो बदल करावा लागेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

दुसरी गोष्ट, मला असे म्हणायचे आहे की, तुमच्याकडे या प्रॉपर्टी ऑलरेडी रेकॉर्डेड आहेत. टॅक्स डिपार्टमेंटशी आता काय संबंध नाही. एकदा टॅक्स डिपार्टमेंटने तुम्हाला माहिती दिली की शहरामध्ये टोटल ३० हजार प्रॉपर्टी आहेत आणि त्या ३० हजार प्रॉपर्टीला तुम्हाला नेक्स्ट ईअरला टॅक्स लावायचा आहे तर कॉम्प्युटरमध्ये एवढे आपण अद्यावत मॉर्डनायझेशन केले आहे. एवढे लोक भरती केली आहेत. एवढे लोक सुशिक्षित आहेत. चांगले क्वालीफाईड आहेत. मग ती बिल का सहा-सहा महिने निघत नाही? You are alse well technical person you just specify what you are not able to issue the bill in six & seven months period is one & half.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण जे बोलतो तर टेकनिकल आपल्याला त्या सॉफ्टवेअरमध्ये चेन्जेस असेल. बाकी राहिला प्रश्न जे ३१ मार्च तारखेपर्यंत ऑटोमॅटीकली बिल जनरेट करतो. इंटरेट जनरेट करतो. पण आता आपले जेवढे कार्यालय आहेत ते आपण सर्व एकमेकांशी लिंक करतो. तुम्ही तिथे पैसे भरले......

**प्रभात पाटील :-**

किती दिवसापासून सांगतोय, ह्यांना नेमून किती दिवस झाले आहे. आपण कल्याण डोंबिवलीला किती लाख रु. महिन्याला भरतो? का, आपण त्यांच्याकडून ते सगळं घेत नाही. आपण फक्त त्यांना बिल पेमेन्ट करतो.

**मा. महापौर :-**

ते त्यांच्या सेवेचा संबंध नाही.

**प्रभात पाटील :-**

का, आपण त्यांच्याकडून प्रणाली घेतली आहे.

**मा. महापौर :-**

आपण सॉफ्टवेअर घेतले आहे.

**प्रभात पाटील :-**

बरोबर आहे. त्या सॉफ्टवेअरमध्ये काय इनक्ल्यूड केले आहे? आपल्या सारखी फायदेशीर काय गोष्टी आहेत? आपण फक्त त्यांना बिल देतोय.

**एस. ए. खान :-**

आउटलाईन चालू आहे.

**मधुसुदन पुरोहित :-**

साहेब, तिथे मोठा अजून प्रॉब्लेम आहे की जो अधिकारी आहे......

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

कल्याण - डोंबिवलीचे सॉफ्टवेअर आहे. त्यांची ती रॉयल्टी आहे आणि ती भरावीच लागते.

**प्रभात पाटील :-**

बरोबर आहे ना. पण आपल्याला ते काहीही फायदेशीर नाही. आपल्या काहीही कामाचे ते नाही. फक्त पैसे भरले आहे आपण रॉयल्टी घेतली म्हणून. त्यात आपल्या फायद्याचे काही नाही. मग आपण त्याच्यामध्ये टेंडर्स भरायचे नाही का?

**मधुसुदन पुरोहित :-**

मा. महापौरजी, तिथे अजून एक मोठा प्रॉब्लेम काय आहे तर अधिकारी आहे तिथे जे डेली कलेक्शन झाले, चेक कलेक्शन झाले ते मी २-३ वेळा त्यांच्याकडे गेलो तेव्हा बघितले त्यांच्याकडे पेनड्राईव्ह आहे पण ते काय करतात. सकाळचे दोन तास बिघडवतात. जेवढे चेक आले आहे, समजा डेली ३००-४०० चेक आले आहेत ते मॅन्युअली त्याला टिक करत असतात आणि मी त्यांना ३-४ वेळा बोललो आहे की, तुम्ही ह्याला पेनड्राईव्हने लोड करा आणि तोच पेनड्राईव्ह तुम्ही जावून एच.ओ. ला द्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मिरारोडमध्ये तसे इम्प्लीमेंट केलेले आहे.

**मधुसुदन पुरोहित :-**

ही लहानशी गोष्ट आहे. जेवढे पण चेक आहेत त्यात टाटामध्ये एन्ट्री करायची त्याला पेनड्राईव्ह लावायला आणि तो डायरेक्ट बँकेत जावून देवू शकतो किंवा एच.ओ. मध्ये देवू शकतो. मला असे वाटते की, जी लोक काम करतात त्या लोकांना पेनड्राईव्ह कसा युझ करायचा ते ही माहित नाही. सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत ती लोक टीक करत असतात.

**मा. महापौर :-**

आता आपण जे लिकींग करतो तिथे जमा केले की येथे आपल्याला अपडेट मिळेल.

**एस. ए. खान :-**

कधीपर्यंत हे होईल?

**मा. महापौर :-**

मार्चअखेर पर्यंत.

**प्रफुल्ल पाटील :-**

दुसरी गोष्ट ह्या डिपार्टमेंटला. जुनी लोक आहेत.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, आपली महानगरपालिका स्वतःचे सॉफ्टवेअर डेव्हलप करु शकत नाही का?

**प्रफुल्ल पाटील :-**

तोच विषय महत्वाचा आहे. मधल्या काळामध्ये जे मोठे टेकनिशन आले होते त्यांनी हा सगळा चावटपणा केला आहे. आपल्याकडे इतका अद्यावत डेटा, सॉफ्टवेअर होते. अरली ईअर कॉन्ट्रॅक्टरकडे इतका अद्यावत डेटा, सॉफ्टवेअर होते ते जाणूनबुजून डिस्कार्ड करुन श्री. माशाळकर नावाचा एक महाबदमाश या पालिकेमध्ये आला होता आणि तो असे समजत होता की, माझ्याशिवाय दुसऱ्याला नॉलेजच नाही. ज्याने हा एवढा पैसा देवूनही आज्ञावली आणली आणि ह्याच्यामध्ये एवढ्या त्रुटी आहेत. आता विचारा मागणी जी सॉफ्टवेअर होती ती इतकी सुंदर होती की, तुम्हांला सगळ्या प्रकारची स्टेटमेंट्स मिळत होती. ॲक्युरसी होती. ज्याने हा सत्यानाश केला या नगरपालिकेचा. मोठे सी.एफ.सी. सेंटर नावाला दाखवता आणि तिथे तोंडाला काळं लागते. गेल्यावर्षी मी बिल मागायला गेलो मला बिल काय आले हे तुम्हांला माहित आहे का, २००८-०९ आणि वर लिहले आहे २००९-१० आणि खाली २००८-०९.

**मधुसुदन पुरोहित :-**

साहेब, २-२, ३-३ दिवस लॉकींग झालेले कॉम्प्युटर ओपन होत नाही. त्यांच्याकडे सॉफ्टवेअरची काय व्यवस्था आहे हे मला ही कळत नाही. समजा, कोण काम करणारा व्यक्ती आहे त्याला लॉक ओपन करायचे कळत नाही.

**प्रभात पाटील :-**

नाही ओपन करता येते. प्रायव्हेट लोकांना बोलावतात. खाजगी ह्यांच्या ओळखीचे लोक आहेत त्यांना बोलावून घेतात खोलायला आणि मग त्याच्यामध्ये बिघाड झाला की, खर्च महानगरपालिकेचा हे स्वतः पण त्याच्यात काय करु शकत नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

ॲट लिस्ट तुम्ही कन्फर्म करा की, पूर्वीची सॉफ्टवेअर होती ती योग्य होती का अयोग्य होती.

**मधुसुदन पुरोहित :-**

त्याचे नुकसान पूर्ण शहराच्या रहिवाश्युाना आहे.

**मा. महापौर :-**

आपल्याला कम्पलसरी केले होते की, कल्याण-डोंबिवलीकडून सॉफ्टवेअर घ्या असे काही तरी होतं.

**प्रफुल्ल पाटील :-**

असे काही नाही. आम्हांला काय कम्पलसरी केलेले कल्याण-डोंबिवलीचे घ्या.

**शशिकांत भोईर :-**

आजपर्यंत स्वतःचा सॉफ्टवेअर का नाही?

**एस. ए. खान :-**

ज्याला कम्प्युटर वगैरे उघडता येते त्याला कमी करा. जे टेक्नीकल एक्सपर्ट आहेत त्यांना घ्या.

**प्रभात पाटील :-**

आता जेव्हा एवढी ओरड होते की, ते आपल्याला काही कामाचे नाही.

**एस. ए. खान :-**

कॉम्प्युटरमध्ये काही बिघाड झाला की, आपल्याला बाहेरच्या लोकांना बोलवायला लागते तर काय आहे?

**मा. महापौर :-**

आता आपण सॉफ्टवेअर अमेन्ड करुन घेउ.

**चंद्रकांत वैती :-**

ह्याच्या पुढच्या हेडमध्ये आपण दोन कोटी रु. प्राविधान केलेले आहे. हे संगणक संच घेण्यासाठी मग त्याच्यावर ट्रनिंगच द्यायची आहे का, नवीन नउ शिक्क्यांना आपण काय करणार आहोत?

**प्रभात पाटील :-**

त्याच्यामध्ये आपण काय करणार आहोत ते सांगते. ते खर्च करणार. टेंडर निघणार, ठराविक लोकांना बोलवणार आणि तो खर्च होणार.

**मा. महापौर :-**

आपण त्याच्यामध्ये सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील ह्यांना अमेन्ड करुया आणि हे जे लिकींगचे काम आहे ते ३१ मार्चपर्यंत संपवू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठराविक लोकांना नाही. ठराविक वर्तामानपत्र. जे वर्तमानपत्र भाईंदरला मिळत नाही.

**मधुसुदन पुरोहित :-**

मा. महापौरजी या विषयाबद्दल तुम्हांला सांगतो. फक्त संगणकाबद्दल एक ठेका मधे निघाला होता. पाच लाख रु. किंमतीचा तो ठेका होता आणि त्यामध्ये जी रिक्वायरमेंट ऑफ टनओव्हर. समजा कुठला व्यक्ती काम घेण्यासाठी गेला तर त्याचा टनओव्हर वर्षाचा २ कोटी रु. असणे गरजेचे असते. ५ लाख रु. तो त्याचे मेन्टेनन्स करतो. तो २ करोड रु. वर्षाचा टनओव्हर करु शकतो का? ह्याचा अर्थ काय आहे?

**शशिकांत भोईर :-**

आपल्या ठेकेदाराला मिळावा हा ठेका.

**प्रभात पाटील :-**

असा पण ठेका निघालेला आहे त्याची आपण त्यांच्याकडून माहिती घ्या. ह्यांनी तुम्हांला बरोबर माहिती सांगितली.

**मधुसुदन पुरोहित :-**

आणि सर्व्हीस टॅक्समध्ये ५ लाख रु. चा जो टनओव्हर करतो. जो व्यक्ती ५ लाख रु. चे काम करायला जातो आता तर रिलायन्स कंपनी सध्या सर्व्हीस टॅक्स भरत नाही. मोठमोठ्या ज्या कंपन्या आहेत त्या सर्व्हीस टॅक्स भरत नाही. इकडे ठेका घेण्यासाठी त्यामध्ये अशी अट लिहलेली आहे. सर्व्हीस टॅक्स भरलेली पावती पाहिजे. ५ लाख रु. चे काम देत आहात आणि सर्व्हीस टॅक्स पाहिजे तुम्हांला सांगितल्यानंतर एक्सेप्ट करतात की, आमची चूक झाली. किती पट तुम्ही जास्त मागत आहात? २ कोटी रु. चा टनओव्हर ५ लाख रु. साठी.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही म्हणता की, सॉफ्टवेअरसाठी बदलू किंवा चेंज करु किंवा ते अपडेट करु. तरी तुम्ही त्यांना रॉयल्टी देत राहणार का? मग मागचा तो ठेकेदार होता तुम्हांला फुकट सॉफ्टवेअर डेव्हलप केला ते द्यायला तयार होता. पण तुमच्या पालिकेच्या लोकांना माज आहे, माज अक्षरशः जोड्याने चोपले पाहिजे त्यांना. चोपणार आहे त्यांना सी.एफ.सी. मध्ये जाईन तेव्हा एकेकाला चोपूनच काढणार आहे. इतका माज आहे की, त्याला त्याचे पैसे तर दिलेच नाही त्या कॉन्ट्रॅक्टरचे वर पोलीस स्टेशनला केस करायला लावली. विजय पाटील असतील बघा. हे कशासाठी नगरपालिकेच्या निधीची वाट लावून टाकायची आणि दुसरे लोक डोक्यावर बसायचे. सगळा फंड उलटा सुलटा डायव्हर्ट करायचा. काम सगळं चांगले चालले आहे ते ठेवायचे आणि सर्वसामान्य माणसाला या शहरातल्या भोगायला लावायचे प्रत्येक वेळी आला की, त्याला वेगळे बिल, पुन्हा इंटरेस्ट, पुन्हा पेनेल्टी अहो नोटीसा जात नाही आणि नोटीस फी कसली? एवढे वारंट फी काढले आहे, किती लोकांच्या जप्त्या गेल्या ते सांगा. जप्त्या करण्यासाठी करोडो रुपयाच्या जाहिराती दिल्या. एकसुध्दा जप्ती झाली नाही. जप्त्या जिथे झाल्या तिथे दुसऱ्याची टाळी उघडली. कसली महानगरपालिका काम करते. चपराशीच्या लायकीची हे लोक नाही. करोडो रुपये आम्ही खर्च करतो. मुर्ख लोक आहेत का येथे बजेट आहे. ढणढण, तमाशा केला. ताशा वाजवला ढणढण करत आणले झाला बजेट मंजूर कशाला करायचा बजेट मंजूर. १० दिवस करणार नाही. एकएक पैशाचा आम्हांला आता हिशोब पाहिजे. किती दिवस हे चालायचे? जे गेले

पाच वर्षापूर्वी ते उल्लू बनून गेले. आम्ही २० वर्षे झाले उल्लूच बनतोय. प्रत्येक गोष्टीला तुमच्याकडे सांगायला पर्याय आहे. आज्ञावली बदलू. काय बदलणार हो ह्यांना. ह्यांना ज्यांची गरज नाही. ह्यांचा या शहराला एक पैशाचा उपयोग नाही. त्या लोकांना ह्यांना रॉयल्टी द्यायच्या आहेत. त्यांच्या रॉयल्ट्यामध्ये काय आहे. श्री. माशाळकर ८५ हजार रु. पगार घेत होता. किती लोकांना त्यांनी येथे ट्रेनिंग दिले. येथे काय केले? केबिन केले त्याच्यावर ५० लाख रु. खर्च अशापध्दतीने काहीही चालू देणार नाही. बस झाले, आता खुप झाले. प्रत्येकवेळी नवीन प्रस्ताव आणायचे हे करुन द्या आम्हांला ते करुन द्या. ते दिले की झाले. सेसला आम्ही कॉम्प्युटर घेतले झाले सेस बंद पडल्यानंतर तुम्ही काय करणार आहात? दुसरी सी.एफ.सी. खोलणार. मा. आयुक्त साहेब पटकन सहज बोलले अहो आपण कॉम्प्युटरची दुसरी सी.एफ.सी. खोलू एका सीएफसीची वाट लावून ठेवली आहे तर दुसरे आणखीन काय लावणार आहे?

**प्रभात पाटील :-**

ते तिथे धूळ खात पडले आहेत. त्यांच्यावर कव्हरपण नाही. ते कॅम्प्युटर असेच पडले आहे.

**मधुसुदन पुरोहित :-**

एका कम्प्युटर १० इमेजवर आपण काम करु शकतो. एवढे कम्प्युटर आणण्याची काय गरजच नाही.

**प्रभात पाटील :-**

तुमचे चार वॉर्ड कम्प्युटरने जोडले गेले नाही. काय झाले नाही? तुमच्याकडे तीन तज्ञ आहेत. सी.एफ.सी.ला तुम्ही तीन चांगली लोक दिली आहेत. ते काय करतात?

**शशिकांत भोईर :-**

त्यांना जर वापर होतच नसेल, तर त्यांना कार्यमुक्त करा. त्याच्यावर जागेवर दुसरे ठेवा. आज स्वतःची प्रणाली आपण केलेली नाही.

**प्रभात पाटील :-**

करा, करा त्यांना कार्यमुक्त. काम करत नसतील तर.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

वाईड एरिया नेटवर्क यह डोंबिवली या कोई महानगरपालिका मे डेव्हलप किया हुआ वाईड एरिया नेटवर्क यहॉ पर चालू करनेका प्राविधान किया गया है। पर अभी तक उसको लागू नही किया है। अगर वाईड एरिया नेटवर्क चालू कर दिया होता तो यहापर जो रोज अतिक्रमण पर चर्चा होती है वह होती नही थी, क्योंकी सिस्टम है, सॉफ्टवेअर के अंदर। एक बार एन्ट्री कर दी और तीन दिन मे कार्यवाही नही होती है तो मालूम पडता है। वाहन का सिस्टम श्रीम. सिमा मिश्रा से मालूम किया था, इनसे आप पुछीए की, वाईड एरिया मे अब तक क्या काम किया है?

**सिमा मिश्रा :-**

सर, वाईड एरिया नेटवर्क यह एक नेटवर्कींग कन्सेप्ट है। जो की रेडीओ फ्रिकवेन्सीसे वॉर्ड ऑफीस नंबर ३ या ४ मे युझ किया है

**डॉ. राजेंद्र जैन :-**

वह छोडीए। क्या होता है, क्या किया है आपने अबतक, वह कबतक पुरा हो जाएगा यह बताईए।

**सिमा मिश्रा :-**

सर, वह काम किया हुआ है। कनेक्टीव्हीटी की है। एम.सी. चल रहा है और भाईंदर (ईस्ट), मिरारोड के कलेक्शन यहापर रिफलेक्ट हो रहे है। उस कनेक्टीव्हीटी के थ्रु ही।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

वह कब तक। पुरा हो जाएगा। डेट बताईए।

**सिमा मिश्रा :-**

सिर्फ सेक्शन ऑफीसर पेन्डीग है । करीब दो महिने। मुझे ऐसा लगता है की आप केअर मॉड्युल के बारे मे बोल रहे है। केअर मोड्युल मे जो सुविधा है.....

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मै बात कर करा हु, वाईड एरिया नेटवर्क। अतिक्रमण विभाग के लिए वह आपके पास प्रपोझल आया हुआ है। आपके अतिक्रमण डिपार्टमेंट के श्री. राठोड साहब को बुलाईए और बातचीत करवाईए।

**जुबेर इनामदार :-**

मॅडम डॉक्टर साहेबांना अतिक्रमणाची माहिती पाहिजे ती तुमच्या कम्प्युटरच्या सिस्टमवरून कशी उपलब्ध होईल ती त्यांना सांगा.

**सिमा मिश्रा :-**

सर, उसके लिए प्रिपेड जिसमे आप फ्लॅट सेट कर सकते है की, जिसमे अनधिकृत बांधकाम है। वही आपको एक रिपोर्ट देगा की, हाउ मेनी लिगल प्रॉपर्टी इज देअर.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

जो सॉफ्टवेअर है वह यहा पर लागू करने का प्रपोझल आया हुआ है। ऐसी मुझे जानकारी है। आप श्री. राठोड साहब के साथ बात करके हमको बताईए।

**सिमा मिश्रा :-**

सर, मै विभाग से जानकारी लेती हु। मेरे विभाग मे ऐसे अभितक कोई माहिती नही आई है।

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, हे सॉफ्टवेअर आपण कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडून कधी घेतले आहे ते विचारा.

**मा. महापौर :-**

२००२ साली.

**अलिन सावंत :-**

याला एवढी वर्षे झाली तरी फक्त प्रॉपर्टी टॅक्सची बिल निघत आहेत. बाकी कुठचेही काम होत नाही. मागच्यावेळी मॅडम स्थायी समितीमध्ये ही आले होते. त्यावेळी सुद्धा विचारले होते. तेव्हा त्यांनी सांगितले होते की, आमच्याजवळ कम्प्युटर इंजिनिअर्स नाही डेटा एन्ट्री करायला कोण माणस नाही. आज आपण मेंन्टनन्स साठी फक्त ४० लाख रू. खर्च करतोय आणि त्या सॉफ्टवेअर रॉयल्टी म्हणून आपण वर्षाला १६ लाख रू. देत आहोत.

**सिमा मिश्रा :-**

१ लाख ३६ हजार रू. मन्थली.

**अनिल सावंत :-**

१६ लाख रू. आपण रॉयल्टी देतो आणि त्या सॉफ्टवेअरचे ५ वर्षामध्ये फक्त १० ते १५ टक्के आपण उपयोग करून घेतो आणि त्याच्यामध्ये सुद्धा असे प्रॉब्लेम आहेत जसे सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी सांगितले त्या सॉफ्टवेअरमध्ये फ्लेक्झीबिलीटी पण नाही.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर महोदय, खतगांवकर साहेब, ही सी.एफ.सी आपल्याकडे चालू झाली आहे तेव्हापासुन त्याचा उपयोग या महापालिकेसाठी किती झाला हे मला माहिती नाही. काहीतरी ३०-३५ संगणक चालकांची नेमणूक झाली त्याला रोजगार मिळाला. मॅडमने बऱ्याच वर्षापासुन श्री. गायकवाड साहेबांच्या कारकिर्दीपासुन काम करत आहेत. परंतु महापालिकेला त्यांचे काय दायित्व दिले हे आम्हाला कळाले नाही. चुका, नगरसेवकांची गैरव्यवहार हे काम कशाप्रकारे होईल कशाप्रकारे नाही पण तुमचे काम काय आहे? खाली काय लिहिले आहे ते वाचा. संगणक चालक, मॅडम तुम्ही आणि तुमचे सहकारी किती दिवसात कुठला कुठला दाखला देणार आहे ते वाचा आणि त्या पद्धतीने तुमचे काम करा. तुमच्या नियुक्त्या इथे कशासाठी झाल्या आहेत? मग तुम्ही ज्या गोष्टीसाठी नियुक्त झालात त्या गोष्टीचा पगार तुम्ही घेता त्या संदर्भात तुमच्या कर्तव्यात तुम्ही काय काय देता. तुमची कर्तव्य कशी कशी बजावता? तुमची कर्तव्य काहीच बजावत नाही. तिथे महानगरपालिकेतल्या, आजची ही एक चांगली सभा आहे. बरीच लोक आपल्या जागेवर येउन आपल्या भुमिका जपुन बोलत आहेत. त्याच्यामुळे आज अधिकाऱ्यांनाही एक इशारा आहे. कर्मचाऱ्यांनाही इशारा आहे की, आपण एक आपल्या कर्तव्याची निश्चित दिशा करून आपल्या कामकाजाचे आकडे करूनच आपल्याला काम केले पाहिजे. कारण मला जे भविष्य दिसत आहे हे जे लोक नाटकबाजी करतील त्यांची शेवटची इन्ट्री त्या नाटकातील राहिल. हे आज दिसतय. म्हणून मॅडम तुम्ही तुम्हालाही आणि तुमच्या सर्व सहकाऱ्यांनाही सांगा की, आपल्या नियुक्त्या होतात हे तुमच्यावर किती मोठा खर्च होतो आहे हे माहिती आहे का? तुमच्यावर किती खर्च होतोय तुमच्याकडे तर सगळी अगदी फायस्टार सर्व्हिस आहे आणि तिथे लोकांना तिष्ठत उभे राहावे लागते. लोकांना १० वेळा सांगावे लागते. अशा गोष्टी होता कामा नये. याबाबत काळजी घ्या. डॉक्टर साहेबांनी जी सुचना केली ते किती मोठे डॉक्टर आहेत त्याची तुम्हाला कल्पना आहे का? रोज तीन ते चार ऑपरेशन असतात त्यांना डोळ्याचे आणि अशी व्यक्ती तातडीने बोलत असते, सांगत असते. शहराच्या हितामध्ये बोलतात. मग हे जे सॉफ्टवेअर सगळीकडे आहे. ही सगळी तज्ञ मंडळी आहे. हे कोणी मुर्ख वेडे नाही. हे सगळे धनाढ्य आहेत. काही विशिष्ट प्रांतामध्ये आपली आपली स्वतःची फार मोठी एक इमेज बनून आहे त्यांना काही कळत नाही असे कर्मचाऱ्यांना ही वाटू नये आणि तुम्ही ही समजुन घेउ नका. त्याच्यामुळे जर अशा काही गोष्टी असतील तर ज्याच्या मागे महापालिकेचा कायदा होत असेल आता तुम्ही ही कमीटमेंट घेउन जा की, ह्या सभागृहाचा आदेश घेउन जा की, अतिक्रमणचा श्री. निशांत जाधव निलंबित झाला तर त्याला आमचे श्री. राठोड असे चार पाच जण आहेत. त्यांना बोलवा आणि त्यांना सांगा तुमच्या परिसरामध्ये कुठे कुठे बांधकाम आहेत. त्याच्यासाठी काय सॉफ्टवेअर डेव्हलप केले आहे. काय आहे? कुठची साईड घ्यायची आहे ते तुम्ही घ्या. त्याचा फायदा या शहरातील लोकांना होउ द्या. शहरातील लोकांपर्यंत आपल्याकडून गेले पाहिजे एक वेबसाईड आपली पण पाहिजे, किती काम इललिगल आहेत, शहरात नवीन बांधकाम आहे. घर घ्यायची असतील फ्लॅट घ्यायचे असेल, दुकान घ्यायची असतील त्यांना ही माहिती

उपलब्ध होईल. आज हा सभागृहाचा एक निर्णय आहे असे समजुन तुम्ही जा. त्या विषयाची अधिकची माहिती तुम्ही आमचे विद्वान महापौर साहेब आहेत त्यांच्याकडून घ्या. खतगांवकर साहेब, अशी तज्ञ मंडळी बरीच आहेत. त्यांच्याकडून घ्या. परंतु, तुमच्या गुणवत्तेचा उपयोग या शहरासाठी काहीतरी झाला पाहिजे. या महानगरपालिकेसाठी झाला पाहिजे असे करा.

**सिमा मिश्रा :-**

साहेब, मी ह्याची काळजी घेईन.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम, आपली वेबसाईड कधीपर्यंत होणार आहे?

**सिमा मिश्रा :-**

वेबसाईड इज पेंडींग फॉर अ हार्डवेअर फायरवॉल लास्टईअर.

**चंद्रकांत वैती :-**

ई टेंडरींग कसे करता येईल तेही आपण बघा.

**सिमा मिश्रा :-**

साहेब, वेबसाईडचा नेक्स्ट पेज म्हणजे ई टेंडरींग आहे. वेबसाईड झाल्यानंतर ते तुम्हाला मिळेल.

**जुबेर इनामदार :-**

आचार संहिता लागली की, स्थायी समितीसुद्धा लागणार नाही. म्हणजे असे चालत राहणार. वेबसाईड जर झाले तर बाकीचे सर्व काम ईझीली होते. त्यांना सेंटर लाईज अतिक्रमणबाबत माहिती पाहिजे. त्यांना कुठली माहिती पाहिजे ही वेबसाईडवरूनच मिळेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर साहेब, या टॅक्स डिपार्टमेंटचा केवढा मोठा घोटाळा आहे. ते बघा. हायवे पट्ट्याला एवढ्या मोठमोठ्या इंडस्ट्रीज आहेत. सगळ्या इंडस्ट्रीज रेन डाउन केलेले आहे. आणि ती सगळी रेन्ट भरतात व त्या रेन्टचे रेटेबल व्हॅल्यु रेन्टच्या बेसीसवर घेउन टॅक्सेशन करायला पाहिजे. त्या सगळ्या टॅक्सवाल्या लोकांनी ॲडजेस्टमेंट करून त्यांना त्या जमिनीच्या वर तो टॅक्स लावला. हे सगळे मुर्ख नगरसेवक आम्हीच आहोत. म्हणून २-४ कोटी वाढवतो. डिमांड आम्ही जर ५० कोटी रूपये वाढवले तर तुम्हाला कामाला पण लावू शकतो एवढे तुम्हाला खात्रीपुर्वक सांगतो जेव्हा १० कोटी रू. मोकळ्या जागेच्या कराचे तुम्हाला टारगेट दिले तेव्हा तीन महिन्यामध्ये तुमच्याकडून १५ कोटी रू. वसुल केले तर नावाचा प्रफुल्ल पाटील नाही हे पण तुम्हाला सांगतो. कारण ह्या गोष्टी आम्ही केलेल्या आहेत आणि त्याची फक्त धारणा काय आहे की, महासभेमध्ये आला की ह्याला मॅनेज करा त्याला मॅनेज करा ह्याला सांगायचे की या विषयावर तु बोलू नको त्याला सांगायचे त्या विषयावर तु बोलू नको आणि सगळे फिक्टीशियस रेकॉर्ड बनवायचे. अगोदर बनवलेले सगळे ओरिजनल रेकॉर्डस बाजुला काढा. फिक्टीशियस रेकॉर्ड बनवा आणि टॅक्स कमी करायला येथे दुकान चालतात. टॅक्स वसुल करायला दुकान चालतच नाही. दिवसभरात किती लोक आले किती लोकांचा टॅक्स कमी करून दिला ते येथे जास्त चालते.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, पाटील साहेब जे बालले हायवेला १५ बाय ५० फुटाचे गाळे आहेत त्याला फक्त १०० फुटांचा टॅक्स मी दोन वेळा कम्प्लेंट केले आहे. त्याची हाईट जवळ जवळ २५-३० फुटाची आहे. ५०-५० फुटाचे लांबीचे गाळे आहेत. वैती साहेब हे तर बघा, १००,१५० फुटाचे आहे. त्याला टॅक्स आहे आणि हे आतुन आतुन सगळ काम करतात. तुम्ही ह्याच्यातले त्यांच्या पावत्या तर खोलून बघा. काय काम करतात आपली लोक किती आपला टॅक्स वाढला पाहिजे या गोष्टीकडे कोणी अजिबात लक्षच देत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आता प्रफुल्ल पाटील साहेबांनी व्याजाचे सांगितले....

**मिलन पाटील :-**

साहेब, तुम्ही आता त्याला बोला अगर जर माझ्या नजरेमध्ये या पावत्या आल्या मी कधी सुद्धा रेट घालेन. तर तुम्ही बघा, किती पावत्या त्या वाढतील. तुम्ही आताच त्यांना इंन्स्ट्रक्शन देउन ठेवा. आठ दिवसात कधीपण तेथे जावून चेक करेन.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्री. खतगावकर साहेब, जसे व्याजाचे सांगितले जन्म मृत्यु नोंद. हे जन्म झालेल्याने १० वर्षापुर्वी दाखला घेउन गेलेला आहे. नाव बरोबर, ओमप्रकाश अग्रवाल म्हणून मराठीत त्यावेळेला दाखले दिले जात होते. आता मराठीमध्ये ओमप्रकाश अग्रवाल लिहिले त्या ओमप्रकाश अग्रवालची स्पेलिंग चेंज केली आम्ही बोललो आम्ही ओमप्रकाश आहोत. हे व्हेरिफाय करून देतो. ओमप्रकाश अग्रवालचा माझा आयडेन्टी कार्ड आहे तर जन्म मृत्युच्या उपायुक्तांकडे जा. तिथे करेक्शन करून आणा. अन्यथा १५० रू. चा ॲफिडेव्हीट आणा. म्हणजे तुमच्या सॉफ्टवेअरने चुकी करायची आणि १५० रू. चा ॲफिडेव्हीट आम्ही करायचे ही पद्धत चालली आहे. लोक अक्षरक्षः हैराण झालेले आहेत. अग्रवाल AGRA आणि AGAR असे दोन्ही अग्रवाल आहे.

मराठीमध्ये पण अग्रवालमध्ये ग च्या मध्ये मात्रा असते तेव्हा अगरवाल तुम्ही केले आहे. तर नाही, आमची मिस्टेक नाही ॲफिडेव्हीट करून आणा म्हणजे आख्खा सी.एफ.सी. मुळे भाईंदरचा नागरिक एकदम अपसेट झालेला आहे. म्हणजे तुमची चुकी सी.एफ.सी. ची चुकी आणि १५० पावणे दोनशे चा ॲफिडेव्हीट करून आणायचे आणि करून देत नाही ही परिस्थिती चालली आहे. मॅडमला विचारा मी तीनदा आलो तीन प्रकरण घेउन. हे कोणी सुधरवायचे? म्हणजे प्रत्येकवेळी नगरसेवकाने हात जोडायचे कारण तापडीया आहे. हे तुमच्या मिस्टेकमुळे कापडीया झालेले आहे. तर नाही, नाही तुम्ही १५० रू. चा ॲफिडेव्हीट करून आणा. किती वेळा आम्ही ही गोष्ट करायची.

**प्रफुल्ल पाटील :-**

नाहीतर, एन्ट्री नसेल तर मला असे वाटते की, सगळ्यात सोपी गोष्ट म्हणजे कोणीही जन्ममृत्युची नोंद करायची नाही. २०० रू. खिशात घेउन यायचे श्री. काळेच्या हातावर टेकवायचे ताबडतोब मिळेल. मग तो बाळ जन्मलेला असला, नसला तरी श्री. काळेचा दाखला आहे. माणूस मेला नसेल जिवंत असेल तर श्री. काळे दाखला देतो. फक्त २०० रू. पाहिजे. २०० रू. मध्ये जर तुम्हाला बाळ मिळत असेल आणि २०० रू. मध्ये मारून जर तुम्हाला प्रॉपर्टी हडप करायची असेल तर श्री. काळेसारखा तुम्हाला देव माणूस या जगात मिळणार नाही? किती सोप्या गोष्टी आहेत. तुमच्या पालिकेत आपण म्हणतो पालिका आपली काय देत नाही. जगामध्ये आपली पहिली पालिका आहे आणि दुसरे नगरसेवक गेले की, सांगणार ॲफिडेव्हीट करून आणा.

**मा. महापौर :-**

पे ॲन्ड पार्क २५ लाख रू.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पे ॲन्ड पार्कमध्ये दोन साईड आपण डेव्हलप करतोय.

**शशिकांत भोईर :-**

आता जो ठेका दिला आहे तो किती लाख रू. चे त्याचे उत्पन्न आहे. आता सध्या ठेका दिलेला आहे व आपण डेव्हलप करणार ते नंतर.....

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

फक्त एक साईड सध्या वापरात आहे. दोन साईड आहेत. एक रेल्वे उड्डाण ब्रीजखाली भाईंदर (पुर्व) रेल्वे ट्रक लगतचा रस्ता आणि दुसरी मिरा रोड रेल्वे स्टेशनजवळ आरक्षण क्र. १८४ या दोन फक्त उत्पन्नाच्या सध्या चालू आहेत. उर्वरित त्याच्यामध्ये आता आपण अजुन चार केलेले आहेत. मिरा रोड, शांती नगर, शॉपिंग सेंटर, रिक्षा स्टँड ते मच्छीमार्केट नाका, पुनम सागर रोड (पुर्व) गटाराच्या स्लॅबवर आणि दुसर शांती सागर हॉटेलच्या उजव्या बाजुच्या रोडवर मिरा रोड स्टेशन शांती सागर हॉटेलच्या बाजुने जेसल पार्क शिवसेना कार्यालयाच्या मागून रेल्वे ट्रक बाजुने चौपाटीकडे जाणाऱ्या रोडवर भाईंदर पुर्व.

**एस. ए. खान :-**

उड्डाण पुलाच्या खाली आपले जे नवीन रेशन ऑफिस झाले आहे तिथे ती लोक पैसे देत नाही. ते बोलतात, रेशन ऑफिसवाले हैराण करत आहे आणि आम्ही आले की......

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याचे आपण आता टेंडर काढतोय.

**शशिकांत भोईर :-**

भाईंदर पुर्व व पश्चिम ठेका दिलेला आहे. परत उड्डाण पुलाच्या खाली व मिरा रोडला दिलेला आहे. त्याचे उत्पन्न सध्या किती आहे ते आम्हाला दाखवा.

**एस. ए. खान :-**

त्याने डिसप्युटेड ठिकाणी सगळे केलेले आहे. त्याला अर्थच नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मिरा रोड रेल्वे स्टेशन आरक्षण १८४, १५ लक्ष ५५ हजाराचे उत्पन्न आहे आणि आता तो ठेका आपण नव्याने दिलेला आहे. रेल्वे उड्डाण ब्रीजखाली ५ लाख ५५ हजार रू. आणि १५ तर आता नव्याने ह्या आर्थिक वर्षात येणार आहे. ५ लाख ५५ हजाराची आपली वसुली आहे.

**शशिकांत भोईर :-**

सन २००८-०९ साठी दिलेले आहे. ठेका अजुन त्याचा किती महिन्यासाठी शिल्लक आहे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

दोन्हींचाही एक वर्षाचा कालावधी आहे. रेल्वे उड्डाण ब्रीजखालचा फक्त १ जानेवारीपर्यंतची त्याची मुदत आहे. ५ लाख ५५ हजाराचा जो ठेका आहे रेल्वे उड्डाण ब्रीजखाली भाईंदर पुर्व, रेल्वे ट्रक लगत.

**शशिकांत भोईर :-**

माझ्या माहितीप्रमाणे लवकर दिलेले आहे. ही चुकीची माहिती आहे.

**मनोहर म्हात्रे :-**

नविन दिले आहेत ते आता आपण चालु केले आहे. या नोव्हेंबरपासुन त्यांना एक वर्षाचा आपण कालावधी दिलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

माझा प्रश्न आहे की, किती महिने शिल्लक राहिले? आपण जे ठेके दिले आहेत ते किती लोकांना दिलेले आहेत. आणि त्याचे किती महिने शिल्लक राहिले आहेत?

**मनोहर म्हात्रे :-**

जवळ पुर्ण वर्षाचे येणा-या १० व्या महिन्यामध्ये

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण ठेका जेव्हा काढतात जेव्हा निविदा काढल्या ते आपणा सहा महिने अगोदर काढले की काय?

**मनोहर म्हात्रे :-**

नंतर काढले आपल्याला लेट झाले.

**प्रेमनाथ पाटील :-**

कोणत्या महिन्यात निविदा काढल्या ते दाखवा.

**मनोहर म्हात्रे :-**

सप्टेंबर महिन्यामध्ये काढले. त्यावेळी मध्ये इलेक्शन लागले व आचार संहितेमुळे लेट झाले. कोर्टामध्ये दावा गेल्या काही गोष्टी लेट झाल्या होत्या आणि आपण ते नोव्हेंबरला दिले आहे. पहिल्या आठवड्यामध्ये दिलेले आहे व त्याने पहिला हफ्ता भरलेला आहे. हे संपुर्ण येणाऱ्या वर्षाकरिता आहे. मागिल दोन साईडचे उत्पन्न फक्त ५ लाख रू. होते. ५ वर्षाकरिता.

**शशिकांत भोईर :-**

आता आपण ठेक्याने भाड्याने किती साईड दिलेले आहे.

**मनोहर म्हात्रे :-**

६ दिलेले आहे. त्यापैकी २ चालू आहे. त्यात डिस्प्युट आहे.

**शशिकांत भोईर :-**

डिस्प्युटचे कारण काय?

**मनोहर म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये आपल्याला काही काम करायची आहेत. मिरा रोडला शांती स्वरूप आहे तिथे गटारावर स्लॅब टाकायचा आहे आणि तिथे एका मालकाने हरकत घेतलेली आहे आणि आपण निर्णय घेतला होता की, ह्या जागा आपल्या मालकीच्या आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्या मालकीच्या असतांना हरकत कशी घेतली? आपण तिथे आरक्षण.....

**मनोहर म्हात्रे :-**

काही ठिकाणी स्लॅब टाकायचे आहे ती काम थांबलेली आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

म्हणजे आपल्याला सध्या २० लाख रू. होतात. हे नक्की आहे. आता आपण येथे २५ लाख रू. चे उत्पन्न दाखवले आहे. अजुन ४ साईड झाले तर किती लाख रू. होईल?

**मनोहर म्हात्रे :-**

३० लाख रू.

**प्रेमनाथ पाटील :-**

मग आपण २५ लाख रू. ह्याचे उत्पन्न दखवलेले आहे.

**मनोहर म्हात्रे :-**

परफेक्ट पकडून

**प्रेमनाथ पाटील :-**

मग इथे आपण २५ लाख रू. दाखवलेले आहे.

**मनोहर म्हात्रे :-**

एकूण सहा साईड चालू आहेत. त्यातुन एकूण आपल्याला एवढे मिळते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यापैकी ४ मध्ये वाद आहे.

**शशिकांत भोईर :-**

वाद आहे आणि आपण बोलता की, आपल्या मालकीची जागा आहे. मग आपण आरक्षण कायम का करत नाही. त्याला कुंपण घालून घ्या किंवा ज्याला त्या जागेचा टी.डी.आर. दिला असेल मग त्याच्याकडून आपण हस्तांतर करून घ्या. आपल्या नावावर उतारा करून घ्या.

**मनोहर म्हात्रे :-**

प्रोसिजर चालू आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आता सकाळपासुन एवढी मिटींग चालली आहे. सदस्याने प्रश्न विचारला की, वरचे अधिकारी पापड लाटायला लागतात. काय काम चालले आहे तर पापड लाटायचे? कधीपासुन पे ॲन्ड पार्कची माहिती विचारतोय सगळी उलटी पालटी बातमी मिळतेय. स्पष्ट बोला सहा साईड कुठे आहेत. नाव सांगा.

**मनोहर म्हात्रे :-**

१) मिरा रोड स्टेशन आरक्षण १८४ २) मिरा रोड शांती स्टार शॉपिंग सेंटर रिक्षा स्टँड ते मच्छी मार्केट नाका पुनम सागर रोड. रिक्षा स्टँड आहे तिथे त्याच बाजुला शॉपिंग सेंटरच्या बाजुला ३) शांती सागर हॉटेलच्या बाजुला म्हणजे शॉपिंग सेंटर आहे त्याच्या दोन्ही बाजुला ४) जेसल पार्क शिवसेना कार्यालयाच्या पाठीमागे ५) एस टी स्टँड ते मच्छी मार्केट जय अंबे झोपडपट्टी ६) ब्रिजखाली त्या ब्रिजखाली पुलिंग चालू आहे आणि मिरा रोडला स्टेशन आहे तिथपर्यंत चालू होते.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुमच्या ६ साईड आहेत. त्या ६ साईडवर किती लोकांची टेंडर काढली?

**मनोहर म्हात्रे :-**

६ साईड काढले.

**प्रफुल्ल पाटील :-**

कसे टेंडर काढले जर तुमच्या त्या जागा चालू नाही किंवा त्या चालू करू शकत नाही मग तुम्ही ६ ची टेंडर काढली कशी? आणि तेच उलट असते एखाद्याने टेंडर घेतले असते महानगरपालिकेला पैसे मिळायचे नसतील त्याला मिळायचे असतील तर तुम्ही लोकांनी ते पुढे केले असते. ते महानगरपालिकेला पैसे मिळायचे आहेत. मग ते टेंडर मरू दे, झक मारू दे त्याला तो अनऑफिशिअली काय पैसे वसुल करायचे आहे ते त्याला करू दे. तुम्ही काय खतवणार नाही ते पैसे चार बंद दाखवून कोणाला टेंडर दिले, कितीची टेंडर दिले ते सांगा. टोटल ६ ची टेंडर किती झाली.

**मनोहर म्हात्रे :-**

एस. ए. इन्टरप्रायझेस आहे त्याने ते टेंडर घेतले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

टोटल कितीची झाली?

**मनोहर म्हात्रे :-**

६ लोकांची ३० लाख २२ हजार रू. होतात. ६ चा ठेका चालू झाला तर ३० लाख २२ हजार रू. मिळणार आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग तुम्ही टेंडर काढलेले ते असे का त्याने टेंडर घ्यायचे पैसे बुडवायचे आणि काशी यात्रा करत बसायचे का? असे टेंडर काढले होते? तुम्ही त्याची सिक्युरिटी डिपॉझिट घेतली नव्हती? त्याची सिक्युरिटी डिपॉझिट बुडवली आहे? त्याच्यावर क्रिमीनल केस फाईल केले आहे? उत्तर द्या नाहीतर ह्यांच्यावर क्रिमीनल केस फाईल करा.

**प्रभात पाटील :-**

आता हे सांगणार की, त्याच्यामध्ये टर्म ॲन्ड कंडीशन तशा घातल्या नव्हत्या. ते घातलच नाही. ज्याच्यामध्ये महापालिकेचा फायदा होईल अशी कोणतीही टर्म ॲन्ड कंडीशन नसते.

**शशिकांत भोईर :-**

ह्याच्यामध्ये गुड आणखिन की, एकाला ५ वर्षासाठी ५ लाखाला दिलेले आणि आपल्याला एका वर्षासाठी आपल्याला २५ लाख रू. मिळतात.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मिरारोड रेल्वे स्टेशनची साईडचे टेंडर फायनल केलेले आहे त्याच्यात १५ लाख ५५ हजार रू. इनकम आहे आणि ब्रीजखाली आहे त्याचे ५ लाख ५५ हजार रू आहे. त्याशिवाय त्यांचे जे ४ साईड आहेत त्याचे गटारावर स्लॅब आहे. १) मिरा रोड शांती स्टार शॉपिंग सेंटरच्या ठिकाणी ते प्रस्तावित आहे. त्यांनी ह्या लॉटमध्ये टेंडर काढून ठेवलेले आहे आणि तो २ लाख रू. ला गेलेला आहे आणि शांती सागर हॉटेलच्या बाजुला तो डिस्प्युटेड प्वॉईंट आहे तो २ लाख रू. ला दिलेला आहे आणि जेसलपार्क शिवसेना कार्यालयाच्या बाजुने तोही गटारावर स्लॅब आहे. काम पुर्ण झालेले नाही. ते २ लाख ५५ हजार रू. ला वार्षिक गेलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

जेसलपार्कच्या येथे स्लॅब आहे. पुर्ण आहे. कुठले बाकी आहे?

**चंद्रकांत मोदी :-**

मिरा रोड मे भी स्लॅब हो गया है।

**प्रफुल्ल पाटील :-**

हे कधीपासुन बाकी आहे?

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील हे नगराध्यक्ष असतांना झाल्या पासुन हे काम झालेले आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

३ साल से स्लॅब हो गया है।

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्याच्यासमोर त्यांनी बंद म्हणून लिहिले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तो ती जागा का घेत नाही. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांच्या ऑफिसच्या मागे पे ॲन्ड पार्क आहे ते बंद करा तर तो जागा घेतो नाहीतर घेत नाही अशी एक कंडीशन आहे. कारण सर्व तिथे वाहन लावतात. त्याला वाहन मिळत नाही म्हणून तो त्याचा ताबा घेत नाही. ताबा न घेण्याचे कारण हे आहे. दुसरे काही कारण नाही आणि तो दोनदा साहेबांकडे आला होता त्यानें सांगितले ते बंद करा तरच मी ती जागा ताब्यात घेतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आणि कामाच्या ठिकाणी ती एकच एजन्सी आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

एकच एजन्सी आहे तर त्याला तुम्ही आणायला पाहिजे. त्याचे सिक्युरिटी पैसे वगैरे भरले नव्हते का? त्याने टेंडर एक्सेप्ट केल्यानंतर तुम्हाला काय लेखी कळविले का? तो तिथे पैसे पण वसुल करत असेल. तुम्ही आम्ही कोण तिथे बघायला गेले आहेत.

**चंद्रकांत वैती :-**

सभागृहाला माहिती देतो, मिरा रोडचा जो ठेका आहे. रिझर्व्हेशन नंबर १८४ त्याच्यामध्ये ऑलरेडी आपण वसुल करतोय पण स्टेशनचा पॅरेलाल रोड आहे तो शांती स्टार शॉपिंग सेंटरच्या बाजुला ज्याठिकाणी गटारावर स्लॅब टाकला आहे त्याच्यावर पार्कींगचे पैसे घेतोय की ते आणि मला वाटते की, त्या एकाच ठेक्यातुन साधारण पणे २५ ते ३० लाख रू. त्या ठेकेदाराला मिळत असतील एवढ्या मोठ्या प्रमाणावर तो पार्कींगची वसुली करतो आणि हे करताना या शहरामध्ये वाहन विकणारी मंडळी आहेत. ज्यांची २५-२५, ५०-५० वाहन एकाच वेळेला पार्क असतात त्याठिकाणी पे ॲन्ड पार्क घोषित करा व त्यांच्याकडून पैसे वसुल करून घ्या. या शहरामध्ये जेवढे २५-३० ठिकाणी वाहन विकण्याची दुकान आहेत. आपले संपुर्ण रस्ते व्यापुन टाकलेले असतात आणि गॅरेज त्यांच्याकडून तुम्ही पे ॲन्ड पार्क घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, तो जो पे ॲन्ड पार्क चालवतोय या स्टेशनच्या सॉल्ट डिपार्टमेंटच्या मागे ती कोणाची खाजगी जागा आहे? ज्यांची मालमत्ता आहे त्यांच्या कडून आपण काय टॅक्स आकारणी करतो का? विचारा. कारण तो साहेबांकडे तीनदा आला. पे ॲन्ड पार्क बंद करा मी हे ताब्यात घेत आहे. त्याच्याकडून पैसा मिळत नाही. आणि तो लाखो रूपये कमवतो तो ठेकेदार कोण आहे त्याचे नाव सांगा तुम्ही तिथे कधी गेला होता? त्या ठेकेदाराचे नाव काय आहे?

**मनोहर म्हात्रे :-**

होय.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्या ठेकेदाराचे नाव काय आहे?

**मनोहर म्हात्रे :-**

ते सर्व अनधिकृत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तर तो तिथे जागा वापरतोय. कोणाची प्रायव्हेट असेल त्याला टॅक्स लागेल. त्या टॅक्सच्या जागेची तुम्ही कधी आकारणी केली आहे का? तो ठेकेदार कोण आहे?

**मनोहर म्हात्रे :-**

सॉल्ट डिपार्टमेंटने सांगितले की, ती जागा इललिगल आहे. पण ती त्याच्या मालकी हक्कामध्ये आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मालकी हक्कामध्ये आहे. तरी त्याला आपला दुसरा टॅक्स लागत नाही का? जसे रोड टॅक्स आहे किंवा प्रॉपर्टी टॅक्स आहे. कुठलाही टॅक्स नाही. ते ती जागा वापरतो ना? त्याची जागा आहे. खाजगी जागा आहे. पण बाकीचा टॅक्स आहे त्या जागेचा टॅक्स आहे. मोकळी जागेचा टॅक्स आहे किंवा कर आकारणी तर त्याच्याकडे काहीच नाही का? आजपर्यंत कोणीही कार्यवाही केली नाही का? आणि हे पैसे पण बुडाले महापौर साहेब, जेसल पार्क पोलिस स्टेशनच्यात तो काढण्यात यावा. कारण हा पे ॲण्ड पार्क चालतो म्हणून तो

ताब्यात घेत नाही. बाकी दुसरे काही कारण नाही. खतगांवकर साहेब, त्या पे ॲण्ड पार्कची जेवढ्या पैशांची अनामत टेंडर गेले त्याची वसुली त्या ठेकेदाराकडून होत नाही तर त्या अधिकाऱ्यांकडून केली पाहिजे आज जसे प्रफुल्ल पाटील साहेबांनी बोलले त्यांना खरोखर चोपले पाहिजे हे २ लाख आणि किती रूपये आहेत ते ही त्यांच्याकडून वसुल केले पाहिजे. सभागृहामध्ये आज बोलले पाहिजे, माईक पकडण्याची कोणी अधिकाऱ्यांची हिम्मत नाही. ते दोन अडीच लाख रू. कोण देणार त्याचा आपण आता फैसला करा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पे ॲन्ड पार्कबद्दल सर्व फाईली घेउन तपासणी करून निश्‍चित त्याच्यात जास्तीचा उत्पन्न कसा वाढेल याच्यावर आम्ही निश्‍चित कार्यवाही करू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आयुक्त साहेब, हे पे ॲन्ड पार्कचे टेंडर काढत नव्हते. आम्ही बोललो की, जे दोन लिगल आहे त्याचे टेंडर काढा. मुदतवाढ १५-१५ दिवसाची मुदतवाढ.

**शरद पाटील :-**

साहेब, गेल्या वेळेच्या स्थायी समितीमध्ये या ६ जागेचा वादग्रस्त जागा ४ असताना २ जागा क्लिअर असताना त्याचे टेंडर काढत नव्हते त्यांना १५-१५ दिवसाची मुदतवाढ देत होते आणि त्यावेळेला आम्ही बोललो ४ वादग्रस्त जागा सोडून बाकी २ ची टेंडर काढा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यावेळी कोणीही काढले नाही.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, नो पार्कींगचा त्यावेळी ठेका काढला होता त्या नो पार्किंगच्या किती साईड आहेत?

**मा. महापौर :-**

पार्कींगवर आपण जेवढी निविदा कॉल केली आहे व ज्या जागा.....

**शरद पाटील :-**

बजेटची मिटींग चालू आहे आणि अधिकारी नाही. प्रफुल्ल पाटील साहेबांनी सकाळीच सांगितलेले सगळे अधिकारी आहेत का?

**जुबेर इनामदार :-**

पानपट्टे साहेब येत नाहीत तोपर्यंत हा विषय प्रलंबित ठेवा.

**प्रभात पाटील :-**

मिटींग झालीच नाही पाहिजे, एक अधिकारी आहे?

**मा. महापौर :-**

ज्या जागेच्या निविदा काढलेल्या आहेत. जागेवर जागा रिकामी आहे त्यांनी कुठल्या कारणासाठी पार्कींग केले नसेल तरी ज्या तारखेला निविदा काढली त्या तारखेपासुन पैसे वसुल करायला पाहिजे आणि दुसरी गोष्ट, ऑलरेडी त्याचा आपल्याकडे दुसरे टेंडर दिलेले आहे ती अनामत रक्कम असेल, हे असेल ते दोन्ही आपण त्यांचे जप्त करा. एखाद्या जागेचा प्रॉब्लेम असेल तर ठिक आहे. पण जेसलपार्कला कुठल्याही जागेचा प्रॉब्लेम नाही आहे आणि बाकी तीन ठिकाणी आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, त्याचा मालक कोण आहे? ज्याची अनधिकृत जमिन आहे. कोण तो पे ॲन्ड पार्क चालवतो.

**मा. महापौर :-**

कोणीही असु द्या.

**भगवती शर्मा :-**

त्याच्यावर तुम्ही केस लावा.

**मुसर्रत बानू :-**

मा. महापौर साहेब, उड्डाण पुल के निचे जो ठेका है वह रद्द कीया जाए क्योंकी वहा के पब्लिक के लिये बहुत प्रॉब्लेम क्रिएट्स हो रहे है। वहा शराब पीने और अश्लिल हरकते बहुत होती है। क्लिनअर्स और ड्रायव्हर्स की, लेडीज की खास करके मांग है। अगर आप उसपर ध्यान दे तो ज्यादा बेहतर होगा।

**एस. ए. खान :-**

तिथे मोठ मोठे ट्रक उभे राहतात. ते ड्रिंक वगैरे करतात आणि गाडीची रेस करतात. दोन्ही बाजुला गीता नगरचे फेस - ७ चे रेसिडेन्शीअल कॉम्पलेक्स आहे. त्या लोकांची तक्रार आहे म्हणून ते ठेका रद्द करण्यात यावा. गीता नगर फेस - ७ च्या उड्डाण पुलाच्या खाली.

**मुसर्रत बानू :-**

और जो टेम्पो खडे रहते है, सर्कल के पाससे उनको हटाने की कोशीश किजीए।

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, मिरा रोड पुनम सागर के सामने बस और ट्रक खडी रहती है। कन्टीन्युअस स्कुल बस।

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, बजेटची मिटींग आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

भाईंदर पश्चिमेच्या जागेचा वाद काय आहे ते आम्हाला सांगा.

**मा. महापौर :-**

स्लॅब टाकायचे बाकी आहे असे सांगातात.

**उमा सपार :-**

मा. महापौर साहेब, मेडतीया नगरच्या कॉर्नरला सगळे टेम्पो उभे राहतात आज लोढा कॉम्प्लेक्स, नया नगरला जायला पुढची गाडी आली की नाही ते दिसत नाही तिथे गाड्या उभ्या करू नका.

**चंद्रकांत मोदी :-**

खतगांवकर साहेब आप जरा नोट किजिए, स्कुल की बस और ट्रक १०० फुट रोडपर कन्टीन्युअस खडा रहता है।

**मिलन पाटील :-**

खतगांवकर साहेब, आपण मनोहर म्हात्रे ह्यांना प्रश्न विचारतोय पण त्यांच्याकडे ते डिपार्टमेंट आहे का?

**जुबेर इनामदार :-**

साहेब, या विभागाचे प्रमुख श्री. पानपट्टे साहेब कुठे आहेत?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

श्री. पानपट्टे साहेब, तातडीने दुपारी रजेवर गेलेले आहेत आणि महापौर साहेबांची परवानगी घेउन ते गेलेले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

ते नाही आहेत तर विषय प्रलंबित ठेवा.

**प्रफुल्ल पाटील :-**

भाईंदर पश्चिमेला कुठल्या जागेच्या मालकीचा डिस्प्युट आहे?

**मनोहर म्हात्रे :-**

आगरामध्ये सॉल्ट डिपार्टमेंटचे ऑफिस त्याच्याबरोबर समोर श्री. हेमंत शाह यांचे आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही का त्यांच्या जागेमध्ये करता की, रस्त्यावर गाड्या उभ्या करता.

**मनोहर म्हात्रे :-**

मच्छी मार्केट भरते....

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, या विभागाचे प्रमुख जागेवर नाही आपण हा विषय प्रलंबित ठेवा. श्री. पानपट्टे साहेब असतील तेव्हा चर्चा करू. आज काय विषय संपत नाही. त्यांना माहिती नव्हती का? त्यांनी अस घोळ घातलेला आहे त्यांना सांगा उपस्थित राहायला.

**मर्लिन डिसा :-**

मिरा भाईंदर रोड पे एस. के. स्टोन पुलिस चौकी टु गिता आर्केड १५ से २० आउट स्टेशन जानेवाली बसेस डेली वहापर खडे रहती है। ॲन्ड गीता आर्केड रेसिडेन्स की कम्प्लेंट है की, वहापर जो ड्रायव्हर्स है, क्लिनर्स है, लेट इन दि नाईट वह शराब वगैरे पिते रहते है ॲन्ड प्लस वहापर वह खुले मे स्नान करते है। वहॉपर मुव्हेबल टॉयलेट भी रखा हुआ है और उसमे लॉट ऑफ रॉंग ॲक्टीव्हीटीज आर गोईंग ऑन. प्लिझ वहापर पार्कींग का स्ट्रीक्ट ऑर्डर निकालिए की, देअर शुल्ड बी नो पार्किंग दॅट साईड.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, महानगरपालिका जो मुव्हेबल टॉयलेट है वह एस.के. स्टोन के यहापर कम से कम दो साल से पडा है। सड गया है। उसका उपयोग करे। अभी उसको जल्द से जल्द उठा लिजिए।

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, नो पार्कींगचा जो ठेका निघालेला आहे त्याचे काय झाले? नो पार्कींगच्या साईड कोणत्या? त्याचा ठेका चालू आहे का, बंद आहे.

**मा. महापौर :-**

त्या विषयावर आपण नंतर बोलू.

**प्रकाश दुबोले :-**

पण साहेब, नो पार्कींग ह्याच्यामध्ये नाही त्याचा हेड कुठे आहे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

बाजार लिलावामध्ये येईल. नो पार्कींगमध्ये जातच नाही.

**प्रकाश दुबोले :-**

आपण नो पार्कींगमध्ये पैसे वसुल करतोय. तर ते आपण कुठल्या हेडला घेणार.

**मा. महापौर :-**

नो पार्कींग मे पार्कींग किया तो गाडी उठाने का।

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, नो पार्कींगला ठेका दिला होता. त्याचा हेड कुठे आहे? बाजाराच्या हेडमध्ये येते का?

**मा. महापौर :-**

तो हेड आपण क्रिएट करू.

**प्रफुल्ल पाटील :-**

मला आता एक गोष्ट आठवली, कधी कधी असे इतिहासातील गोष्टी आठवतात, या सभागृहाने असा एकदा निर्णय केला होता की, मिरा भाईंदरचा प्रवेश द्वारावर मुंबईच्या सर्व कापड गिरण्या बंद केल्या की, त्यांची जी धुरांडी येतात, ती धुरांडी स्लॅबमध्ये घेउन त्याच्या बाजुने एक मोठे धुरांडेचे गेट बनवून ठेवले आहे. या मिरा भाईंदर शहरात चाललोय की त्या गिरणी कामगार जे बेघर झाले ते भाईंदर मध्ये चाललोय गिरण गावात चाललोय असे तिथे गेटवर आल्यावर वाटते. आपले सर्वांचे असे ठरले होते की, त्या एस्सलवर्ल्ड साठी तुम्ही एवढे मोठे कशाला करून ठेवले तो पण गोईंगकास्ट. पण असे की, तुम्ही एवढा मोठा प्रवेशद्वार फालतु तिथे काय करून ठेवले आहे. म्हणजे ते गेल्यानंतर आपण जे काम करतोय ते योग्य करतोय. बहुतेक ते गेट बघूनच आमची काम करण्याची वृत्ती अशी झाली आहे. कारण गेट घानेरडा असेल तर आतमध्ये माणस कशी काय चांगली असणार? ती घाणेरडीच असणार. कधीपासुन चालले आहे की, ते गेट काढून टाका. तेव्हा मा. महासभेमध्ये असे ठरले होते की, एक महिन्याच्या आत तो गेट काढून टाकू. त्याच्यावर भली मोठी जाहिरात आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे जे नाव आहे ते दुर्बिणीतुन बघायला लागते आणि त्याचे नाव डोळे फुटले तरी दिसतय. काहीतरी हवा या शहरामध्ये, या नगरसेवकांची नगरपालिका नाही. आम्ही पाच वर्षे ते लिव लायसन्सवर देतो. रिक्वेस्ट केली. तुम्ही आम्हाला एक महिनासुद्धा वाढवून देणार नाही. वर इलेक्शन कमिशनर आमचा एक महिना कमी करतो. पाच वर्षे जे लिव्ह लायसन्सवर येतो. परत पाच वर्षाने यायचे झाले तर नविन ॲग्रीमेंट करायला लागते. आणि तुम्ही तर कायमचे इकडे आहात. वर्षानुवर्षे तुम्ही इथे नोकऱ्या करणार धंदा करणार. तुम्ही तुमची गुडविल कमित कमी वाढवा. हे शहर कसे चांगले असेल. ज्या गोष्टी चांगल्या होत्या त्या मॅस करून टाकल्या पाणी पुरवठा चांगला येत होता त्याची वाट लावून टाकली. आत कुठे कोणाला पाणी मिळतेय तर कोणाला मिळत नाही. रोज फोन करा. श्री. बारकुंड साहेबांना तो प्रॉब्लेम आहे. तुम्हाला जर प्रॉब्लेम येणार आहे असे माहिती असतांना, माहिती असते का, नाही हा प्रॉब्लेम येणार आहे. भुकंप तर रिक्टर स्केल सारखा, या गोष्टी आम्हाला माहिती आहेत तर आम्ही पुर्वी पासुन का तयार करत नाही? म्हणजे ही पालिका १९८५ च्या काळात ज्या स्टेजला होती त्या पालिकेची परिस्थिती आज आहे. त्या स्टेजला आम्ही आहोत. फक्त मधल्या काळात आम्ही काय केले भरमसाट प्रमोशन दिली. कुठल्याही कर्मचाऱ्याला कुठलाही विषय असो मग तो मानधनाचा असो, बोनसचा असो, ट्रेनिंगचा असो, मेडीकल द्यायचे असो फार मोठ्या मनाने आमच्यामध्येच स्पर्धा लागलेली असते. चार हजार रू. बोनस करतो ह्या सगळ्या गोष्टीची लाज ठेवा. जाण नाही म्हणत, लाज ठेवा आणि जो लाज ठेवत नाही तो निर्लज्ज असतो. लाज ठेवा ही तुमच्या आयुष्याची कमाई आहे. तुम्ही सांगाल की, मी ह्या नगरपालिकेमधून रिटायर झालो. मी माझ्या कारकिर्दीमध्ये हे काम केले. नाहीतर, पे ॲन्ड पार्क लाव वाट. सगळी अशा परिस्थितीमध्ये ही पालिका चालली आहे. प्रशासनाने एवढे लक्षात घ्या की, हे बजेट आम्ही किती दिवसात मंजुर करायचे आहे हे ठरवणार आहोत. अजुन काही झालेले नाही. अजुन तरी मानसिक स्थिती कोणाचीच नाही पण ज्या अर्थी हे बजेट मंजुर करायला इतके दिवस जातील त्याअर्थी एवढे लक्ष ठेवा की, वर्षात ह्याच्यामध्ये कितीवेळा रिव्हीजन होतील. आम्ही स्वतः पुढाकार घेउन एकत्र येउन हे काम करू. तुम्ही कितीही आमच्यात फाटाफुट पाडण्याचा प्रयत्न जरी केला तरी आम्ही सगळे नगरसेवक एकत्र येउन हे काम करू आणि हे बजेट व्यवस्थित आम्ही आमच्यापरिने पार पाडू. पण मला अता तरी वाटते की, ज्या पद्धतीने वर लोक बसलेले आहेत. सकाळपासुन बसले आहेत त्यांना धन्यवाद द्यायला पाहिजे. त्यांनी आमच्यावर उपकार केले. पण जे लोक आले नाहीत त्यांनी तर अख्ख्या ह्या मिरा भाईंदर शहरावर उपकार केले आणि जे आले व मधे गले त्यांनी आम्हाला कर्ज देउन गेले. म्हणजे पुन्हा एकदा मिटींग घ्यायची, पुन्हा एकदा खर्च करायचा आणि पालिकेत येउन बोलायचे. सकाळी बोलले ते भुमीपुत्र नाही. बरोबर ते भुमिपुत्र बोलले. तशी परिस्थिती या येथे नगरसेवकाची आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, पे ॲन्ड पार्कच्या बाबतीत नाव सांगा की तो कोण आहे?

**मिलन म्हात्रे :-**

भाईंदर पश्चिमेला जे पार्किंगचे चालले आहे. म्हणजे पाहिले तर नगरपालिकेने ठेकेदाराबरोबर चिटींग केली. कारण माझ्या ऑफिसच्या समोरचे, सेंट्रल गर्व्हरमेंटच्या ऑफीसच्या बाहेरच्या पार्किगचा पट्टा त्याला दिला. पैसे वैगरे घेतले सगळे झाले बोर्ड लागला पार्किंगच्या वेहीकल लावायला लागल्या नंतर काय झाले हे माहित नाही. आपोआप ते पार्किंग बंद झाले नंतर तो काही काळ ठेकेदारच गायब झाला कुठे गेला काही कळायला मार्ग नाही. आता गेल्या ८-९ महिन्यापासुन भाईंदरमध्ये माझ्या ऑफीसच्या मागे नव्याने पार्किंगला सुरुवात झाली. श्री. हेमंत शाह ज्याचे त्या जागेशी काही संबध नाही सॉल्ट डिपार्टमेंटच्या जागेमध्ये गेल्या ८-९ महिन्यापासुन १ लाख रुपये प्रति वर्ष या भाड्याने ते पार्किंगसाठी दिले. आता ते वैद्य, अवैद्य काय ते मला माहित नाही पण मला एवढे माहित आहे की, पिटीशन नंबर उच्च न्यायालयातील हायकोर्टाच्या रिटपितीशन नंबर १२७ मध्ये त्याला कोर्ट रिसीव्हर लागलेला आहे. त्या कोर्ट रिसीव्हर मध्ये महानगरपालिका सुध्दा पार्टी आहे. श्री. हेमंत शाह सुध्दा पार्टी आहे. सगळे पार्टी आहेत सेंट्रल गर्व्हर्नमेंट सुध्दा आहे. असे असताना त्या ठिकाणी कमर्शीअल न्युज कोर्ट रिसिव्हरच्या परवानगी शीवाय आपल्याला न विचारता थर्ड पार्टी तीथे आणून त्याचा कमर्शीअलवर उद्योग चालू आहे. म्हणजे लाख रुपये तो वसुल करतो १० दिवस अगोदर श्री. पानपट्टे साहेबांना मी त्या साईटवर नेऊन दाखवले. अजुनपर्यंत कुढलाही निर्णय नाही. नवीन तुम्ही टेडर काढले त्याचे त्या ठेकेदारा कडुन पैसे पण घेतले असतील. महानगरपालिकेच्या मालकीचा नाला त्याच्यावर स्लॅब टाकायला महानगरपालिकेने सुरु केले परत ती व्यक्ती येऊन त्याचा काही संबध नसताना आपली ती जागा सॉल्ट डिपार्टमेंट कडुन आपण १९९२ साली ताब्यात घेतलेली आहे. ३२२० वाराची ती जागा आहे त्याच्या त्या ताब्यात घेतलेल्या जागेवर जो नाला गेला आहे त्या नाल्यावर स्लॅब टाकुन आपल्याला पार्किंग करायचे आहे ते माझ्या वॉर्ड मध्ये येते आज ते काम बंद होऊन १५ दिवस झाले. ठेकेदाराला त्याने शिवीगाळ करुन ते काम बंद केले आहे प्रशासन नावाची चीज कुठेही नाही. म्हणजे कुठेही कोणीही काम सुरु करायचे आपला ठेका द्यायचा कोणीही उठुन ते बंद करायचे आज तुम्ही त्या ठेकेदाराकडुन कुठल्या बेसवर अनामत रक्कम वगैरे घेता, बिझनेस कसा करता ते मी तुम्हाला विचारतो. कारण सातबारा वर आजच्या तारखेला कोणाचेही नाव नाही. केंद्र सरकारचे नाव आहे तुम्ही काय मानणार? सातबारा उतारा खरा मानणार तो तर राहीला बाजुला तुमच्याकडे तर ३२२० वाराची जागा ऑलरेडी तुमच्या ताब्यात आहे. सातबारा उता-यावर तशी इन्ट्री आहे. असे असताना गेल्या १५ दिवसापासुन काम थांबवलेले आहे तुमच्या ठेकेदाराचे नुकसान आहे. त्याला तुम्ही ते बांधकाम तयार करायला दिले आणी ह्या येथुन ह्या ठेकेदाराचेही नुकसान आहे. ज्याने तुमच्याकडुन ती बी.ओ.टी ची साईट पार्किंगची घेतलेली आहे पे ॲन्ड पार्कची. आज एवढा महत्वाचा विषय असुन प्रशासनाच्या कुढल्याही अधिकाऱ्याला तिथे जाऊन लक्ष द्यालया वेळ नाही. नगरसेवकाने काय करायचे? आम्ही जाऊन तिथे माऱ्यामाऱ्या करायच्या? तुमच्या अतिक्रमणच्या पथकाने जर त्या तीकडच्या ५० गाड्या त्याच्या उचलुन आणल्या असत्या तर झाले नसते का? आज कुढेतरी या विषयाला सुरुवात झाली असती. ज्या बिल्डर लोकांनी अनधिकृत बांधकाम करायची या भाईंदर मध्ये श्री. हेमंत शाह यांच्या स्वतःच्या ५-२५ बिल्डींग इललीगल आहे. आम्ही म्हणतो त्याला नोटीस काढा मी पत्र देतो. दोन-दोन वेळेला मागच्या वेळेला सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब हे नगराध्यक्ष असताना २००० साली १८ सीटच्या सुलभ सौचालयाचे भुमीपुजन झाले आजपर्यंत ते काम माझे होऊ शकलेले नाही आज त्या ठिकाणी महीलांची एवढी गैरसोय आहे. शेवटी महिलांकरीता फायबरच्या मुता-या मला बसवायला लागल्या. आज ते बांधकाम थांबुन जवळ-जवळ ८ वर्षे झाली आहे. विधी अधिका-याचे कुढलेही लक्ष नाही हायकोर्टाच्या, सुप्रिमकोर्टाच्या ऑर्डरपण त्याला आणून दिल्या आहेत. पण कुठेही कोर्टामध्ये तिथे मुव्हींग होत नाही. एकच आहे. एखाद्या बिल्डरवर आपले आधिकारी सगळे निर्भर आहेत. तो बिल्डर मात्र तुम्हाला कुठे एक्सक्युज करत नाही कुठेही माफी देत नाही इललीगल बांधकाम भरमसाठ करतोय. मी देतो उद्या पत्र. वाटल्यास तुम्ही मग एक्शन घ्यायला तयार होतो? अतिक्रमणाचा चार्ज तुमच्याकडे आहे मी देतो तुम्हाला कुठले पाहिजे ते पत्र. पण कुठेही नाक दाबल्या शिवाय काम होत नाही ह्याच बिल्डरचे श्री. शिवमुर्ती नाईक ह्यांनी एक शेड तोडल्या बरोबर एस.टी च्या आपली स्टार्टर रुमची जागा जवळ-जवळ १२ वर्षापासुन पेंडींग ठेवली आहे. कुठलेही काम करायला गेलो की, तीन कॉन्ट्रक्टर त्याने मारुन पळविले. पहिले त्याची शेड तोडल्या बरोबर आपल्याला त्याचे स्टार्टर रुमचे काम सुरु करुन आज एस.टी. वाले आणी परिवहनवाले ते वापरतात. तुम्ही कुठेतरी तुमची ताकद दाखविल्या शिवाय काहीही होणार नाही आणि सुदैवाने मी तीकडचा नगरसेवक आहे आणी तुम्हाला कॉपरेट करत आहे पण प्रशासन काहिही करायला तयार नाही श्री. पानपट्टे ह्यांना १०-१२ दिवस झाले साईटवर मी नेऊन दाखविले आहे आपले जेई श्री. रणदिवे सुध्दा आले होते. आता ह्याचा निर्णय तुम्ही घ्यायचा आहे. कारण बिझनेस तुम्ही करता डिपॉझीट तुम्ही घेतलेल्या आहेत पे ॲन्ड पार्कचे टेंडर तुम्ही काढले पैसे त्यांच्याकडुन तुम्ही घेणार त्यांच्यावर प्रशासन काय करते ते बघा, प्रशासन सुध्दा पे ॲन्ड पार्क सारखा सुस्ताड आहे का, ते बघायला लागेल ?

**मा. महापौर :-**

जाहिरात १ करोड रुपयाचे आहे ते १ करोड रुपयेच राहणार वाढणार नाही ऑलरेडी टेंडर झालेले आहे. अग्निशमन सेवा कर...

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, अग्निशमन कॅपीटेशन फी चे. . . . . .

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, बी अपार्टमेंटची माणसे तर बोलावून घ्या. तुमचा विषय चालू आहे अग्निशमनचा तुमचा कोणी नाही का ?

**भगवती शर्मा :-**

अधिकारी नसेल तर आम्हाला चर्चा करायची नाही.

**मा. महापौर :-**

आपण कॅपीटेशन फी बद्दल बोलत होता तर काय झाले ते बोला?

**मिलन पाटील :-**

सन २००६-०७, २ करोड २८ लाख रू. ते वसुल झालेले आहेत का? आणि सन २००७-०८, ४ कोटी ४३ लाख रू. ते वसुल झालेले आहेत का ?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

होय.

**मिलन पाटील :-**

जर हे वसुल झालेले आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

मग इथे १ करोड कसे?

**मिलन पाटील :-**

पहिल्या आठ महिन्याचे ५९ लाख ४ हजार रू. फक्त आहेत. एवढे प्लान संबंध आलेले आहे. आणि आपण त्यांना इष्टांक दिलेला आहे. राहिलेल्या ४ महिन्यांचा ५कोटी ४० लाख रू. हे एवढे चार महिन्यामध्ये होतील का? दुसरी गोष्ट त्यांना आपण इष्टांक ६ चा दिला. पुन्हा आयुक्तांचे ५०लाख रू. त्यावर व स्थायी समितीने १ कोटी रू. चे दिलेले आहे. म्हणजे हे ६ आणि ७ आणि हा......

**मा. महापौर:-**

६ करोड रू. मागच्या वर्षी आपण प्रोव्हीजन केले होते. त्यातले ६० लाख रू. वसुल झाले. बाकी ५ करोड ४० लाख रू. बाकी आहे. बाकी म्हणजे झालेच नाही. हे जे बाकी आहे त्याबद्दल आपण सांगूच शकत नाही. कारण परवाना आला तर आपण त्याला पैसे दिले. असे नाही की, त्या बिल पाठवायची आणि नंतर वसुल करायचे. हा तशातला भाग नाही. एखाद्या नवीन इमारतीला जेव्हा तो एनओसी साठी येईल रिट पिटीशन साठी त्यावेळी ते आकाराने जाईल. आणि त्यानतर प्लान आला असेल व ५-२५ जमा झाले असेल. जे आले ते आले ह्याच्यामध्ये काहीही कॅरिफॉरवर्ड होणार नाही.

**मिलन पाटील :-**

ह्याच्यानंतर पण फक्त ५९ राहणार आहे? किती प्रकरणे त्याच्यात आली आहेत? प्रकऱणांची काय माहिती आहे का?

**मा. महापौर :-**

कॅरीफॉरवर्डने ६ और ७ ऐसा

**मिलन पाटील :-**

कॅरीफॉरवर्डचे नाही. आता हे फक्त ५९......

**मा. महापौर :-**

विषय एवढाच आहे की, ६ करोड रू. आपण प्रोव्हीजन केली होती. त्यातले ६० लाख रू. का झाले? ५ करोड ४० लाख रू. का झाले नाही. मागच्या वर्षी साडे ४ करोड रू. झाले होते.

**मिलन पाटील :-**

हे ह्या एवढ्या पिरियडमध्ये थोडेसेच प्लान झाले आहेत. किती आला होता प्लान.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

८ महिन्यामध्ये ८०-९० प्लान होते ते चार्ज देण्याच्यापूर्वी सर्व प्लान होते ते चार्ज देण्याच्यापूर्वी सर्व प्लान सॅक्शन केले. मी चार्ज देताना एक ही प्लान पेन्डींग नव्हता.

**भगवती शर्मा :-**

आता काय पेन्डींग आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

माहिती घेऊ. अग्निशमन कॅप्टीशेन फी हा १५ मी. च्या वरच्या बिल्डींगला लागू होतो. म्हणजे ४ माळ्याच्या वरच्या पुढे. तर जसे आपल्याकडे विकास परवानगी येतात. त्याप्रमाणे त्याची आकारणी केलीजाते. त्यामुळे असे आज त्या मितीला त्याची वसुली ८२ लाखाची आहे. ५९ च्या ठिकाणी ८२ लाख रू. वसुल झालेले आहे. तर जे विकास परवाने आमच्याकडे आलेले आहेत. त्याप्रमाणे ते एक्सरसाईज केलेले आहेत ह्याचा अर्थ जास्तीचे विकास परवाने प्रलंबित आहे. अशी जर आपल्यालाला शंका असेल तर ती माहिती डिटेल सांगा. वस्तुस्थिती?

**मिलन पाटील :-**

प्रलंबित किती प्रकरणे आहेत व झाले किती?

**क्लासो फर्नांडिस :-**

आजची घडीला १०-१५ फाईली पेन्डींग असतील.

**मिलन पाटील :-**

त्याच्या अगोदरचे बाकी सर्व झालेले आहेत.

**क्लासो फर्नांडीस :-**

बाकीचे दिलेले आहेत. जसे आमच्याकडे येतात तसे आम्ही पुढे फॉरवर्ड करतो.

**मा. महापौर :-**

४ महिन्यापासून आपण सी.सी. बंद केले आहे. साधारण सप्टेंबरपासून म्हणून एक ही प्रकरणे राहत नाही. आपण आय.ओ.डी. वर घेत नाही. सी.सी.ची आपण फायर एनओसी मागवायचो. सी.सी. देत नाही म्हणून हेही प्रलंबित राहिलेले आहे.

**भगवती शर्मा :-**

साहब, अनेक डेव्हलपर और बिल्डरोकी शिकायत रहती है की हम वहा फाईल ले जाते है लेकीन हमारी फाईल पेन्डींग रह जाती है। क्यो पेन्डींग रहती है?

**मा. महापौर :-**

वह अभी बता रहै है की, उनके पास १५-२० फाईल पेन्डींग है।

**भगवती शर्मा :-**

लेकिन मेरी जानकारी मे ज्यादा है। वह जवाब दे और बताईए। जब अपने पास मे रेव्हेन्यु आ रही है। उसको क्यो रोका जा रहा है।

**मिलन पाटील :-**

१०-१५ चा प्रस्ताव आहे. आपण किती मार्जीन कंट्रोल करू शकतो? तुम्ही सर्व ह्यांना दिले आहे का? तुम्ही ह्याच्यामध्ये किती रिजेक्ट फाईल केलेल्या आहेत?

**क्लासो फर्नांडिस :-**

रिजेक्ट केलेल्या नाहीतच जे आहे ते पुढे फॉरवर्ड करतो. रिजेक्ट कशाला करू?

**मिलन पाटील :-**

किती फाईल रिजेक्ट केल्या?

**क्लासो फर्नांडिस :-**

आमचा अभिप्राय नोंदवून आम्ही फाईल पुढे पाठवतो.

**मिलन पाटील :-**

ह्याच्यामध्ये तुम्ही काही फाईली रिजेक्ट केल्या का, नाही?

**क्लासो फर्नांडिस :-**

रिजेक्ट केलेल्या नाही. त्याच्यात काही त्रुटी असतील तर आपण ते लेखी स्वरूपात आणतो.

**मिलन पाटील :-**

लेखी म्हणजे आता आपण जे केले आहे. तर काही काहीमध्ये रिजेक्ट फाईली केलेल्या आहेत त्यांना काय नॉमीनल एक साईडला खिडक्या वगैरे नसल्या तर त्याला मार्जीन कंट्रोल असते. ५-६ मी. चे असते. जसे जसे वर जाईल तसातशा प्रमाणात तुम्ही हे करता पण आपण आता एवढी मोठी मशीन घेतलेली आहे त्याला चारी बाजूने दिड-दिडशे फुटाचे रस्ते आहेत त्यांना सुद्धा तुम्ही त्याच्यात अडवता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

आपल्याकडे डी.सी. रूला जे ॲपलीकेबल कायदे आहेत. नियम आहेत. त्यांनी जे टाऊन प्लानिंगला फॉरवर्ड करतात, मान्य करतात ते प्रकरण ह्यांना मान्यच करावे लागणार आहे. डी.सी. रूलने एखादे मॅटर मंजूर झालेले आहे. परवानगी मिळालेली आहे आणि अग्निशमन विभागाने ते अडवण्याचा प्रश्नच नाही.

**धुव्रकिशोर पाटील :-**

खतगांवकर साहेब आपण चुकीचे बोलत आहात. दोघांमध्ये तफावत आहे. त्याच्यामुळे अनेक बिल्डरच्या फाईली पेन्डींग आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.:-**

वस्तुस्थितीमध्ये नॅशनल बिल्डींग कोडप्रमाणे अग्निशमनचे कामकाज चालते. पण जिथे डी.सी. रुल्स चालू आहे तिथे नॅशनल कोड बिल्डींग लॅप्स होतो. डि.सी. रूल्सच्या आधारे त्याचे एक्झीबिशन होते आणि ज्याठिकाणी डी.सी. रूल नाही. गावठण आहे. तहसिल एरिया आहे. ग्रामीण भाग आहे. तर त्या ठिकाणी नॅशनल बिल्डींग कोड त्याचे फेझेस आहे. १ फेस, ३ फेस.

**धुव्रकिशोर पाटील :-**

खतगांवकर साहेब, त्यांना मान्य़ आहे का ते तुम्ही विचारा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

लेखी आदेश त्यांना मा. आयुक्तांनी काढलेले आहे आणि त्याप्रमाणे चालू आहे.

**मिलन पाटील :-**

ते नगरचनेला मानतच नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

असे नाही ना! माझ्याकडे चार्ज असताना मी १०० परवाने दिलेले आहेत. त्याच कायद्याखाली नॅशनल बिल्डींग कोडमध्ये जे शक्य होत नव्हते. पण डी.सी. रूलप्रमाणे ते ॲप्लीकेबल होते. मा. आयुक्तांनी ते मान्य केल्यापरित ते सर्व प्रकऱणे आपण मान्य केले आहेत.

**धुव्रकिशोर पाटील :-**

खतगांवकर साहेब, तुम्हांला आदेश काढायाला लागले की, नाही? डी.सी. रूलप्रमाणे तुम्ही सर्व फाईली मंजूर करा. ह्याचा अर्थ ते फायर विभागाचे अधिकारी तो तुमचा कायदा मानत नव्हते म्हणून तुमच्या आयुक्तांना ते आदेश काढावा लागला. ह्याचाच अर्थ की, कुठेतरी डिसप्युट आहे. साहेब, भरपुर आर्किटेक्चर, भरपूर बिल्डरांच्या कम्प्लेंट आहेत की, अग्निशमन विभाग बरोबर काम करत नाही. महापौर साहेब, माझी तुम्हांला अशी विनंती आहे की, तुमच्या चेंबरमध्ये गटनेते, आर्किटेक्चर आणि बिल्डर ह्यांची संयुक्त मिटींग घ्या आणि ह्या दोघांमधला वाद संपवा.

**मा. महापौर :-**

ज्यावेळी २०० फाईल पेन्डींग होत्या. बऱ्याचदा चर्चा झाली त्यानंतर ह्यांचे म्हणणे होते की, फायरला नॅशनल कोड आहे नंतर मी खतगांवकर साहेब, आयुक्त साहेब आणि क्लासो फर्नांडिस ह्या चारांनी बसून तो एक निर्णय घेतला की, जे टाऊन प्लानिंग मंजूर करेन त्याप्रमाणे तुम्हांला ती एनओसी दयायची आणि एखादे आता ह्यांची एनओसी डायरेक्टली ते मागत नाही. एक प्लान त्यांना सुटली करून देतात. बिल्डरला की, हे घ्या आणि ह्याच्यावर एनओसी घेऊन या. ह्यांना फक्त टेकनिकल बाब बघायची आहे. म्हणजे मार्जीन हे ते आता बघायचे नाहीच आहे. ते डी.सी. रूलप्रमाणे जे मंजूर करतील.

**मिलन पाटील :-**

ते फाईल रिफ्युज करू शकतात का?

**मा. महापौर :-**

त्याच्यावर ते त्यांचे ओपिनियन देतील. पण रिफ्युजल नाही. डी.सी. रूलचा आपण नियम लावल्यनंतर जे आता खतगांवकर साहेब बोलतात की, एकदम ५०-१०० फाईल जे काही पेन्डींग होते. त्यांना त्यावेळी एकदम परवानगी देण्यांत आलेली होती आणि आता जी आपल्याला रेव्हेन्युमध्ये तरतुद करायची आहे. तर नवीन फाईल तेवढी आता येत नाही कारण की सी.सी. आपण देत नाही. एखादे आापण सी.सी. चे धोरण ठरवले म्हणजे काल जे आपण ठरवले तर नक्कीच हे रक्कम परत वाढू शकते. नवीन आयुक्त आल्यानंतर....

**मिलन म्हात्रे :-**

त्या फायर ब्रिगेडमध्ये कुठल्या बिल्डींगला तुमची अग्निशमन यंत्रणा व्यवस्थित आहे. मला सांगा प्लाननुसार कार्यरत आहे का? एखादी मोठी घटना घडल्यानंतर आपले डोळे उघडणार का? उद्या, ती व्यक्ती सर्व व्यक्तीला जबाबदार असणार आहे. माझे स्वतःचे वैयक्तिक मत असे आहे की, ठिक आहे. प्लान पास केला. बरोबर आहे. आपण फायरचे कधी रिन्यु घेतो का? किती टॉवरचे आहे? आपले मॉल वैगेरे जेवढे आहे. तिथे तुमचे आहे का? मागच्या वेळेला श्रीनगरला बॉम्बब्लास्ट झाला. सिनेमा हॉलमध्ये बॉम्बब्लास्ट झाला. मी कोणाला वैयक्तिक दोष देत नाही. पण तुम्ही रिन्यु घेतला का? नसेल त्याला पॅरेलाईज करून तुम्ही ते पण बघा. स्थायी समितीला सगळ्या चर्चा झालेल्या आहेत. प्रत्येक विंग वाईस तुमची फायर सिस्टीम चालू आहे का? जे दयायचे आहे ते केले आहे का नाही. बिल्डींग प्लान पास झाला म्हणजे झाले असे नाही. तुमचे ईअरली काहीतरी ५० किंवा १०० बिल्डींगचे तुमचे झोन करून त्या बिल्डींगची फायर सिस्टीम बरोबर आहे का, नाही ह्याचा तुम्ही रिन्यु दयायलाच पाहिजे. तुम्ही एवढे व्यवस्थित बोलता. तुम्ही आता जे विधान केले मी पायी फिरणारा नगरसेवक आहे. किती, तुमच्या सिनेमा घराच्या बाहेर फायरहायड्रेन आहे त्याचा मला आता हिशोब दया. तुमच्याकडे फायर फायरहायड्रेन सुविधा बरोबर नाही. काय करणार? खाली फायरहायड्रेन लावणार का? पाईप लाईन टाकले आहे का? एशियातला सगळ्यात नंबर वनचा मॉल आपल्या येथे दहिसर चेक नाक्याचा येथे येतोय. तुमची प्रोव्हीजन काय आहे. पाण्याची आणि फायर बिग्रेडची. कोणी टेकनिकल

नाही मागे फायरहायड्रेन मध्ये दगडं अडकली होती तर अपले इंजिनिअर सांगतात ते फायर इंजिन लावायचे आणि ते खेचल्यावर पाणी येते. फायरहायड्रेन खोलून आम्ही बाहेर दगडं काढली ही आपली परिस्थिती आहे आणि जे फायरहायड्रेन आता आहेत ते ॲक्टीव्हेट आहेत का? कधी तुम्ही रिन्यु घेतलात? कधी सर्व्हे केला का? सिटी इंजिनिअर आणि तुम्ही एकत्र येऊन चार चार वेळा जावून सांगितले आहे. पण कोणाचे काही लक्ष नाही. कोणाला वेळच नाही.

**जुबेर इनामदार :-**

अग्निशमन अधिकारी, आपण जे आम्हांला स्थायी समितीमध्ये उत्तरं दिले होते ते सांगा. महासभेच्या समोर की माझ्याकडे काम करायला लोक नाहीत. मी एकटयाने काय काय करायचे असे.

**क्लासो फर्नांडिस** :-

माझ्याकडे कर्मचारी वर्ग अपुराच आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

मा. महासभेने मागे तीन महिन्याखाली १०३ पदाचा प्रस्ताव मंजुर केलेला आहे आणि त्याचा आपण शासनाकडे पाठपुरावा करत आहे. सबमिट केलेले आहे. त्याच्यात शासनाने क्युरी केली आहे ते सुद्धा आम्ही सबमिट केलेले आहे तर येणाऱ्या २-३ महिन्यात आपल्याला ती पद मंजूर करून घेण्याचा प्रयत्न चालू आहे.

**मा. महापौर :-**

१ करोड रू. आहे ते करोड रू. ठेवायचे. अग्निशमन परवाना अडीच लाख रू., अग्निशमन निरक्षण शुल्क हा एक प्रश्न चिन्ह आहे. म्हणजे जे रिन्युअल असतात.

**प्रफुल्ल पाटील :-**

१० लाख रू. आणि दिड कोटी रू.

**जुबेर इनामदार :-**

१० लाख रू. होते आणि स्थायी समितीने त्याला दिड कोटी रू. केले आहे.

**मा. महापौर :-**

जी कॅपीटेशन फी असते त्यात १० टक्के साधारण रिन्युअल फी असते..

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

मा. महापौर साहेब, त्याला आता एनओसी दिलेली आहे आणि एक वर्ष झालेले आहे. म्हात्रे साहेबांनी सांगितले, वन टेन त्याची फिगर दरवर्षी घ्यायची आहे. समजा, २ लाख रू. ची त्याची पहिल्या वर्षाची मागणी होती तर नंतरच्या सबसिडींग ईअरला २०-२० हजार रू. राहिल. जावून तपासणे त्याचे सर्व स्ट्रक्चर आहे का ते बघणे आणि त्याच्यात काही कमी असेल तर त्याला नोटीस देवून करून घेणे. त्यात मुळ मागणीच्या १० टक्के दरवर्षी वसुल करायचे आहे आणि आता पर्यंत ही प्रथा नव्हती आता आपण सुरू करतोय आणि त्याच्यावर आता नियमसुद्धा होतोय.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, ह्याच्यामध्ये नवीन जुने असे सर्व इमारती आले का?

**मा. महापौर :-**

आपण जी परवानगी ऑलरेडी दे आर दि परमिशेबल इन दि लिमीट. तरी आपण त्यांना ११ महिन्यांची परवानगी दिलेली आहे. ते रिन्युअल केलेले नाही तर त्या तारखेपासून घ्यायचे की, आजपासून आणि ते रिन्युअल विसरून जायचे.

**अनिल सावंत :-**

त्या तारखेपासून.

**प्रफुल्ल पाटील :-**

ती १ महिन्यांची परवानगी जर लॅप्स झाली असेल तर मग ती घ्यायची जबाबदारी कोणाची होती?

**मा. महापौर :-**

अधिकाऱ्यांची.

**प्रफुल्ल पाटील :-**

नियम कधी आला तेव्हापासुन ना.

**चंद्रकांत वैती :-**

आपण नियम कधी आणला?

**मा. महापौर :-**

११ महिन्यापासून नियमच झाला. मी एक जनरल विचारतो तुम्ही आतापर्यंत फायर एनओसी एकपण रिन्युअल केली नाही का? एकाकडून १० टक्के घेतले नाही का ते सांगा. त्याला नियम आहेत का कमर्शियलकडून घ्यायचे रेसीडडेन्शीअल कडून घ्यायचे नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

लॉजींगचा प्रश्न असा आहे की......

**मा. महापौर :-**

लॉजींगचा प्रश्न नाही. ज्यावेळी आपण ११ महिने दिले म्हणजे नक्कीच ते रिन्युअलसाठी पात्र आहे आणि तुम्ही बोलता की, तो कायदा आता आला, काही ठराविक लोकांनकडून का रिन्युयल करून घेतली?

**प्रफुल्ल पाटील :-**

रिन्युवलचा कायदा आता आला कि रिन्युअलचे चार्जेस घेण्याचा कायदा आता आलात ते महत्त्वाचे आहे.

**मा. महापौर :-**

चार्जेस पहिले का घेतले? काही ठराविक लोकांचे रिन्युवल करून पैसे का घेतले?

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण कोणाकडून रिन्युवल चार्जेस घेतले आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

कमर्शियल जे मॉल आहे.

**मा. महापौर :-**

कारण कमर्शीयलवाल्याचे काय झाले. इतर गोष्टीसाठी त्यांना गरज असते रिन्युवल करायची म्हणून ते समोरून येतात आणि आपण सांगतो पैसे दया. जे रेसीडेन्स टॉवर मोठमोठे आहेत त्यांना एवढी गरज नसते म्हणून येत नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

पॉलिसी मॅटर म्हणून आपण विषय आणा किंवा ह्य़ाच्यातच प्रपोझ करा. टॅक्सेशनच्या पद्धतीमध्ये कारण आपण रिट्रासिटी इफेक्टने देतोय. तर अॅट लिस्ट तसा विषय आणून तो पाच मीटर धरावा लागेल.

**मा. महापौर :-**

माझे असे म्हणणे आहे की, तुम्ही ह्यावर्षी विषय आणला २००८-०९ सालामध्ये तर २००८-०९ प्लस २००९-१० हे करता येईल अजून तुमच्याकडे दोन महिने आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग पुढच्या मिटींगमध्ये आणा.

**मा. महापौर :-**

पुढच्या मिटींगमध्ये तो विषय आणण्याची गरज आहे आणि अॅक्ट, रिन्युवल आपण म्हणतोय तर गरजच नाही. ११ महिने परवानगी दिली.

**प्रफुल्ल पाटील** :-

बॅक इफेक्ट देण्यासाठी बोललो. रिट्रासिटी इफेक्ट दयायला शेवटी तुम्हांला लागेलच.

**मा. महापौर :-**

माझे असे म्हणणे आहे की, अधिकाऱ्यांनी ह्या वर्षाचे बिल जनरेट करावे. रिन्युवलचे म्हणजे ह्या वर्षीचे दिड करोड आणि सन २००९-१० ला दिड करोड रू. म्हणजे आपल्याला पूर्ण तीन करोड रू. येईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन २००८-०९ चे पण दिले नसतील. मग २००८-०९ पासून रिपीट करा.

**मा. महापौर :-**

सन २००८-०९ बोलतोय आणि २००९-१० म्हणजे २००८-०९ ची आता दिड महिन्यात बिल काढा. म्हणजे ते तीन करोड होतील. बॅकलॉक प्लस नवीन.

**जुबेर इनामदार :-**

हा कायदा कधीपासून इम्प्लीमेट करता येईल?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

इम्प्लीमेंट करता करता पूर्ण वर्ष जाईल.

**मा. महापौर :-**

आपण प्रत्येक गोष्टीला सांगणार की, अधिकारी इम्प्लीमेंटच करणार नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्यांना बिल रेज करू दया.

**मा. महापौर :-**

फक्त बिल रेज करा. पैसे पाहिजे तर पुढच्या वर्षी घ्या. तुम्ही कलेक्शन करू नका. माझे म्हणणे असे आहे की, त्यांना फक्त नोटीस पाठवा व रिन्युवल करा. त्यांच्याकडे यादी आहे, कोणाकोणाला फायर एनओसी दिली. फक्त जनरल कॉमन नोटीस टाईप करून पाठवायची आहेत. स्टाफ नाही म्हणून दिड करोड रू. सोडायचे का?

**धुव्रकिशोर पाटील :-**

मा. महापौर साहेब, हे पण आम्ही बड्या मुश्किलमध्ये ठेवलेले आहेत. त्यांच्याजवळ माणसं पण नाही.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, बजेट प्रॅक्टीकली जावू दया. शासनाच्या ऑडीटमध्ये काय दोष आला आहे ते सांगा.

**धुव्रकिशोर पाटील :-**

मा. महापौर साहेब, सुरूवातीला तुम्ही एवढे भाषण केले की, एवढा बजेट फुगवलेला आहे आणि आता परत फुगवताय.

**मा. महापौर :-**

अधिकाऱ्यांनी प्रॅक्टीकल केले तर सगळे शक्य आहे कारण की, आपण बघा २००६-०७ ला एनओसी दिली २००७-०८ ला जी एनओसी दिली.

**चंद्रकांत वैती :-**

बाकी काही झाले तरी चुकले तर चुकेल वैमानिकाचा अंदाज चुकेल पण पैसे जमा करण्यात तुमचा अंदाज चुकणार नाही. त्याच्यामुळे ते करूनच घ्या.

**भगवती शर्मा :-**

पहले बताओ टॅक्सकी कितनी वसुली हुई है, कितना बाकी है? कहा वसुली होता है?

**मा. महापौर :-**

दिड करोड रूपये.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, ऑडीटचा दोष काय आहे ते सांगा.

**मा. महापौर :-**

एस्कॉर्ट.

**प्रफुल्ल पाटील :-**

प्रशासनाला माझा असा प्रश्न आहे की, आपण एकंदरीत गेल्या आठ महिन्यात किती आगी लागल्यात?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. :-**

शहरामध्ये अशा काही आपत्ती आल्या तर आपल्याला कन्सॉलडेट प्रॉपर्टी टॅक्समध्ये ऑलरेडी फी आहे म्हणून इंडिव्ह्युवल इव्हेंटला आपण टॅक्स घेत नाही. फक्त शहराच्या बाहेर अशी कुठली सेवा दिली तर त्याला टॅक्स घेतो तोही इंधनाचा खर्च आणि मॅन पॉवर.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण फक्त २ हजार रू. या आठ महिन्यामध्ये आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. :-**

टॅक्स नाही भाडे आहे. पाणी समजा एखाद्यांचा त्योहार असतो काही सार्वजनिक असते इमरजन्सीमध्ये एखादा कोणीतरी टॅंकर घेतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

रूग्णवाहिका आणि शववाहिकांच्या बाबतीत आपण जे रूग्णाला रूग्णवाहिकेपर्यंत नेण्याचे भाडे घेतो आणि मेलेल्या माणसाला शवाहिकेवर नेतो त्याचे भाडे घेतो ते म्हणजे आपल्याकडे काहीच नाही. आपल्या रूग्णवाहिका बरोबर नाहीत की, शववाहिका बरोबर नाहीत असे आहे तरी काय?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रफुल्ल साहब को यह बताता हु की, सालभर में कोई भी जाकर देखता नही की हमारे प्रभाग की जो ॲम्ब्युलनस है या शववाहिनी है उसकी क्या हालत है? कोई कोई तो अपने प्रायव्हेट गाडी मे डालकर लेके जाते है। आम आदमी भरता है। यह अभी जब आपको उत्पन्न दिखा, यहापर उत्पन्न क्यो नही आता है आपको वह सोचना चाहिए लेकिन अगर उसकी सोच पहले आती थी, तो आज फिगर भी बढा होता।

**प्रफुल्ल पाटील :-**

शुरू मे क्या बोला रूग्ण को वाहिका के पास लेके जाने का और शव को वाहिकाके पास लेके जाने का यह भाडा है क्या? इसका मतलब आप समझो?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आज ४ अपने रूग्णवाहिका है, एक भी कार्यरत नही है। और आपके हर प्रभाग मे फायर फिटर, फायर बिग्रेड हर विभाग मे बोलते है की, रूग्णवाहिका, शववाहिका किसके लिए। किस लिए आप पब्लिक को बनाते हो? महापौर साहब और ४ रूग्णवाहिका उसमे उनके पास टेंडर नही है। वह स्ट्रेचर उठानेके लिए आदमी नही है। एक एक ड्रायव्हर तीन तीन पाली करता है वह बोलता है की, हमारे पास ड्रायव्हर नही है। आप किधर से उत्पन्न का पैसा करते हो? स्थायी समितीने ५ लाख रू. क्या हिसाब से यह किया है?

**मिलन पाटील :-**

ह्याला एक कारण आहे. आपले ४-४ जणांकडे ॲम्ब्युलन्स आहे. २ शववाहिन्या आहेत. या सर्वच्या सर्व बंद असतात. त्याचे कारण सांगतो, आपण काय करतो हे जे ठेक्याचे ड्रायव्हर असतात ते आपण घेतो. ठेक्याचे ड्रायव्हर म्हणून कोण काम करते तर हे जे रिक्षा चालवलेले असतात वर्षभर. ज्यांनी सहा महिन्याचे चार महिन्यामध्ये लायसन्स घेतलेले आहे. ज्याला काहीही गाही चालविता येत नाही. हे असे ड्रायव्हर आपण येथे पाठवतो. त्यांना काहीही चालवता येत नाही. ते गाडी रफ चालवतात. आणि मग काय करतात त्यांना संध्याकाळची वर्दी नको असते. रात्रीचे कोण उठवायला येईल. म्हणून काहीतरी क्लचचा बहाणा सांगतात. अधिकाऱ्याला त्याच्यातली जानकारी काही नसते. साहेब, ब्रेकडाऊन आहे तो क्लच लागत नाही. ब्रेक लागत नाही. ते चालवताना असे झटके देतात का त्या ड्रायव्हरच्या मिस्टेकने एक्सल जातात. ज्वाईंट जातात हे ड्रायव्हरच्या मिस्टकने जाणाऱ्या सगळ्या वस्तू आहेत. आणि त्या तिथपर्यंत तो पेशंट काय जात नाही आणि मग ह्यांची गत असते, ह्यांना बाहेर काय जायचे नसते आणि मग काहीतरी कारण सांगायचे असते. खतगांवकर साहेबांनी, सांगितले की, साहेब, माझी गाडी आहे आणि त्याचा ब्रेक लागत नाही मग खतगांवकर साहेब थोडेच सांगणार का जा असे, अरे बाबा काढू नको गाडी. तर काढू नको तर तो झोपून गेला. यापध्दतीने ठेक्याचे आपले गाळे असतात. ड्राय़व्हर चालवतात म्हणून आपल्या नवीन नवीन गाड्या खराब झालेल्या आहेत. तर त्याच्यावर ॲम्बम्युलन्सवर आपला चांगला जो जुना जाणता ड्रायव्हर महानगरपालिकेचा ड्रायव्हर ठेवा आणि हे ठेक्याचे ड्रायव्हर अधिकारी ह्यांच्यासाठी दया.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

खतगांवकर साहेब, आपल्याला माहित आहे का, नाही इकडे फोनवर जर बोलतात की अरजन्सीमध्ये ॲम्ब्युलन्स पाठवा तर सांगतात की पहिले येथे एन्ट्री करण्यांत यावी. माणूस येथे तो पेशंट राहिल का, नाही त्याची पण गॅरेंटी नाही. ह्याचा तुम्ही खाली तपास करा. पहिले एन्ट्री करा नंतर गाडी बाहेर निघेल. एन्ट्री घ्या नाहीतर घेऊन जावू नका.

**चंद्रकांत वैती :-**

ह्याचे पैसे किती वाढवणार? ह्याच्यापासून उत्पन्न काय होणार. या बाबी पेक्षा ही या शहराची आवश्यकता आहे. त्याची जाणीव आपण ठेवली पाहिजे. एकतर, काही विनोदाची बाब सोडली तर महापालिकेची रूग्णवाहिका आणि शववाहिका ही केवळ आपल्या वाहन ताफ्याची शोभा वाढावी किंवा महापालिकामध्ये शववाहिका आहे. रूग्णवाहिका आहेत ते दाखविण्यासाठी दर्शनासाठी आपण त्या रूग्णवाहिका आणि शववाहिका चालवतो. प्रत्यक्षात ते फोन कधी अटेन्ड केले जात नाही. गाडी कधी जात नाही. ड्रायव्हरांच्या बाबत कर्मचाऱ्यांच्याबाबत पुन्हा पुन्हा प्रशासनाला दोष येतोय तो असा की, प्रशासनाने त्याच्याबाबत कधी बांधिलकी दाखवली नाही किंवा आमच्याही कर्तव्यातील ही एक बाब आहे ते कोणाच्या अखत्यारित आहे ते कोणाला काय करायचे आहे? आपल्याकडे ड्रायव्हर वारंवार येत असतात. ड्रायव्हरच्या रूपाने रखवालदारच्या रूपाने शिपाईच्या रूपाने, सफाई कर्मचाऱ्यांच्या रूपाने ज्याची ज्याची नियुक्ती महापालिकेच्या कामकाजात झाली तो पहिल्यांदा बघतो की, मला टेबल खुर्चीपर्यंत कसे जाता येईल? तो शिपाई यापासून लगेच ड्रायव्हरपासून लगेच सफाई कामगारांपासून रखवालदारापासून, माळ्यापासून क्लार्क बनण्याचे प्रय़त्न करतो. त्याचे एक जिवंत उदाहरण आता आपण कोणाला तरी उपजनसंपर्क अधिकारी ज्यांची नियुक्ती अआपण रखवालदार म्हणून केली आहे. तीन वर्षापूर्वी त्यांना लगेच आपण बढतीचे प्रयोग तर ही सवय आपण बंद केली पाहिजे ही आवश्यक बाब आहे. आणि आपण एखाद्या जाणाऱ्या जिवाला वाचू शकू. जर ह्या रूग्णवाहिका आपल्या व्यवस्थित असतील. त्याचा काहीतरी फायदा घेतील. नाहीतर, मग तुम्हांला सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी सांगितले की बीजेपीची ॲम्बम्युलन्स खरोखर आता आम्हीही हा नंबर देतो लोकांना, की इथे संपर्क करा तुम्हांला ॲम्ब्युलन्स मिळेल. काही हॉस्पीटलने आपले ठेवलेले आहे. पण कुठचीही वेळेवर मिळत नाही, महानगरपालिकेत नगरसेवकांनी फोन केल्यानंतर ही होत नाही. ह्याच्यापेक्षा पुढे जावून सांगतो. एकदा माझ्याकडे रूग्णवाहिकेचे भाडे मागितले कारण त्याला माझी शिफारस होती. मी भरले ही होते. माझा फोन होता म्हणून ते भाडे माझ्या नावावर लिहिले. भाडे भरले त्याचे दुःख नाही. परंतु, ती ॲम्ब्युलन्स त्यावेळेला माझ्या फोनमुळे वेळेवर आली ते एक नशीब. पण ॲम्ब्युलन्स ही सेवा, शववाहिका ही सेवा आपली फक्त दिखाव्यापुरती आहे. खतगांवकर साहेब, आणि त्या डिपार्टमेंटचा जो प्रमुख असेल त्याने आजची मिटींग संपल्यानंतर उद्या, परवा सुट्टी आहे पण जेव्हा तुम्ही हजर व्हाल त्यानंतर त्या गाडीच्या भोवती एक फेरी मारा. त्याचा ड्रायव्हर कोण आहे? त्याच्यावर महापालिकेच्या कुठच्या नंबरवर संपर्क केल्यानंतर ॲम्ब्युलन्स सापडू शकेल आणि खाली पण इन्स्ट्रक्शन देवून ठेवा. कारण खालच्या आपल्या ऑपरेटरचा काही ठिकाणी नसतो. कोण फोन उचलेल काय उत्तर देईल. हे काहीही खरे नसते तर तिघे स्पेसीफिक इन्स्ट्रक्शन दया.

**एस.ए.खान :-**

मिरा रोडला ही ॲमब्युलन्स नाही. सहा महिने झाले.

**मिलन पाटील :-**

तीन चार वर्षे झाले आपल्याकडे ऑटोमोबाईल इंजिनिअर भरलेले नाही. पूर्वी कामाला सुद्धा होते.

**मा. महापौर :-**

एस्कॉर्ट फी २ लाख रू. करा.

**आसिफ शेख :-**

रूग्णवाहिका आणि शववाहिकामध्ये आपल्या ज्या महानगरपालिकेच्या आहेत तर मागच्यावेळी असा प्रसंग घडला होता की, आमच्या परिचयाचे कोणीतरी एक्सपायर झाले होते. त्यांची बॉडी घेऊन जळगावला का कुठेतरी जायचे होते. तर आपल्याकडून असे सांगण्यात आले की, आमच्याकडे असा स्थायी समितीमध्ये ठराव झाला होता की, शहराच्या बाहेर जावू नये. तर असा ठराव वगैरे काय झाला आहे का? समजा, एखादी बॉडी गावाला पाठवायचे असेल तर काय करायचे? विमानामधून पाठवायची का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

होय, ठराव झाला आहे.

**आसिफ शेख :-**

गोरगरिबांसाठी काय? मिरा भाईंदरमध्ये जे लोक राहतात.

**अनिल सावंत :-**

सन्मा. सदस्यजी, गाड्यांची कंडीशन आहे ते ठाणे शहराबाहेर जावू शकत नाही.

**आसिफ शेख :-**

गाड्या पाहिजे का नको?

**मिलन म्हात्रे :-**

एक ॲक्सीडेंट केले तर सहा महिने एक ॲम्ब्युलन्स गाडी, एक शवाहिनी तशीच होती.

**आसिफ शेख :-**

ड्रायव्हरची भाषा वेगळी अधिकाऱ्यांची भाषा वेगळी?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हांला प्रायव्हेट भरपूर गाड्या आहेत. त्या तुम्ही न्या. सहा सहा महिने ती गाडी तशीच गॅरेजला होती.

(सभागृहात गोंधळ )

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजी आपण नोट करून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

हा तुम्ही करून घ्या. इकडच्या लोकांनकरिता पाहिजे.

**आसिफ शेख :-**

जनतेचे कैवारी म्हणून मिरवता. आपण आत्ताच्या मंजुर करा.

(सभागृहात गोंधळ )

**मा. महापौर :-**

मुंबई आणि ठाणे.

**आसिफ शेख :-**

मुंबई आणि ठाणे नाही. जवळचे पाच जिल्हे घ्या. महाराष्ट्रात घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

आमची सुचना अशी आहे की, राष्ट्रवादीच्या सगळ्या ॲम्ब्युलन्स त्या सेवेसाठी ठेवायचे.

**मा. महापौर :-**

महाष्ट्रासाठी तो विषय स्थायी समितीसमोर विषय पाठवून मंजुर करावा. त्यानंतर आपण महाराष्ट्रात सुरू करू या.

**आसिफ शेख :-**

महाराष्ट्रात सुरू करू या. धन्यवाद.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय एस.कॉट.

**प्रेमनाथ पाटील :-**

एस्कॉर्टचे आपले कुठेकुठे नाके लागलेले आहे.

**मा. महापौर :-**

सध्या कुठे ही लागलेले नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

मग एवढे ५ करोड रू. अडीज करोड रू. आपण कसे वसुल करणार?

**मा. महापौर :-**

सध्या बंद आहे. हे आपण प्रायव्हेटीझम करणार आहे म्हणून अडीज करोड रू.

**मिलन पाटील :-**

साहेब, गोराईला एक चालू आहे.

**मा. महापौर :-**

ते बंद आहे.

**मिलन पाटील :-**

वसुल करतात.

**आसिफ शेख :-**

ह्याचे काय टेंडर काढणार आहात का?

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, ह्याचा ठेका काढणार आहात का?

**चंद्रकांत वैती :-**

आपण एस्कॉर्ट कधी चालू करणार आहोत का? तो जो आपण चालू केला होता तो अधिकृतच नव्हता. त्या रस्त्याला आपण वसुलच करू शकत नाही. तो रस्ता आपण बांधलेला नाही. आपल्या मालकीचा नाही. त्याठिकाणी तुम्ही एस्कॉर्ट चालू केलेले आहे आणि उगीच काहीतरी दाखविण्यासाठी इथे मात्र हा एक हेड कमी करून टाका. अडीज करोड करू. आपण आणणार काय? नुसते हेड ठेवणार आहात का? गेल्यावेळेला अडीज करोड रू. आपल्याला अपेक्षित होते आणि आपल्या कर्मचाऱ्यांनी तीन पाळ्यात काम केले. सातत्याने कर्मचाऱ्यांनी मार खाल्ला. नुकसान केले. दंडिली केले, दादागिरी केली आणि तेवढ्या एक वर्षात आपण ४४ लाख रू. उत्पन्न आणले होते. आपण अडीज करोड रू. त्यातून अपेक्षित कसे धरतो?

**अनिल सावंत :-**

खतगांवकर साहेब, आपण स्थायी समितीला जे स्पष्टीकरण दिले हाते ते दया.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

उपकर लागला तर एस्कॉर्ट राहणार नाही आणि जकात असेल तर एस्कॉर्ट आहे म्हणून आता आपल्याकडे जकात चालू आहे. यावर स्थायी समितीमध्ये सविस्तर चर्चा झाली जकात चालू असेल तर एसकॉटला माफ कसे करता येईल तर त्या अनुषंगाने आम्ही वस्तुस्थिती मा. वैती साहेबांनी सांगितल्याप्रमाणे सांगितले की जागेच्या अडीचणी आहेत आणि आपल्या शहरातून जाणारे दोन्ही ठाणे आणि अहमदाबाद किंवा मुंबई आणि अहमदाबाद हे दोनच मुख्य रस्ते आहेत आणि दोन्ही रस्त्यावर आय.आर.बी.चा टोल आहे आणि त्याला दुहेरी आपला टोल लावून लोकांची गैरसोय होते असा ही विरोध आहे. काम करताना अडचणी आहेत. तरीपण सर्वांची ह्याच्यावर चर्चा होऊन महापालिकेच्या उत्पन्नाचे साधन म्हणून महापालिकेने ह्याच्या निविदा काढाव्यात असे अपेक्षित करून स्थायी समितीने हे अपेक्षित उत्पन्न केलेले आहे.

**चंद्रकांत वैती :-**

साहेब, आपण हे आधी बजेट मध्ये किती पकडले तर ५ करोड २२ लाख रू. ४ करोड ७७ लाख रू. ची त्याच्यामध्ये तफावत आली आणि आता तुम्ही जर सांगत असाल मग तुम्ही असे सांगत असाल की, इथे ऑक्ट्रॉय आहे म्हणून आपल्याला हा एस्कॉर्ट ठेवायचा आहे तर मग तुम्ही ते काय नुसते दाखवण्यासाठी ठेवणार का? मग वसुलीला सुरू करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

आपल्याकडून वसुल होणारच नाही. वस्तुस्थिती सांगतो.

**चंद्रकांत वैती :-**

कायदयात दाखवायची असेल तर २५ लाख रू. दाखवा, आपण फार दंडेले करून ४४ लाख रू. वसुल केले होते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

वस्तुस्थिती आपल्यासमोर मांडतो सर्वांनी निर्णय घ्या. स्थायी समितीचे एकच उद्देश होते की, जर आपल्याला अधिकार आहेत आणि उत्पन्न होऊ शकते. आपल्याकडे अडचणी असेल तर कोणी ठेकेदार निश्चित करून त्या अडचणी दुर करून जर काम करत असेल आणि आपल्याला उत्पन्न होणार असेल तर आपण एक धोरणात्मक त्याच्यात काहीतरी तरतुद करावी.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपल्याला असे आहे की, जिथे फाटलेले आहे तिथे शिवायला पाहिजे. तर आपण जिथे सरळ आहे ते फाडून शिवण्याचा प्रयत्न करतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

आपण निर्णय घ्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपल्याला एक चांगले प्रॅक्टीकल उदाहरण देतो. साधारण एस्कॉर्ट कुठल्या रस्त्यावर लागतो ॲट लिस्ट तो आमच्या हद्दीतून जातो असे नाही तो आमचाही रस्ता असावा. जो आमचा रस्ता आहे तिथे आम्ही एस्कॉर्ट लावत नाही. मी मागच्यावेळी पण बोललो होतो तुम्ही एस्सेवर्ल्डला एस्कॉर्ट लावा. आज एस्कॉर्ट अडीज कोटी रू. आहे व तो किती कोटीवर जाईल ते बघा आणि तुम्ही ज्याठिकाणी एस्कॉर्ट ...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

हा एस्कॉर्ट कसा आहे की, शहरामध्ये माल न येता हद्दीच्या सुरूवातीला माल.

**प्रफुल्ल पाटील :-**

लोक जातात ना या साईडला.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

लोकांनवर एस्कॉर्ट नाही. गैरसमज नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही गाडयांवर लावा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

पब्लिक ट्रान्सपोर्टवर एस्कॉर्ट नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

टोल लावा. तुम्हांला उत्पन्न पाहिजेत ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

हा मार्गस्थ दाखला जो आहे. हा जकाती सारखाच एक प्रकारचा कर आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सत्संग असते तेव्हा जरी ५ रू. लावले तरी लाखो रूपये जमतील.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

वाहनावर किंवा व्यक्ती वरचा हा कर नाही. जसा हा आर.आर.बी. चा टोल आहे. हा जो माल शहरात न येता शहरातून माल बाहेर जातो त्याला चेक असावा. तो मध्येच कुठे खाली होऊ नये आता आपली सीमा वेगळी आहे. मोठी मुंबई, नवी मुंबई किंवा इतर टाऊनमध्ये खुप रस्ते असतात. एखादा ट्रकमध्ये गेला आणि मी बाहेर  चालोय म्हणून जकात न फाडता, बाहेर न जाता माल खाली करेल ह्या भीतीपोटी काऊंटर चेक ही एस्कॉर्ट आहे. त्याला आपण गार्ड करतो. सुरूवातीला पावती देतो आणि एस्कॉर्ट नाक्याला ती पावती कलेक्ट करतो आणि त्या वाहनाला संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था महापालिकाने आपल्याकडे दर निश्चित केलेले आहेत. वेगवेगळ्या ह्याच्यासाठी १०० रू. ७५ रू. फक्त मालाच्या वाहनावरच हे आहे. कार वगैरे असे पब्लिक ट्रान्सपोर्ट घेऊन किंवा वैयक्तिक ट्रान्सपोर्ट ह्याला टॅक्स नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

मला तुम्ही चांगली आयडिया सांगितली. मला उद्या भाईंदरला ऑक्ट्राय भरायचा नसेल ना, तर तुम्ही गाडी पुलावर घेऊन परत येईल. एस्कॉर्टच्या दोन पावत्या दाखविन.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

तसे तर आपण दहापट वसुल करू.

**प्रफुल्ल पाटील :-**

ज्याठिकाणी आपण एस्कॉर्ट लावतोय तो रस्ता आता सहा पदरीकरण सुरू होतोय. आय.आर.बी. वाले तुमची टपरी कुठे फेकून देतील ते आय.आर.बी.वाले तुम्हांला तिथे उभे करतील का? सहा पदरी मार्गीकरण होत आहे. त्याठिकाणी ते त्यांचा टोल लावतीलच रूंदीकरणाने तुमची टपरी कुठे राहणार नाही. ३३ हजार रू. तुम्ही वसुल केले आणि ज्यांनी वसुल केले त्यांना आपल्याला एस्कॉर्ट द्यावा लागला. एस.कॉट कशाला देतात. मंत्री आला तर पोलिसांची गाडी एस्कॉर्ट असते. तसे तुम्ही कर्चचारी एस्कॉर्ट वसुल करायला नेमले तर त्यांना पण एस्कॉर्ट दयायला पाहिजे. ५ हजार रू. जमा झाले आणि हजार रू. खर्च झाले त्याच्यापेक्षा एस्सेलवर्ल्डच्या रस्त्यावर टोल लावा.

**मा. महापौर :-**

पण प्रायव्हेटीझम केल्यानंतर तसे बंधन टाकता येईल की, जागा जी आहे जिथे गाड्या उभ्या राहतील त्याच्या आजुबाजूच्या रोडला लागून जे प्रायव्हेट प्लॉट आहे तेथून करू शकतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

प्रायव्हेट वाल्यांना रस्त्यावर तर जागा दिली पाहिजे. आय.आर.बी. वाले काम पुढच्या महिन्यात सुरू करत आहे.

**अनिल सावंत :-**

तो त्याचा लुकआऊट आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

पहिल्यांदा दहिसर चेक नाक्यापासून आय.आर.बी.चे काम या महिन्यापासून चालू होत आहे. परवा उद्‌घाटन झाले. तुम्हांला माहिती आहे का ते जागा तरी तुम्हांला देतील का?

**मा. महापौर :-**

जागा प्रायव्हेट घ्यायची.

**प्रफुल्ल पाटील :-**

प्रायव्हेट झाली तर ती रोडला लागून पाहिजे.

**मा. महापौर :-**

रोडला लागूनच मी बोलतोय. रोडला लागून जागा असतील आणि एखादा ठेकेदार करत नसेल तर काय अडचण आहे?

**प्रफुल्ल पाटील :-**

ठिक आहे तुम्ही ट्रायल करा. तुम्हांला तशी पक्की खात्री आहे की, कोण असेल तर ट्राय करून बघा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

अहमदाबादच्या येथून पुल आहे आणि पुढे कुठेच जागा नाही. म्हणजे एन्ट्री प्वाईंट ते फाऊंटनपर्यंत जागा नाही. इकडे दहिसर नाक्यापासून एमआयडीसी वगैरे आम्ही, कार्यकारी अभियंता असे सर्वांनी पाहिले पण आपल्या सार्वजनिक मालकीची कुठेही खाली जागा नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

साहेब, आता असे आहे की आयआयआरबी च्या रस्ता रूंदीकरणामध्ये ६ पदरी रोड होतोय. आता त्यांनी मध्ये बरेचसे बांधकाम अतिक्रमण काढली. कार्यकारी अभियत्यांनी मला येथे पुढे राहून सांगावे की, ते सहा पदरीकरण झाल्यानंतर अमुक रस्ता किंवा अमुक जागा उरली. त्याठिकाणी एस्कॉर्टवाला आपला नाका लावेल. एस्कॉर्ट लावायला नाका तर पाहिजे.

**मा. महापौर :-**

त्याला प्रायव्हेट जागा लागेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

होय, मग तसे त्याने सांगावे की, आम्ही त्याला ही जागा देवू शकतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

आयआयआरबी ठेका दिला तर.

**प्रफुल्ल पाटील :-**

आयआयआरबी कसा ठेका घेईल? ते म्हणतील रस्ता आमचा टोल आम्ही घेतो आणि आम्ही तुम्हांला एस्कॉर्ट कशाला देवू?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

वसुलीचा ठेका.

**चंद्रकांत वैती :-**

आपले आयआयआरबी चे क्षेत्र केवढे येते? त्या ब्रीजपर्यंत आणि तिथे काजूपाड्यापर्यंत. काजूपाड्यापासून फाऊंटन हॉटेल आणि ब्रीजपासून ते चेक नाक्यापर्यंत याच्यामध्ये आपला ऑक्ट्रायचा नाका आहे. दहिसरचा टोलनाका पार केल्यानंतर, पुन्हा ठाण्याकडे टोलनाका पार करायचा पुम्हा विरार पार केला ही टोलनाका पार करायचा म्हणजे टोल देत राहतील का? आणि प्रॅक्टीकल नाही तर मग तेवढी ताकद दुसरीकडे कुठे लावा. आयआयआरबी तुमचा काय ठेका घेणार? तो पण अडीज करोड रूपयाचा. आय.आर.बी २८ हजार करोड रू. त्या रस्त्यावर खर्च करणार आहे. ते काय अडीज कोटीचा ठेका घेतील?

**प्रफुल्ल पाटील :-**

ही फिगर ठेवा आणि एस्सेलवर्ल्डला टोल लावा. टोल कुठे वसुल करा तर गोराई हद्दीमध्ये म्हणजे आपल्या उत्तनच्या लोकांना लोकांना त्रास होता कामा नये.

**मा. महापौर :-**

एस्कॉर्ट काढून टोल करू का?

**प्रेमनाथ पाटील :-**

होय. तिथे टोल करा.

**(सभागृहात गोंधळ )**

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.:-**

आपण एस्कॉर्ट निर्णय घ्या. आपण त्याच्यावर निश्चित करू. सभागृहाला मी हे अवगत करत होतो की, टोल आता असा लावता येत नाही. टोलसाठी काहीतरी विशेष काम पाहिजे. एस्टीमेटलाचा एकूण खर्च किती वसुल करायचे हे धोरण आहे. आपल्याकडे ती तरतुद आहे. पण तो वेगळा विषय आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एस्कॉर्टचे काय झाले?

**अनिल सावंत :-**

एस्कॉट वर आपण निर्णय काय घेतला?

**मा. महापौर :-**

आजची सभा आपण वेळेअभावी तहकूब करत आहे.

**सभा तहकूब वेळ :-**

**सायं. ६.३० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**